१८८१
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय नाटक
दा. क्र.

नं ९८१ स्थ ९८१
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
पु. नांव- राणा भीमदेव खरा
रजपूत
दे. ९८१
सं. क्र.

राणा भीमदेव
खरा रजपूत

नाटक

प्रथमावृत्ती

अनु-१८१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ा :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

पंधराव्या शतकाच्या आरंभींच अहमदाबाद शहर वसविणारा अहमदशाहा यानें जुनागडचा राजा सामतसिंह याची मुलगी पद्मावती हिची धारिष्टानें मागणी केल्यावर, कडव्या रजपूत पत्यांच्या अंगांतलें रक्त त्यांच्या अपूर्व क्षात्र तेजानें, निस्सीम स्वामिभक्तीनें, स्वदेशप्रीतीनें, स्वधर्मरक्षणाच्या जबरदस्त इच्छेनें आणि जात्याभिमानानें खवळून जाऊन, त्यांनीं अहमदशाहाच्या आज्ञानें ठार केलेला ईडरचा राणा रणमल्ल याचा पुत्र भीमदेव—ज्यानें अहमदशाहाचा पुरा सूड उगवून घेण्याकरितां अकांडतांडव केलें—त्याच्या सेनापत्याखालीं अतुलप्रताप गाजवून हें विस्तीर्ण भरतखंड दणाणून सोडलें आणि आपल्या अचाट शौर्यानें तुर्कांना "देमाय" करून सोडलें, तोच भयंकर प्रसंग या नाटकांत गोंवला असून, वीर, करुणा, शोक इत्यादि रसांची छाया यांत यथामति प्रतिबिंबित केली आहे. रजपुतांनीं आपलें नांव मागें अमर ठेवण्याकरितां जी मर्दुमकी केली तिचें यांत उठविलेलें चित्र पाहून महाराष्ट्रीयांचीं अंतःकरणें उचंबळून येऊन त्यांच्या अंगांत वीरश्रीचा संचार उत्पन्न होऊन अंगावर थरारून कांटा उभा राहिला आणि राजभक्ति, प्रजावात्सल्य, मित्रप्रीति, पतिप्रेम हीं पाहून सहृदय प्रेक्षकांस गहिंवर येऊन त्यांच्या नेत्रांतून खळखळ अश्रुधारा वाहूं लागल्या, आणि तत्कालिन अविंधांची अनीतिमत्ता, धर्मप्रसाराचें राक्षसी वेड, परधर्म आणि परजाति यांची विटंबना करण्याचा त्यांनीं उचललेला विडा, इत्यादि पाहून क्रोधवन्हीनें अंतःकरणें कढूं लागलीं म्हणजे आमच्या श्रमाचें चीज झालेसें वाटून जगन्नियंत्याच्या प्रसादानें महाराष्ट्रभाषेची सेवा आमच्या हातून दिवसेंदिवस अधिक उल्हासानें होत जाईल.

उर्दूभाषेसंबंधानें आम्हांस क्वचित स्थळीं आमच्या हितचिंत-

कांस तसदी घ्यावी लागली व ती त्यांनीं हौसेनें सोसली याबद्दल आम्हीं त्यांचें अभिनंदन करतों.

सदर्हू नाटक रंगभूमीवर येण्याचें सर्व श्रेय आमच्या संस्थेचे पुरस्कर्ते प्रोफेसर वासुदेव बाळकृष्ण केळकर बी. ए., यांचेकडे असून त्यांचे आम्हीं कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. हें नाटक शाहूनगर-वासीसारख्या सर्वमान्य व कुशल मंडळीकडून रंगभूमीवर आल्या-मुळें तें अप्रतिम उठून आमच्या नूतन कृतीचें यथायोग्य चीज झालें, याबद्दल आम्हीं वरील मंडळीचे फारफार आभारी आहोंत.

या नाटकाचा प्रयोग रंगभूमीवर झाल्याबरोबर येथील वर्त-मानपत्रांतून नाटकाची तारीफ झाल्यामुळें संस्थेचे आश्रयदाते व कायमचे वर्गणीदार यांचेकडून व निरनिराळ्या ठिकाणांहून पुस्त-कांच्या मागण्या अतिशय आल्यामुळें हें पुस्तक घाई घाईनें छापा-वें लागलें; व तें काम "श्रीसमर्थ" छापखान्याचे चालक रा. रा. बळवंतराव करमरकर यांनीं त्वरित व उत्सुकतेनें केलें ह्याबद्दल आम्हीं त्यांची तारीफ करतों. या धांदलींत पुस्तकांत क्वचित् ठिकाणीं अशुद्धें पडलीं असतील त्यांबद्दल सूज्ञ वाचक आम्हांस क्षमा करतील.

| | |
|---|---|
| महाराष्ट्रभाषासंवर्धक मंडळीची कचेरी. ता. २० अक्टोबर १८९२ | **विनायक त्रिंबक मोडक, वासुदेव रंगनाथ शिरवळकर,** ग्रंथकर्ते. |

# राणा भीमदेव

अथवा

# खरा रजपूत.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

**स्थळ—ईडर शहर. राणा भीमदेवाचे वाड्या-समोरील भव्य पटांगण.**

**( मोहनसिंग व लालसिंग** प्रवेश करतात. **)**

**मोहन०**—( हातांत मोडकी तलवार घेऊन येतो ) आतां ही बातमी महाराज भीमदेव यांच्या कानांवर कोणीं घालावी ! शें नाहींत ! पांचशें नाहींत ! तीन हजार कडवे रजपूत शत्रूंनीं तोफेच्या गोळ्यांनीं वरच्यावर उडविले, आणि शेवटीं जमीनदोस्त झालेल्या लोकांचा त्यांनीं तलवारीनें पुराच समाचार घेतला !! लालसिंग, असा घनघोर रणसंग्राम माझ्या आठवणींत पहिलाच ! या तलवारीनें आजपावेतों माघार म्हणून कधींच घेतली नव्हती, पण कालच्या प्रसंगीं हिनें मला आयत्या वेळीं दगा दिला !! ( तलवार फेंकून देतो. ) राजकन्येच्या रक्षणा-

करितां घोरीपावटीच्या किल्यावर ठेविलेल्या एकजात केशरी पोषाक केलेल्या वीस हजार रणबहादुरांनीं आपल्या शौर्याची कमाल केली, परंतु गनीम एक तसूभर जमीन मागें हटेनात !— इकडे तोफेचे गोळे तर पार संपून गेले, आणि गनीम किल्यावर चढाव करूं लागले, हें पाहून आमच्या शूर पठ्ठयांनीं हातांतलीं सोन्याचीं कडीं, आणि पायांतले तोडे, तोफेच्या तोंडांत ठांसून भडिमार सुरू केला. ! सुवर्णाचे जळजळीत तांबडे लाल गोळे छातीवर आदळून हजारों तुर्क जिभा बाहेर काढून पटापट किल्यावरून ढांसळूं लागले ! ! परंतु शहाचें तकदीर जोरांत असल्यामुळें घोरीपावटीचा किल्ला शेवटीं शहानेंच सर केला ! !

**लाल०**—( बोबडी वळून ) आणि राजकन्येची आणि किल्यावरील इतर बायकामुलांचीहो काय वाट झाली ?

**मोहन०**—अहमदशहानें धारिष्टानें मागणी केलेली महाराज सामतसिंह याची एकुलतीएक अविवाहित कन्या पद्मावती—राजगृहांतील प्रत्यक्ष लक्ष्मी, महाराजांचा केवळ प्राण-जुनागड प्रांतांतील अपूर्व स्त्रीरत्न, आणि राज्याची भावी स्वामिनी—त्या अविंधांच्या हातीं लागून रजपुतांच्या तोंडाला मोठी काळोखी लागली ! राजकन्येजवळ सतत असणाऱ्या दासी, या अपरिहार्य दुःखानें वेडावून जाऊन विलाप करूं लागल्या ! आणि कित्येकांनीं आपल्या पोरांच्या गळ्याला नखें लावून हातांतील रत्नजडित कांकणें चावून प्राणत्याग केला ! कांहीं स्त्रिया तूर्त आपल्या अश्रूंनीं राजकन्येवर अभिषेक करून परोपरीनें राजकन्येस समजावीत आहेत ! याहूनही अघोर असा तो प्रसंग डोळ्यापुढें उभा राहिला म्हणजे सर्वांगाचा भडका होऊन जातो. काल बायकामुलांची जी कांहीं कत्तल उडाली, तिची खरी कल्पना तुम्हाला कधींच होणार नाहीं ! बायकांनीं आपल्या मुलांना पोटाखालीं घेऊन, गाईप्रमाणें आपल्या माना त्या खाटकांच्या पुढें केल्या ! आणि जेव्हां त्या चांडाळांनीं आपल्या तरवारी घाव घालण्याकरितां वर उचलिल्या तेव्हां बायकांनीं आणि मुलांनीं जो

हंबरडा फोडला, त्याच्या प्रतिध्वनीनें भूगोल दणाणून गेला! आणि हा आकाशमंडप एकदम कोसळतो कीं काय असा भास झाला!! त्यावेळीं रक्ताचे जे पाट चालले, ते पाहून कांहीं जीवंत राहिलेल्या लोकांच्या मानेचे कांटे तटातट मोडून, त्यांनीं त्या रणगंगेत आपले प्राण जागच्या जागीं ठेविले!! (लालसिंग बेसावध होतो; त्याला मोहनसिंग हातावर धरतो) लालसिंग सावध अहांतना ? अहो हा संग्रामप्रसंग जर तुम्हीं प्रत्यक्ष पाहिला असता, तर तुमच्या यावेळीं झांकलेल्या नेत्रांतील बुबुळें बाहेर पडलीं असतीं ! ! सावधव्हा–सावधव्हा. लालसिंग हा प्रसंग तूर्तचा नव्हे. अहो, हा होऊन गेला. (प्रेक्षकांकडे पाहून) त्यावेळीं हा प्राणी जर तेथें असता तर यानें तेथेंच राम म्हटला असता ! कल्पनाशक्ति विस्तृत करून अंगावर रोमांच उभे राहतील अशीं घोर कृत्यें नेत्रांपुढें उभीं केलीं, किंवा चांडाळांच्या निर्दयपणाच्या शेंकडो गोष्टी ध्यानांत आणल्या, किंवा राक्षस आणि पिशाच यांच्या क्रूरतेची कमाल झाली, तर त्यांचे हातून कोणतीं आणि किती अनन्वित अघोर कृत्यें घडतील याची कल्पना केली, तरी या तुर्कांच्या निर्दयपणाची आणि राक्षसीपण ची खरी कल्पना करतां येणार नाहीं!! सजीवावस्थेंत सर्वांगाची त्वचा वृक्षसालीप्रमाणें सोलून काढतांना होणाऱ्या असह्य वेदना, यज्ञकालच्या पशूप्रमाण बलात्कारें ओढून नेत असतां सर्व शरीरास होणाऱ्या दुःसह यातना, लोहशूळावर क्रूरपणानें जीवंत चढविलें असतां त्या समयींच्या प्राणांत व्यथा, अशा प्रकारच्या दुःसह यातना आम्हांस करणाऱ्या या राक्षसांच्या भारानें ही भूमाता कशी भारावली असेल!!! हे माते वसुंधरे, आम्हां अनाथ लेंकरांचा असा छल तुझ्यानें पाहवतो तरी कसा ! आणि तुझ्या पाठीवर वाहणारे हे रक्ताचे पूर तुला सहन तरी कसे होतात !! लालसिंग—सावधव्हा–महाराज भमिदेव ही बातमी ऐकून आकाशपाताळ एक करून सोडतील.

(दोघे जातात.)

( भीमदेव प्रवेश करून )

**भीमदेव**—हे स्वर्गस्थ देवांनो, हा आम्हां रजपुतांचा विलाप स्वर्गाचीं कपाटें फोडून तुमच्या कानांवर अजून जाऊन आदळत नाहीं काय ! हर ! हर ! कोण ही आमची शोचनीय स्थिति ! ! यावत् जन्म ज्यांनीं आपल्या विमल कीर्तीस अपयशाचा डाग कधींही लागूं दिला नाहीं, ज्यांनीं स्वपराक्रमानें दिगंतरीं आपली कीर्ति गाजविली, देशसेवा हीच ज्यांची कर्तव्यता, शरणांगतांस जीवदान देणें हीच ज्यांची सदयता, समरांगणीं तलवार गाजवून शत्रूंचें पारिपत्य करणें हेंच ज्यांचें ब्रीद, हातांत चमकणारें खड्ग हीच ज्यांची अर्धांगी, खलांस शासन करून भरतभूमीच्या लेकरांस सुख देणें हेंच ज्यांचें व्रत, त्याच आमच्या स्वर्गस्थ पूर्वजांनीं या वेळीं स्वर्गीं कल्होळ करून सोडला असेल !!! प्रत्यक्ष बाबांचा प्राण या **अहमदशहाच्या आज्ञानें** घेतला, असें असून हा षंढ नुसतें अश्रु ढाळीत बसतो आं ! धिःकार ! धिःकार ! ! रणवाद्यांची गंभीर गर्जना, घोड्यांचें कर्कश खिकाळणें, तोफेची सरबत्ती, आणि तरवारीचा खणखण नाद हीं ऐकून ज्याच्या अंतःकरणांत वीरश्री उत्पन्न होत नाहीं, ज्याच्या आंगरख्याचे बंद तटातट तुटत नाहींत, ज्याचे बाहू स्फुरण पावत नाहींत, तो पुरुष कसचा ! ! ! हे सूर्यनारायणा, तुझीं सहस्रावधी किरणें एकत्र करून तुझ्या प्रखर तेजाचा लोळ या शरीरावर पाडून हें खाक कर ! हे रजपूत शूर बच्चानों, याच्या छातीवर पाय देऊन याला जमिनींत गाडून टाका ! हे शूर अबलांनों याच्या डोक्यावर लत्ताप्रहार करा ! हे आकाशस्थ चपले, याला पाताळांत नेऊन पोहोंचीव ! आणि हे यमराजा, हा देह तुझ्या पुरीच्या अमंगळ कूपांत टाकून दे ! म्हणजे कोट्यावधी कीटक हें मृतशरीर फाडून फाडून जमीनदोस्त करून टाकतील ! ! भीमदेवा, व्यर्थ, व्यर्थ जन्मलास ! बाबांच्याबरोबर ज्या एकनिष्ठ स्वामिभक्त देशसेवकांनीं आपल्या माना तुर्कांच्या पढें दिल्या, त्यांच्या बायकामुलांनीं आपल्या रक्तानें, काल स्वर्गस्थांस

शेवटचीच तिलांजुली दिली ! आणि मी अश्रुजलानें तर्पण करीत बसलों आं ! ! धिःकार ! धिःकार ! हा षंढा, जे हात तुझ्या राजलक्ष्मीच्या अंगावरचा पदर दूर करण्याकरितां गनीमांनीं पुढें केले आहेत, ज्या हातांनीं तुझ्या सहस्रावधी देशबांधवांना इहलोकावरून हुसकून दिलें, ज्या हातांनीं तुझ्या आयाबहिणींचें ते पाणिग्रहण करतात, आणि ज्या हातांनीं तुझ्या आर्यमातेस ते वश करूं पाहतात, ते त्या गनीमांचे हात छाटून गृध्रादिकांच्या पुढें टाक ! तुझ्या छातीवर शौर्याचें निशाण फडकूं दे ! आपल्या पूर्वजांच्या शौर्याचें स्मरण कर ! त्यांच्या प्रतापसूर्याआड आलेले हे ढग, फांकून जातील असा घनघोर रणसंग्राम कर ! आणि कमरेस लटकाविलेली ही तलवार हातांत धरून, शत्रूंच्या रक्तानें रणमेदान भिजवून टाक ! ! सूड !–सूड ! !–सूड ! ! !

( निघून जातो. )

---

## प्रवेश दुसरा.

### स्थळ—जुनागड शहर–सामतसिंहाचा दरबार.

( दोन चोपदार उभे आहेत. **सामतसिंह, भीमदेव, जयसिंह, मोहनसिंग, सरदारसिंग, गुलाबसिंग** व इतर सरदार लोक दरबारांत सचिंत बसले आहेत. )

**सामतसिंह**—भीमदेव, जयसिंह, सर्व सरदारहो, आपला धर्म विसरून, आपल्या अस्सल क्षात्रतेजाला लाथ मारून, स्वबांधवांचा उपमर्द करून, ज्यांनीं आपल्या लेकीबहिणी तुर्कांच्या घरांत घातल्या, अशा नीचांचें मुखावलोकन होऊं नये म्हणून ज्या सामतसिंहानें तोंडावरून पदर घ्यावा त्याच या सामतसिं-

हाची अशी अप्रतिष्ठा व्हावी आं ! आणि माझी कन्या-केवळ माझा प्राण--गनीमांनीं तापलेल्या सांडसानें ओढून नेल्यामुळें हें काष्ठवत शरीर अजून स्मशानवन्हीच्या तोंडांत जाऊन पडूं नये आं ! रणमैदानावर उठाविलेल्या गंभीर रणगर्जनेनें ज्यांनीं शत्रूंना गलितधैर्य करावें, ज्यांच्या हातांतील प्रखर खड्ग पाहून शत्रूंचे हात लुळे पडावेत, ज्यांचें संग्रामसमयींचें असह्य नेत्र-तेज पाहून शत्रूंनीं थरारून जावें, आणि ज्यांचा अतुल प्रताप पाहून शत्रूंनीं आपलीं तोंडें जमिनींत खुपसावीं, असे आ-मचे हे कट्टे सरदार—प्रति कृतांत—आमच्या पदरीं असतां पद्मा-वतीच्या वियोगाचें हें दुःसह दुःख कंठण्यांत हें राहिलेलें आयुष्य झिझविण्याचा प्रसंग यावा आं ! ! रजपुतांचा प्रतापसूर्य अस्ताला जाऊं लागून सर्वत्र यवनमय होण्याचा समय अगदीं जवळ येत चालला ! केवढी शरमेची गोष्ट ! धिःकार ! धिःकार ! या आम्हा राजांना ! ! या आमच्या राजभक्त सेवकांना आणि आमच्या रणधीर मित्रांना ! ! ! (सर्व सरदार माना खालीं घालतात. )

**भीमदेव**—महाराजांची या सेवकाला आज्ञा व्हावी, म्हणजे महाराजांच्या गादीच्या पुण्यप्रतापानें आणि स्वर्गस्थांच्या आ-शीर्वादानें ही भूमि मुसलमानांच्या रक्तानें लाल करून सो-डतों ! ! जागच्या जागीं थबकून जाऊन मुसलमानांच्या सेवेचा तुकडा तोंडांत कोणीं चघळावा ! वीरमाता आणि वीरपत्नि यांचा इहलोकचा अलंकार--पातिव्रत्य--तो त्या चोरांच्या हा-तांत देऊन ही भूमि कोणीं विटाळावी ? आणि त्यांचा विलास कोणत्या नेत्रांनीं पहावा ? ही आर्यभूमाता मुसलमानांनीं तुड-विलेली पाहून स्वस्थ कोण बसेल ? गोब्राम्हणांस दिलेले लत्ता-प्रहार, आणि त्यांचे शिरच्छेद कोणीं सहन करावेत ? हे देह पर-सेवेंत झिजवून, अंतीं रौरव नरकाचें कोणीं साधन करून घ्यावें ? अहो सरदारहो, माना वर उचला, आणि ज्या पुण्यशाली पुरु-

षांनीं धारातीर्थीं देह टाकून दिले, त्यांचाच मार्ग तुम्हीं स्वीकारा! देशभक्ति, स्वामिभक्ति, पितृभक्ति आणि धर्मश्रद्धा यांची शुभ्रपताका तुमच्या छातीवर फडकूं द्या ! सरदारहो, षंढाप्रमाणें अश्रु ढाळीत काय बसलांत ? तुमच्या या उष्ण अश्रूंनीं वसुंधरेला चटके बसून ती पहा कशी डगमगते आहे !! तुमचे बाप दादे मेले, त्यांचे मुसलमानांनीं खून केले, तुमच्या कच्चाबच्चांची कत्तल उडाली, तुमच्या लेकीबाहिणी मुसलमानांनीं आपल्या गोषांत तुमच्या समक्ष खेंचल्या, हें पाहून तुमच्या अंगांत वीरश्रीचा संचार अद्याप उत्पन्न होत नाहीं, अंगावर रोमांच उभे राहून केंस ताठ उभे राहात नाहींत, तुमची छाती फाटून जात नाहीं, तुमचे हात रवरव करीत नाहींत, हीं तुमचीं डोकीं भणाणन जात नाहींत, आणि तुमचीं हीं करपलेलीं काळीं ठिक्कर तोंडें रागानें लाल होऊन जात नाहींत याला म्हणावें तरी काय !!! धिःकार ! धिःकार !!! धिःकार !!!

**मोहन०**—महाराजांनीं आज्ञा द्यावी म्हणजे त्या शिखानष्टांना "द्रे माय धरणी ठाय" करून, त्यांच्या माना या समशेरीनें उडवन, त्यांनीं आजपर्यंत ज्या असंख्य हत्या केल्या, आम्हां रजपुतांचा जो छल केला, गोब्राम्हणांची जी पायमल्ली केली, आणि आमच्या पोटच्या गोळ्यांना, आमच्या बायकांना, जें कंठस्नान घातलें, त्यांचे देह विटाळन रजपूत नांवाचा जो उपमर्द केला, त्या सर्वांचें त्यांना योग्य प्रायश्चित्त देतों !! रजपुतांचा यशदुंदुभी पृथ्वीच्या प्रलयकालपर्यंत एकसारखा दुमदुमत राहील असें शौर्य प्रगट करून, अंतीं देशकार्यीं, स्वामिकार्यीं आणि धर्मकार्यीं हा देह रणांगणांत टाकून देतों ! ! !

**जयसिंह**—सर्व सरदारांनीं आपले देह स्वामीस अर्पण केले आहेत. एकनिष्ठ सेवा हीच त्यांची कर्तव्यता, आणि महाराजांचा जय हेंच त्यांचें सुख. या सरदारांच्या पराक्रमावर विश्वसून आपण स्वस्थ असावें. बायकामुलें, आप्तवर्ग यांचा लोभ सोडून, जीवावर उदार होऊन, आज " मारूं किंवा मरूं " पण महाराजांची बा-

ज़ू राखूं, फितूर करून परधर्मी भ्रष्ट न होतां यवनांस "त्राहि त्राहि" करून सोडूं, आणि महाराजांचा प्रतापसूर्य गगनीं सदैव तळपत राहील अशी मर्दुमकी करूं! रजपुतांचें नांव ऐकल्याबरोबर शत्रूंच्या उरांत धडकी भरावी असा घनघोर संग्राम करूं! असा निर्धार करून आम्हीं सर्वांनीं या समशेरी बाहेर काढिल्या आहेत! या एकवार बाहेर काढलेल्या समशेरी शत्रूंचें रक्त प्राशन केल्याखेरीज़ कधींच परत घेतल्या जाणार नाहींत !!

**सामतसिंह**—भीमदेव, जयसिंह, सर्व सरदारहो, आजची ही तुमची राजनिष्ठा पाहून आनंदाश्रूनें नेत्र भरून आले आहेत! कंठ दाटून येऊन तोंडांतून एक शब्दही निघत नाहीं. तुम्हां सर्वांचें हें अढळ आणि अप्रतिम प्रेम, ही तुमची पितृतुल्य प्रीति, मजकरितां सर्वस्व अर्पण करण्याची ही तुमची ईर्षा, ही तुमची एकनिष्ठा आणि हा तुमचा रणोत्साह पाहून माझी पूर्वपुण्याई आज फळास आली, आणि आजपर्यंत पितृवात्सल्यानें प्रजा पाळल्याचें योग्य बक्षीस श्रीसोमनाथानें मला दिलें, असें वाटून मोठी धन्यता वाटते !! मी तुमचा स्वामी खरा; परंतु माझें स्वामित्व राखणें आपल्या हातीं आहे. हीं सर्व राजभूषणें तुमचीं आहेत. सर्व रजपुतांची आणि माझी शोभा तुमच्या हातीं आहे. युद्धांत मरण आलें तर स्वर्गवास मिळेल! आणि यश आलें तर अखंड कीर्ति होईल!!

**भीमदेव**-शाबास! सरदारहो, शाबास! आज तुम्हीं आपल्या रणोत्साहानें आपल्या पूर्वजांना स्वर्गी आनंदानें नाचायला लावलेंत! धन्य ! धन्य तुम्ही! आणि धन्य तुमच्या वीरमाता !! जर तुम्ही आपलीं हीं काळीं ठिक्कर तोंडें खालीं घालून बसला असतां, तर परदास्याचे भयंकर तीव्र कोरडे तुमच्या पाठीवर उठून अंतीं यमाजीभास्करानें तुम्हांला अमंगळ कूपांत टाकून दिलें असतें! तुमच्या षंढपणानें **रजपूत हें नांव** मुसलमानांनीं दुनियेंतून पार उडविलें असतें ! हा तुमचा नामर्दपणा पाहून तुमच्या बायकांनीं अग्नीच्या भयंकर लोळांत आपले देह जाळून खाक केले

असते ! आणि तुमच्या मुलालेकरांनीं तुमच्यापुढें सपासप आपल्या माना उतरून घेतल्या असत्या ! ! सरदारहो, वीरपुरुष युद्धांगणीं पडला असतां, त्याला स्वर्गी नेण्याकरितां आकाशांत अप्सरा विमानारूढ झाल्या आहेत, करितां युद्धाची तयारी करून घ्या देवाचें नांव, आणि करा रणयज्ञास प्रारंभ ! ! या यज्ञांत शत्रूंच्या रक्ताचीं अवदानें देऊन त्या चेतलेल्या होमकुंडांत असंख्यात शिरांचा प्रचंड ढीग द्या लोटून, आणि **अहमदशहाची** शेवटची पूर्णाहुति देऊन करा अग्निनारायणाला संतुष्ट ! ! ! वीरहो, शत्रूंच्या शरीराचे छिन्नभिन्न तुकडे, रक्तमांस खाऊन संतुष्ट होणाऱ्या रणदेवता आणि गृध्रादि खादाड पक्षी यांच्यापुढें फेंकून घ्या पुरा सूड उगवून ! ! समरांगणावर जो सामन्याला आला त्यानें त्या भडाडलेल्या रणकुंडांत आपली आहुति दिलीच पाहिजे ! शत्रूकडील लोक नामर्दपणानें जर रानोमाळ पळत सुटतील, तर त्यांचा पिच्छा पुरवून त्यांना या दुनियेंतून पार करून टाका ! पाण्यांत जाऊन तेथें बुडी मारून बसतील त्यांना तेथून हुसकून कंठस्नान घाला ! जे कोणी स्वर्गावर चढून जातील, त्यांना तेथून उलथेपालथे पाडून त्यांच्या घशांत रणधूळ भरा ! दऱ्याखोऱ्यांतून कोणी लपून बसतील, त्यांचीं शिरें धडावेगळीं करून त्यांना तेथेंच फेंकून द्या ! आणि पृथ्वीचे पोटांत भुयार खणून तेथें कोणी दबा धरून बसतील त्यांना तेथल्यातेथेंच जमीनदोस्त करून टाका ! !

**सामतसिंह**—भीमदेव शाबास ! शाबास ! ! स्वारीचें सेनापत्य तुम्हीं संभाळून, जरी पटक्याचा हत्ती तुम्हीं आपल्या कबज्यांत घ्या. तुम्हीं आपल्या जोरदार भाषणानें या सरदारांच्या आंगांत जास्त वीरश्री उत्पन्न करा, आणि तुमचा प्रतापसूर्य उद्याच्या रणांत पूर्णपणें झळकूंद्या. ! जयसिंह व इतर सरदार तुमच्या समागमें आहेतच. लढाईची तयारी करून उद्यां श्री सोमनाथाचें दर्शन घेऊन स्वारी तशीच पुढें जाऊंद्या. मीही तुम्हां सर्वांबरोबर निघतोंच.

**भीमदेव**—स्वामींची आज्ञा शिरसावंद्य आहे.

**सामतसिंह**—भीमदेव, तुम्हीं सर्व सरदारांस जो हुकूम कराल तो माझा आहे, आणि त्याचें कोणाकडून उल्लंघन झाल्यास त्यास वाटेल ती शिक्षा करण्यास आपणास सदर परवानगी आहे. सरदारहो, अहमदशहानें आपल्या दुष्ट आचरणानें हिंदूस्थानातील, हिंदूधर्माला आणि हिंदूराजांला सर्वप्रकारें पीडा देण्याचा क्रम चालविला आहे! तो यावज्जन्म विसरणार नाहीं, असें त्याला योग्य शासन करण्याकरितां ही स्वारी निघत आहे; करितां हिंदू या पदाचा व या गादीचा अभिमान धरून धर्मकार्याविषयीं, आणि देशकार्याविषयीं सर्वांनीं एकचित्तानें आणि झटून उद्योग करावा.

**सरदारसिंग**—शत्रूकडील लोक कितीही असोत, उद्यां लढाईत खासा पाडाव करून, स्वामींच्या पायापाशीं त्याचें शीर आणून पटकावतों!

**गुलाबसिंग**—स्वामींच्या चरणप्रतापानें, आणि भगवान् शंकराच्या कृपेनें यवनांची उद्यां लांडगेतोड करितों!!

**सामतसिंह**—सर्व सरदारांना चिलखतें, ढाला, तलवारी, जांबिये वगैरे हत्यारें देण्याविषयीं सिलेखान्याच्या दारोग्याला, भीमदेव तुम्ही आज्ञा करा, आणि ही स्वारी परत येई पावेतों सर्व रजपूत स्त्रियांनीं **गिरनार किल्ल्यांत** राहिलें पाहिजे अशी दवंडी पिटवा. जयसिंह, तुम्ही आपल्या फौजेपैकीं कांहीं लोक **गिरनार किल्ल्याकडे** रखवालीस पाठवून द्या.

**सर्व सरदार**—महाराजांची आज्ञा आम्हां सर्वांस शिरसावंद्य आहे.

**जयसिंह**—सतत साहा वर्षे अहमदशहाच्या घरीं नीचतर सेवा केली, आणि बंद्या गुलामाप्रमाणें "हांजी हांजी" करून आयुष्याचा जो अमोल्य वेळ कंठला त्याचें स्मरण झालें, म्हणजे ज्यापासून माझी उत्पत्ति झाली तें क्षात्रबीज उसळून जाऊन रणभेरवांच्या कठोर रणगर्जना माझ्या कानांत घुमूं लागून, ने-

त्रापुढें "रक्तपात" या शिवाय कांहींच दिसत नाहीं. शहानें मला मुसलमान करण्या करितां केवढा अट्टाहास केला ! आणि माझें मन बळविण्यासाठीं "मी तुला सुभा करीन, तुला मुबलक दौलत देईन, तुला महालानिहाय मोकासे देईन" इत्यादि उद्गार कितीवेळां तरी काढले ! हा नीचा, तुझ्या मोठेपणावर मी लाथ मारतों समजलास ! तुझ्या त्या पुष्ट शरीरांतील रक्त या तलवारीनें जमिनीवर शिंपडून, तुझ्या रक्तानें लाल झालेलें हें शस्त्र, त्या हिम्मतबहादर भोजराजाच्या पुढें टाकून त्यांणीं मला जें प्राणदान दिलें त्याचें योग्य चीज त्यांना कधीं करून दाखवीन असें झालें आहे. ! !

( भमिदेवास पोषाख व विडे देण्याचा समारंभ होतो. )

**भीमदेव**—माझ्या बंधुवर्गाच्या ह्या रणोत्साहानें या शरीरांतील रक्त खवळून जाऊन, आनंदाच्या प्रचंड लाटांनीं उचंबळून वर येत असलेलें हें हृदय, इंद्रवज्राच्या भयंकर आघातानें ही चूर्ण होणार नाहीं, असें घट्ट बनुन गेलें आहे ! आमचे बाबा **रणमल्ल** यांच्या छातीवर **अहमदशहाच्या आज्ञानें** दिलेली लाथ मूर्तिमंत डोळ्यापुढें उभी राहून, शरीरांत उत्पन्न झालेल्या संचारानें, माझे बाहू मदानें ताठून जाऊन, या मुठी कशा रवरव करितात ! मस्तक क्रोधानें भणभणून प्रखर अंगाराप्रमाणें तापून गेलें ! अंगावर शहारे उठून केश ताठ झाले ! आणि हे दांत शिवशिव करूं लागले ! अहो सुरासुरहो, तुमची सर्व शक्ति या भीमदेवाचे शरीरांत ओतुन, तुमचा प्रताप या हातानें घडवुन आणा, आणि दिग्गज एका प्रहारानें चूर्ण होतील अशी प्रचंड शक्ति याच्या आंगीं उत्पन्न करा !!! सूड ! सूड ! सूड !!!

**पहिला अंक समाप्त.**

# अंक दुसरा.

## प्रवेश १ ला.

### स्थळ–घोरी पावटीचा किल्ला.

बादशहाचा दरबार.

दरबारांत **भोजराज, मौलवी, जंगीसखान, दिलावरखान, खानजहान, नसीरखान, फैजुद्दवला,** इत्यादि तमाम सरदार बसले आहेत.

प० चोप०–

जष्न्मे बादशा तशरीफ आप् लाते हैं
वो जल्वए जहांआरा हमे दिखलाते हैं
चमन्मे बुलबुलें खुष् होके चेह्चाहते हैं
खुषीसे अपनेमे फूले नहि समाते हैं
हुजूरे खासकी इस् वख्त् आमद् आमद् है
सवारी निकली है, वो आ रह है, आते है
फता जिनोने किया गोरी पायटीका किला
ए हम् मुबारकी खिद्मत्मे उनके गाते है
जनाबे हक्मे अमीरों गरीब और मिस्किन
दो आगो उस्दरे दौलतके हात उठाते है.

(चोपदार पुकारतो.)

निघारो बरो खुदावंद् दाम्मुल्क्हूंकी उम्र दौलत् रोझआवझं.

(बादशहा येतो सर्व उभे राहतात.)

दु० चो०—

खदेवेजहां शाहेआलि मुकाम् है
शहेदिपना जिसका ऐहमदशा नाम् है
षुजाअत् सखावत्मे मशूहरे आलम्
फतामंद् मनसूर साहेब किराम् है
खुदा उस्से राजी रसूल उस्से खुष्है
के हर् गज़्वेमे गाजी गालिब मुदाम है
सिपा जिस्के लष्करके गाजी बहादर
हरएक रुस्तुमे वख्त्वाला हुमाम है
खुदावंदेआलम् रखे उस्कु कायम्
दो आगो ए मिस्किन् हर खासो आम् है

बाद०—शुक्रोसिपास बेकियास उम् शाहीन्शाहे हकीकी खालेके जिन्नोबन्नासको जिस्ने अप्ने फजलों करम्से हम्से बंदे नाचीसको बादशाहे इस्लाम् किया, और गैर मझहब् बुद् परस्तोंके मुल्कपर फदादिया, और जिस्केवास्ते ये जंग हुवा, अल्लाने उस्का नतीजा आखिर अच्छा किया. राजा सामतसिंगकी बडीप्यारी, दिलका कलीजा, ऐसे शेहेजादीकू आप् सरदारोनें कैद करके लाया. क्या खुब् सूरती है, जैसी अस्मान्मे बिजली चमकूनेसे रोशनी पैदा होती है ! हम् बहोत खुष् हुये. हमारे वफादार जानीसार सिपासालारोंसे जिन्हूने बडी जानेदिल्से बहादरी किई, दुष्मन्को शिकस्त दिई, तीन महिने बराबर लढते रहे, जो कुच्छ् तकालिफ् हुई सहे, तवकल्ल खुदा दिल् जोडे मर्दान्गीका बाना हातसे न छोडे, थे तो थोडे लाकिन् बहोतोंके सिर्फोडे. आंफरीं शाबाष—मरहबा हमारा एक नाम् हुवा मगर सिपाजादोंसे काम हुवा. ये मेहनत् इन् बहादरोंकी जाया न जायगी, दोन्हो जाहांकी भलाई दिखायगी, सरकारसे सब् इन्आम् पायेंगे, हम् सब्के दरजे बढायेंगे. चाहीयेके सब् बहादर अप्नी अप्नी बहादरी और जंगकी कैफियत् बयान् करे.

**जंगी०**—सरकारे आलि, जिस् वख्त् बंदेनें शेहेजादीकू गिरफ्त् किया, उस् वख्त् शेंकडों बांदीया शेहेजादीके पीछे, हाय! हाय्! करके, बडेबडेसे छाती पीटते हुवे, उस्के पीच्छे चले. फिद्वीनें सबकू कैद किया. हमारे मुकाबलेमे बेरेह्मन् और रजपूत दोनो कौम् थी. मैने तो बडेबडे सरदारोंकू खुद्भी मारा और सिपाहीयोंसे मरवाया,—कैकोंकी सुन्ता करकर मुसलमान किया-रजपुतोनें रोकर राम दुहाई दिई, बेरेहमन् बोले शिव! शिव! हम् हिंदू रहे ना मुसलमान—दोनो दिन गये पांडे इधर हलवा मिला ना उधर मांडे, प्रान् निकल जाय तो आब् ठीक. तुर्कोनें ताराज किया, भगवान् लाज रखे—और जो कुच्छ् बंदेनें किया, करवाया, मारा, मरवाया, सब् बंदेगानेहुजूरपर रोशन है. आयांराचेबयां.

**नसीर०**—खुदावंदेआलम्, हुजूरके एकबालके जोरसे ये बंदा और बंदेके सिपाही बडे दब्दबे और शोरसे नारेहैदरी भरते हुये, वारपरवार करते हुये. जब् जंग्मे आये हजारों दुष्मनोंकू कत्तलकर नेस्तनाबुद किया, लाखोंके सिर् उडाया, खूनकादर्या बहाया. हम्ने काम किया, हुजूरका नाम किया.

**दिला०**—जनाबेआलि, हम् दिलावर हमारी फौज दिलावर, हिंदू लोग् क्या बिलावर, हमारे सिपाही जितोंसे भागे तो मुर्दों-कू मारे, मुर्दोंसे हारे जनूखोंपर गुजारे, सिरोंके बद्ले चोटिया-काटी-हर् रजपूत सिपाही कहेने लगा राम्! राम्! भगवान! हमारी अब् क्या आन्बान् उडगई चुटिया रहे गये कान्-धरम्-की दुम् कट गई, ये कहेते हुये सब् फौज् भागगई. कोई सामने न आया, हुजूरने फता पायी. मारना, मराना, जनाबहीका कार है, हम् तो फकत् जनाबके कमरके हत्यार हैं-जिधर चलाव उधर चले, जैसा करवावो वैसा करे. इलाहि हमेषा हुजूरको फत्ता-नस-सरत नशीब हुई जिये.

**खान०**—हुजूरेआलम्, आलीजाहां, हजरत्के नमकके शोरपुरजोरपर्, बुद्र परस्तोंने बहोतही खार खाया लेकिन्

अपना कुच्छ न बिगडा, उन्की उन्हीसे बिगड गई. तंग खिष्स्तकोंमे ढिलीधोतियोंका क्या चले! यहां सुई न समासके वहां मुसलभी चला जाय तो तंगी न आय! हर् कोई रेताथा के खिष्स्तकोंसे बुरी ठैरी, धोतीका अब्रु देब रखे. सब देव देव करतेथे, हम् अल्लाहो अक्बर कहेके तलवारें लिये, मारतोंके आगाडी, भागतोंके पिछाडी थे—चमाचम् खंजर चमाकाते हुये, सपासप् शमूशीरें बजाते हुये, हुजरके नमकूख्वार किलेमे घुस् गयें, दीन् जागे काफर भागे. बारे कल्लाहोलना फताहना बोलकर सब् थंड हुये. अब् दोआ करते है.

**फैजु०**—जहांपन्हा, आलीजाहां, खिद्मद्गुजारजनाब्का जो फौजे बरकंदाज सिपाहींयेके मन्सबे सिपासालारीसे सरफराजहै हरंजगो जदल्मे तमाम् फौजेंसे मुकद्दम रहेताहे,—चुनाचे तीरजन् शमशिरजन्. तबरदार, बल्लमबाज, कुलुक्अंदाज, वगैरा सब् हत्यारबंद फौजके हमारे पसेपुशत् रहेते हैं. लेकिन् ताज्जुब् हैं-के, लडाईमे तो नौबत् हमारी सबसे आगे होतीहै, और इझारे हालमे बारी हम्को सब् अप्ने पिच्छेकी देते हैं—जैसाके अभी हम् सब्के पीच्छे पडे और लडाईमे सब्से आगे लडे. खैर येभी एक बात हैं के सब्का आगा पिच्छा हर्वख्त् हमारे हात है! नवाजिष् फर्माईये, सुनीये—जब् हम् लोग बंदूके दागते दगाते, दांय् दांय् ठांय् ठांय् ठूं ठूं मारते हुवे, दुष्मनोंके पीच्छे पीट लगे, तो सब् हिंद ढिली धोतीवाले सवार, प्यादे फुद् फुद् पूं पूं करते हुवे दुम् दबाकर सामनेसे निकल गये. यारोंनें मोहरा फिरा दिये, सब् फौजेशाही हमारे बाद आये, भागतोंपर हात चलाई, अपनी अपनी बहादरी जगाय, दुष्मन् नापेद हुये, दीन्का डंका बजगया, हुजूरका नामका झंडा निशान चढ गया, सब्के दिलोंकी मुरादबर आयी, अल्लानें फता दियी, इस् खिद्मद् गुजारीकी कदरदानी हुजरके ऐखत्यार है. ज्यादा गोईसे खातेरे पाकपर मलाल न आय. लिहाजा दो आये खैर है.

**बाद०**—हांजीरीनें जल्सयेहाजाको बशारत है, के, हम्ने ये

जो चंद अप्सरोंकी बहादरी सुनी अलाहाजलकीयास सब् सिपाहियों और सरदारोंकी दिलेरी समज गये. कोई ये ख्याल नकरे के हमारी षुजाअत्की सुन्वाई न हुई–सब्को दरजेबदरजे, सिला, इन्आम्, बक्षिस् और जागीरे आदाहोगी.

**मौलवी०**—मरहबाहबबजाआहसंतुम्—अच्छा किया तुमने–अच्छे हो तुम् दोनो जहांन्मे. आप् लोग दीनके गाजी हो–जंगे इस्लाम्मे जो तुम्मेसे मारे गये वो सब् सय्यद और शहीद है. और शहीद सब् जन्नत्मे जाते है. उन्का मरना औरोंके जीनेसे बेहेतर है. ऐहेलेइस्लाम्की हजारों किताबें उन्के अवसाफसे मालामाल है. शहीदोंकी तारीफकी किस्को मजाल! इस् जाय जुबानें गोयायी लाल है. शहादद्से जो बचें वे गाजी गनीमोपर गालिब आय् हैं. तुम् लोग मर्दाने दीन हैं. बहादराने रुये जमीन है. इस्लामकी बादशाही तुम्हींसे कायम है. दीनके बादशाह तुमारे जोरके मोहोताज हैं. दीन तुमारी बहादरीसे सरफराज हैं—बादशाहोंका काम् जर् देना और तुमारा काम् सर् देना है. ता, दोनोसे दीन्दारीकी बुनियाद् बनी रहे. अल्लाहोताला, दोनो जहांमे दोबोंको जजाय खैर दे.

**बाद०**—राजा सामतसिंगकी प्यारी लडकीकी सरबराई करनेके बारेमे हम् हमारे बडे बहादर और दिनके गाजी, सरदार फैजुल्ला, इन्कु मुकर्र् करते है.

**फैजु०**—हुजूरेपूरनूर, बंदा जनाबका खानाजाद है. सरकारके हुक्म्की तामिली बजा लाऊंगा. बुलबुले शेहेजादीकू उस्के बांदियाके साथ, गुलाब्के फुलमे रखुंगा. उस्के नजदीक रायमल, जातका रजपूत, बडा इमानदार, जिस्कू सरकारेआलीने, साथ जयसिंगके, कैद करके लाये, उस्कू, उस्के खिदमत्मे रखूंगा, फिलहाल शेहजादी बहोत बीमार है, सबब इस्का ये है के वो अप्ने बाबाजान् और वालिदा, इन्से अलक् हो चुकी. अब् इन्शाअल्लाहताला, बाद रमूजान् शरीफके, हुजूर उस्से शादी करे.

**बाद०**—उस् नमक हराम् जयसिंगका नाम क्यंव् निकालते हो. वो बडा काफीर आदमी है. मैनें उस्कू इथ्यां शहजादोंकी मानिंद रखाथा, मै उस्कू मिसल फरजंदोंके समजताथा, उस्से मैने जिस्वख्त् गिरफ्तार किया उस्वख्त् मुझे बहोत तकलिफ् हुयी, मुझे यकीन है के अगरचे मै उस्स्वख्त् दुष्मन्के मुकाबले-पर न होता तो उस्को कैद करना ना मुंकीन् था. कीसीनेभी उसे नमकहरामी कीरासे उस्कु बेहेकाकर फरार करदिया. ( सर्व सरदार भोजराजाकडे बोट करतात. बादशाहा रागानें त्याच्याकडे पहातो. दोन फकीर प्रवेश करतात. )

**फकीर**—

खुदानें बंदेकों अप्ने अजब् दिया मौका
बहोति उम्दा है लोगो ये जिस्तका मौका
हजारों शुक्र है एहसां कडोड हा उस्के
हमारे काम्का हम्को सुजा दिया मौका
भले भलाहे भलाई करो भला होगा
भला जमाना भला वख्त् है भला मौका
जो बारेगाहे इलाहिमे बारचा होतो
समजलों सोचलों अप्ना भला बुरा मौका
ये दीन् है कामके बेकाम् मत् रहो इन्मे
गवांवो हात्से मत् अप्ने काम्का मौका
ये फजले हक है के मिस्किन् और फकीरोंको.
ये जश्ने शाहीमे आनेका मिल्गया मौका

खुदावंदेजमान्दाममुल्कहूं, ये हरदों फिदवी खानाजाद फिद-वायित्नेहाद् वोही कम्तरीन् चाकरानें हुजूर है. जो साबेकन् खिदमत्मे जासूसीसे सरफराज होकर मामूर है. जो हुजूरके फर्मानसे राजा सामतसिंगके शहरे जुनागडको जाकर आये है और तमाम हाल वहांका बेकमोकास्त दर्याफ्त करलाये

है. वो है के राना भीमदेव जिस्के बापको हुजूरके जद्देअमजद्ने कत्ल फर्माया वो बीस हजार सवार जंगी लेकर राजा सामतासिंगके नज्दीक आया है. दुसरा जयसिंग जनाबका गिरफ्तारशुदा, जो कैदसे गुरेज कर गया वोभी सामतसिंग मजकूरसे जा मिला. और सामतसिंगकी लडकी जो हुजूरे आलीमे नजरकैद है, वहां सबूको उसूके रिहाईकी उम्मेद है. इस् बारेमे बडी मसलेहत् हुयी है, उन् लोगोंके दिलोंमे निहायत् दुई है. राना भीमदेवको राजानें चक्रसिगीरीका मनसब् दिया, और तमाम फौजको हुजूरेआलीपर चढाईका हुकम् किया. कल् सब् लष्करी लोग सोमनाथके मंदर जायेंगे, वहां आप्ना मझहबी भजन भोजन करेंगे, खाईंगे, खिलाईंगे, जय जय मनाईंगे, परसूं आपपर चढाई करके जंगको आयेंगे. जिआदा दो आय तरक्की उम्र दौलत, हम्ने जो देखा, सुना, हुजूमे अरज किया. बंदे फरमाबरदार है आगे हुजूर मुख्त्यार हैं.

**बाद॰**—ये कैफियत् जो जासुसोंने पेष की हम् इस् बारेमे हाजेरीनें अर्कानेमुमूलिकत्से मशवरा तलप् करत हैं, के जब् राजा सामतासिंग, भीमदेव, और जयसिंग भगोडेका, ये इरादा है तो आप् लोगोकी इस्मे क्या राय है ? अप्नी अप्नी राय बयान करो.

**जंगी॰**—जहांपन्हा हम् सब् हुजूरकी रायपर रजामंद् है— जो चाहे हुक्म् फर्मावे—बसरोचश्म बजालाईंगे. मर्जीयेमौला अजहमाओला.

**बाद॰**—हमारी राय ये है के कल् ऐन् खातेवख्त् उन्के इरादेपर अप्ना इरादा पेशतर बढजाय. और उन्के इधर आनेसे अव्वलही सोमनाथपर हमारा हम्ला हो. ता, खाना, खिलाना, पीना, पिलाना, भजन, भोजन, सब् सतेनास हो जाय, कोई हत्यार बांधने न पाय, बेहत्यारोंपर हमारे हात चले—गनीमका माल मिले, दुष्मन् सब् देवलसे भागजाय, लूट मचे, लूटमे सोमनाथका

जरोजेवर जवाहिरात् जो जिस्के हात लगे उस्को माफ है, बेशर्तके हमारी नजरसे गुजराने.

**नसीर॰**—जहांपन्हा ये हुकूम् शरीफ बहोति बेहेतर है. खानेके वख्त् अक्सर हिंदू लोग बेसरोपा नंगेसिर होते है. एक पंचा यानें पांच हातकी धोतीका कपडा जिस्कू सवला कहेतेहै वो पेहेने हुये रहेतें है. एक अबूखोरों और एक लोटेके सिवाय और कुच्छ उन्के पास नही रहता-ऐसी हालत्मे उन्को मार लेना कुच्छ बडी बात नही. इरादा शर्थ है.

**दिला॰**—खुदावंद्दाम्मूल्कहं, बंदेंगानें हुजूर, सब् फर्मा बरदार हैं. यकीने कामिल् है,के कमाने शाहिके मवाफिक् जब् उन्-पर चढाईहो तो सच्का कुफर् टूट जायेंगा. इंटाल इंटाल करते हूये खानापीना छोडकर भाग जायेंगे. फिर् हम् लोग सब् पका-पकाया खानाभी खालेंगे. और उन्के कपडे हत्यार वगैरा सब् सामानपर खुब् हात मारेंगे. भागतोंके पीच्छे पडेंगे, भगोडों-की, औरतों बच्चोंको पकड लावेंगे—बच्चोंको गुलाम्, और-तोंको वांदिया बनायेंगे, मजे उडायेंगे. आगे अल्ला जो चाहे सो होगा.

**खान॰**—गरीबपरवर, हम् जान्ते है, ऐसा वख्त् फिर न आयगा. दुष्मन् आपसे दाम्मे आतेहैं, और आपने कियेकी सजा पाते है. खुदा चाहे तो हम् एकी हमूलेमे सामतसिंग, जयसिंग और भीमदेवका सिर कांट लायेंग, और किलेके दरवाजेपर लट-का देंगे; ता, दुसरा कोई सिर् न उठासके. सब हिंदूताबेफरमान् रहे. फिर हिंदुस्थानमे कियामत्तग् आपनाही राज हैं.

**फैजु॰**—हुजूरेआली, अल्ला करेसो हो आप् कहे सो हो. कल् ईर्षादेआलीसे सब् सिरकेवल हाजीर है. दिलोजानसे लडेंगे अप्नी अप्नी दिलावरीकी दाद देगे. दीन आपना गालिब है, जानोमाल दीनका तसद्दुक है, मरगये तो शहीद होंगे-जीते रहे तो गाजी. माल,अरवाब,जानवर, आदमी, औरतें,सब्को पकड लावें-गे, मुसलमान करेंगे, देवल तोडके मस्जिद् बनादेंगे. बुदपरस्तों-

का नाम निशान मिटा देंगे. फिर सब् हमी हम् है, औरोंका क्या काम है.

**जंगी०**—सब हाजरातेहांजीरीन्पर जाहीर हो के ये जो फरमान्शाही हुवा है सब् पर तामील उस्की जुरूर है. लिहाजा कल सूभोंकों सब् अप्ने उठते बराबर, नंगे अप्ने अप्ने हत्यार पकडो, जवामर्दीकी रोजी हत्यारोंके नोंकपर है. बाकी सबने सुन चुके. हे जिआदा कहेना कुच्छ् जरूर नही.

**भोज०**—जनाबेमंद, ये क्या मनशूर है ! ये फर्मानेशाही मसलेहत्से दूर है! खाते वख्त् किसीपर हमला करना जवामर्दीसे बैद है ! अप्ना अप्ना धरम् सबकू प्यारा है. इन्साब फर्माइये. ये सरासर बे इनसाफी है. मेरी मुलाजेमत् और जाफेशानीपर नजर किजीये. मै हुजूरका और सब् अर्कानें दौलतका खेरख्वां हुमारताहूं तुमारी मै इजरात् सब जहांमे बढाई, हर दिनरात् तुभ्कू लाजीम है के पकडो मेरा हातमे हात, और मानो बात् खुप करवाये आबू तो मत करवाव हिंदुओंके धरमकी घातपघात!

**बाद०**—भोजराज, आप् तासुब न करो. ये मझहूबी जंग है, मझहबके बारेमे हम् किसीके माननेवाले नही—

दुष्मनोकी जो सब् खुली है गात् हम् तो अब् मारलेंगे करके मात
आपकी आब नही पसंद् हमे ये तरफ्दारीकी जो करते है बात
आगे तो सब् तुमारी अच्छी थी पर् ये पीच्छेसे बिगडी है सबजात
दीनकी मेख ठोकनी है हमे तुम् न तेढी करो हमारे साथ.

**भोज०**—जनाब, मेरी कदर आप्को नही, आप्के दादामरहू जिंदा होते तो मेरी बात हरगिज्रद् न करते. खैर जिआदा क्या अरज करूं. ऐसी मुलाजिमत्को इस्तिफा देताहूं. इस् मश्गुलीसे माजुली बेहेतर.

**बाद०**—अच्छा हम्कोभी तुमारी कुच्छ् परवा नही—

जातेहो चले जाव यहां चाह किसे है
ख्वाबा तुमारा कौन परवाह् किसे है. ( सर्व सरदारांस )

सब कार परदाजा वो सिपासालारोंकू ताकीद शदीद है के फरमानेशाही सब बजालाये. हुकूम मुकूरर सिकूरर हो चुका कुच्छ तरतुद बाकी नही. ( पडदा पडतो. )

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**–घोरी पावटीच्या किल्यावरील राजकन्या पद्मावतीस नेमून दिलेली जागा.

**रायमल०**– (प्रवेश करून पडद्याकडे कान दिलासा करून) काय? काय म्हणतेस? पद्मावतीबाईंना दोन घांस खाऊं घालतेस म्हणून! बरें जा, जा लवकर. ( विचार केल्यासारखें करून दुःखानें ) हर! हर!! राजकन्येच्या पोटांत शिरणारे हे कांटे पाहून,हे अज्ञागळा रायमला, तुझ्या अंतःकरणांत कल्होळ उठून, आज पुरें एक तप मुसलमानांच्या घरचें अन्न खाऊन या पोसलेल्या शरिराची, शेवटीं भोजराजा प्रमाणेंच दुर्दशा होणार, हें उमजून क्रोधवन्हीनें तुझें हें मठ्ठ शरीर पेट घेत नाहीं! आणि बादशाहपुढें अगणित वेळा वांकविलेलें हें तुझें डोकें फिरून जाऊन, रणमादवायूनें रणांगणीं थैमान करून सोडण्यास तूं अद्याप तयार होत नाहींस! धिक्! धिक्!! धिक् तुझें जिणें!!! राजकन्येबरोबर बंदींत पडलेल्या दासींपैकीं कित्येक दासींनीं एकामागून एक आपले प्राण पटापट सोडून, आपल्या स्वामिभक्तिचा झेंडा दिगंत फडकत ठेवला! आणि तूं, तुझ्या कळांत जे वीरमणी रणमंचकावर अक्षय्य निद्रिस्त झाले, त्यांचें स्मरण डोक्यांतून पार हुडहून देऊन, त्य ठिकाणीं कोणता अमूल्य सांठा भरून ठेवलास!! अजून तरी नामर्दपणानें तुला मारलेली ही मगरमिठी सोडवून, तुझ्यासारखा कुलांगार कारटा जन्मास आला म्हणून, ज्या वृद्ध मातापितरांनीं इहलोकचा आपला अवतार त्वरित आटोपला, त्यांना स्वर्गांतून आनंदाश्रु ढाळायला लाव!!! या क्षणभंगुर आ-

युध्याची भीति बाळगून, आज बारावर्षे शहास खुष ठेवण्याकरितां आपल्या जीवाचा जो आळापिळा केलास, आणि जी उत्सुकता दाखविलीस,तोच उल्हास आतां राजकन्येच्या मुक्ततेसाठीं दाखवून अंशतः तरी जन्माचें सार्थक केलेंस तरच तूं मर्द ! मित्रा जयसिंह, तूं मात्र अखेरी मारलीस! आणि आपल्या शौर्यानें भोजराजांना भूल घालून, त्यांच्या साह्यानें आपली मुक्तता करून घेतलीस ! आणि आतां शहाच्या छातीवर निधास्त चाल करून येण्यास सिद्ध झालास ! या लाजिरवाण्या आयुष्याचा तुला वीट आला, आणि मीं त्यांतच आजपर्यंत सौख्य मानलें आं ! " राजकन्येजवळ सतत राहून तिचें मन वळेल अशी तोड काढ " ह्मणून मला बादशाहाचा हुकूम झाला; कारण मी पडलों या राज्यांतील इमानी नोकर ! मजवर बादशाहाची मर्जी बहाल ! अहो अहमदशाहा पादशाहा,आतां आज्ञेप्रमाणें तोड तर काढतोंच, पण ती राजकन्या आपल्या गळ्यांत माळ घालण्याची नव्हे, तर आपल्या पायांत शृंखला घालून रजपूत राज्यांच्या नगरांतून आपली धिंड केव्हां निघेल, आणि ती कशी निघेल याचीच ! भोजराजासारखा मोहरा तुम्हीं हांकून दिल्यामुळें आतां मलाच कंबर खेंचली पाहिजे. ( विचार केल्यासारखें करून, पडद्याकडे पाहतो, आणि पद्मावती येत आहे असें पाहून ) शिव ! शिव ! ! राजकन्येच्या या दीन स्थितीकडे पाहण्यापेक्षां, या नेत्रांच्या खांचा झाल्या असत्या तर फार चांगलें झालें असतें ! ! ( पद्मावती प्रवेश करते ).

**पद्मा०**–रायमल, काय झालं त्या कामाचं ? भोजराज काय ह्मणाले ? या अनाथ गाईची त्यांना करुणा येऊन त्यांनीं मला परत आईबापांकडे पाठविण्याची कांहीं तोड काढली का हो ? आतां किनई हा जीव अगदीं नकोसा झाला ! हे मेले प्राण या कुडींतून एकदम निघून जातील तर फार चांगलं होईल! माझे बाबा—माझी आई--तीं मला पुन: आतां कुठलीं भेटायला ? झालं इथंच आमची मजल संपली ! पण अजून मेला जीव घों-

टाळतो ! माझ्या दासी पैकीं कितीएक जणींनी तरी शोकानें व्याकुळ हो-ऊन यमाच्या घरची वाट केव्हांच धरली ! आणि मीं आपली इथंच स्वस्थ !! रायमल, तुम्हीं बोलत हो कां नाहीं ? भोजराजासारख्या वृद्धांची सुद्धां मति पालटली नां ? पण यांत नवल तें कोणतं ? हा खाल्लेल्या अन्नाचा गुण आणखी दुसरं काय !!

**राय०**–बाईसाहेब, या हतभाग्याला स्वतःच कंबर बांधण्याचा प्रसंग आला आहे,म्हणून म्हणतों कीं, या सेवकाकडून आतां सेवा घ्यावी. भोजराजासारखा मोहरा भरदरबारांतून कुत्र्यासारखा हुसकून देऊन, अहमदशाहानें आपल्या अक्कलेची कमाल केली! ज्यानें हा पातशाही राजस्तंभ आज पन्नास वर्षे एकनिष्ठेनें उचलून धरिला, त्या भोजराजाचा आधार सुटल्यावर आतां हां हां म्हणतां हे अक्कलेचे खंदक, दाही दिशा फांकून जातील यांत शंकाच नाहीं !!

**पद्मा०**-काय म्हणता ? भोजराजांना भरदरबारांतन हांकून दिलं! आणि आतां या अभागीच्या कपाळीं विटंबनं शिवाय दुसरं काय उरलं आहे! या शरीराला हे दुर्जनरूप किडे लागल्यावर याला निमिषमात्रांत मातीला नेऊन मिळवितील वरं !!

**राय०**—असा शोक करून स्वस्थ बसण्याची ही वेळ नाहीं. विचारानें मनाला धीर देऊन दिवस कंठले पाहिजेत. आतांच दरबारांत दोन फकिरांनीं अशी बातमी आणिली आहे कीं, ईडरचा राणा भीमदेव आपली एकजात निवडक पन्नास हजार स्वारांची मांड घेऊन महाराज सामतसिंह आणि माझा मित्र जयसिंह यांना मिळाला असून थोडक्याच दिवसांत घोर रणकंदन सुरू होणार ! राणा भीमदेवाचें नांव ऐकतांच या तुर्कांच्या तोंडचें पाणी पळून, खुद्द शहानें धीर सोडल्यासारखें केलें आहे ! माझ्या तोंडून आपण भीमदेव महाराजांच्या पराक्रमाच्या अनेक गोष्टी ऐकल्याच आहेत ?

**पद्मा०**—आई जगदंबे, त्या संग्रामसिंहाला लढाईंत यश देऊन, या चिखरांत रुतलेल्या गाईची सुटका करीव एवढंच तुझ्या-

जवळ पदर पसरून मागणं आहे! रायमल, मी आपल्या घरीं सुखरूप परत जाईपर्यंत, तुम्ही या तुमच्या बहिणीची अब्रू संभाळा आणि या चांडाळाच्या घरीं आजपर्यंत, जशी माझी पाठ राखलीत, तशीच तीपावतो राखा, एवढंच आपल्यापाशीं मागणं आहे. रायमल, मीं मागल्या जन्मीं असं कोणतं पातक केलं होतं, कीं त्याचं फळ मी अशा रीतीनं भोगीत बसले आहें! राजकुलांत जन्म घेऊन माझ्या कपाळीं हे असेच का वनवास! आणि मी अशीच का सुखी राजकन्या! म्हातारपणीं मी आईला, बाबांना, दुःख द्यायला कां हो जन्माला आलें! माझी आई आणि माझे बाबा किती हो शोक करीत असतील! तो विचार मनांत आला म्हणजे पोटांत कसं अगदीं तोडूं लागतं! रायमल, रात्रंदिवस पाणी गाळून गाळून हे डोळे अगदीं कोरडे ठणठणीत झाले! आणि अन्नाचा रस पोटांत जाऊं लागेनासा होऊन हातपाय अगदीं मोडल्यासारखे झाले!!

**राय०**—बाईसाहेब, प्रत्यक्ष काळाचाही समाचार घेणारे, हा विस्तीर्ण आकाशमंडप एका तडाक्यानें खालीं हाणून पाडणारे, कैलासपर्वताचें एका आघातानें चूर्ण करणारे, एका बाणानें पाताळांतली गंगा वर आणणारे, आणि आपल्या निःसीम भक्तीनें ईश्वराला वाटेल तसा वांकविणारे पांडव—प्रत्यक्ष ईश्वराचे अवतार—यांना सुद्धां ग्रहांची पीडा होऊन ते गाय होऊन जाऊन परसेवेचा तुकडा आणि वनांतील कंदमुळें तोंडांत कोंबू लागले तेथें आपला काय पाड! श्रीकृष्णानें कौरवांच्या पातकांचे पूर्ण घडे भरतांच जसें पांडवांस सहाय होऊन दुष्टांचें निर्दालन केलें! तसेंच प्रत्यक्ष कृतांतानें राणा भीमदेवाच्या आंगांत संचार करून त्यास रणसंग्रामास उद्युक्त केलें आहे! आतां लवकरच रणदेवींच्या भयंकर जबड्यांत हजारों तुर्कांची आहुति पडेल, आणि समरभूमीवर त्यांच्या प्रेतांचा प्रचंड ढीग पडेल!!!

**पद्मा०**—त्या महा साध्वी द्रौपदीची पुण्याई सबळ, म्हणून तिला श्रीकृष्णानं सहाय होऊन दुःखमुक्त केलं! हे द्वारका-

धीशा नारायणा, या अभागीची तुला करुणा येऊन, हिला सोडीव एकदां! त्या महासाध्वीनं आपल्या शब्दांनीं तुला कसा आळवला बरं!

( गाणें. )

रतिपतीचा तूं तात, नको घेऊं अंत, धांवण्या कसा कीर-तोस, कसा करितोस। दुर्जनें सोडिली वेणी कर उपाय काय पहातोस॥ तूं क्षिराब्धिजामात, लक्ष्मीकांत, इंदिरावरा कठीण होतोस, कठिण होतोस। देह टाकूं पाहे प्राण असुडली मान, अजुनी अंत किती पाहतोस॥ ( चाल ) किती आठवूं तुजला यादव कुळटीळका। तूं आत्मजीवाचा सखा मोक्ष-दायका। तूं अनंत रुप हरी ब्रम्हांडपालका। वेळ मजवर मोठि दाखिव आत्मपादुका। ( चाल ) कौरव लागले पाठी, ऐक जगजेठी, सांगते तुजला। दुर्जन माजले जबर, नाहीं तुज खबर, गांजिती मजला। ( चाल ) शतवर्ग मिळोनी थोर। शतवर्ग मिळोनी थोर, एकची घनघोर वेढा घातिला। मी येथें एकली गाय। मी येथें एकली गाय, करावें काय, सोडवो मजला। ( चाल ) अघटीत करुनी उपाय। ये त्वरा धांवण्या धांव। तारका तार मशीं पाव। ब्रीदाचें जाईल नांव। ( चाल बदलून ) दुःख जबर कसें साहील, साहील। नावेरे प्राण जाईल, जाईल। धांव ऐकुनि बंधु येईल, येईल। ( चाल ) मी तुझी भक्त म्हणवितें मार्ग न्याहाळितें जगत्रजनना रे जगत्रजनना। अंडजावरी होई स्वार त्वरेनें चाल मारी दुर्जना॥ ( मध्येंच भोजराज आला असें पाहून रडूं लागते. )

**भोज०**-मुली हें काय ? खऱ्या रजपुत बेटीचा हा अलंकार आणि हें शस्त्र नव्हे ! खरें शस्त्र ( कट्यार पुढें करून ) हेंच ! आज मी चाललों, उद्यां रायमल जाईल,-आम्हां लोकांवरील विश्वास क्षणिक होय ! पण हा मात्र तुझा खरा मित्र आणि हेंच तुझें खरें शस्त्र ! धर हें हातांत. कांहीं बिकट प्रसंग आला तर हेंच तुझ्या उपयोगी पडेल ! ( पद्मावती कट्यार घेते ).

**पद्मा०**—आतां माझी सुटका येथून होणार तरी कशी ? आणि मला आशा धरायला तरी आतां काय उरलें आहे ? मी म्हणतें, मलाही बरोबर घेऊन चला, म्हणजे पुढच्या हाल अपेष्टा तरी सोसाव्या लागणार नाहींत ! महाराज, मी आतां कोणाच्या तोंडाकडे पाहून दिवस कंठावेत ! आपण मला माझ्या बाबांच्या सारखे, म्हणून म्हणतें कीं, एकदां आपल्या अंकावर दिलेली ही मान ( कट्यार पुढें करून ) या शस्त्रानें आपल्याच हातांनीं उतरा आणि मग चला ! !

**भोज०**—हा रायमल, त्याच्या जीवांत जीव आहे तों-पर्यंत तुझ्या केसाला सुद्धां ढका लावूं देणार नाहीं. ( रायमला-कडे वळून ) रायमला, तुझ्या अकलेची, तुझ्या राजनिष्ठेची, आणि तुझ्या कर्तृत्वाची पारख होण्याची ही अमूल्य संधि तुला मिळाली आहे ! बादशहाला तूं मोठा प्यारा झाला आहेस, तेव्हां स्वराजकुलाच्या सेवेचा हा योग दवडूं नकोस येवढेंच सांगणें आहे. तूं धूर्त आहेस, तेव्हां तुला फोडून सांगण्याचें कांहीं कारण नाहीं. माझ्या प्रमाणें तुझी ही उचलबांगडी जर झालीच, आणि ( पद्मावतीकडे वळून ) पद्मावती, जर कांहीं अवघड प्रसंग आलाच तर घे हे शस्त्र उरांत खुपसून आणि सुट या जाचांतून ! ! कोणत्याही रीतीनें आपल्या कुळाला बट्टा लागेल असे वर्तन कधींही करूं नकोस ! तूंही चतुर आहेसच.

**पद्मा०**-महाराज, आपला आशीर्वाद असावा, म्हणजे तोच माझें रक्षण करील !

**भोज०**-तो सर्व साक्षी कनवाळू परमेश्वर लवकरच तुझी

आणि तुझ्या आईबापांची भेट करवील, आणि योग्य पतीशीं तुझा विवाह होऊन तूं आनंदांत नांदशील !

**राय०**—आपल्या समक्ष हा प्राण राजकन्येच्या चरणीं अर्पण केला आहे ! हा देह जमिनीवर पडेपर्यंत मी आपल्या ब्रीदाला विसरणार नाहीं ! !

**भोज०**–मुली, पुरे कर हा अश्रुपात! राणाभीमदेवासारखा वीरबाहू आणि जयसिंहा प्रमाणें रणधीर खवळून गेल्यावर पृथ्वी भयानें कंपायमान होईल!मग या तुर्कांची काय कथा !! रायमलावर पूर्ण विश्वास ठेऊन स्वस्थ राहा, म्हणजे परमेश्वर तुला सुखरूप ठेवील ! अरण्यांत गेल्यावर तेथलें वैभव मला कांहीं कमी नाहीं ! कंदमुळा सारखें अन्न, स्वच्छ झऱ्याचें पाणी, गिरीगुहेसारखें घर, लतापत्रा सारखा मऊ बिछाना, मनाचें रंजन करून घेण्यास चंद्रकिरण, हरिणें आणि हिंस्र पशू यांच्या सारखे स्नेही, आणि रात्रंदिवस परमेश्वराचें ध्यान अशा सर्व गोष्टींची अनुकूलता असल्यावर मग काय कमी ! ! मुली आनंदानें राहा.

( पडदा पडतो. )

**भोज०**—या तुर्कांच्या सेवेला हा अखेरचा सलाम आणि यांच्या या अपवित्र देहांचा या नेत्रांना शेवटचाच विटाळ ! ! या अहमदशाहाच्या आजापासून तों आज तागायत नेकीनें आणि इभ्रतीनें नौकरी बजावून अखेर हा परिणाम व्हावा आं ! थोडी सरशी झाली नाहीं तोंच यांनीं चढून जाऊन, अंगावर चढलेल्या निशेंत माझा असा अपमान करावा आं ! आमच्या आजापणजांनीं, आमच्या बापानें, आणि शेवटीं मींही आपले सगळें जन्म स्वदेश, स्वबांधव आणि स्वधर्म यांची पायमल्ली करणाऱ्या या तुर्कांच्या सेवेंत घालविलें आं ! या अहमदशाहाचा आजा, सुलतान मुजफरखान, यानें जेव्हां पाटणचा राजा, मंडलगडचा राजा, झालवाड्याचा राजा, आणि ईडरचा राजा रणमल्ल यांच्याशीं सा-

मना बांधला, त्यावेळीं त्यानें माझीच सल्ला घेतली होती ! त्याच रणमल्लाचा मुलगा राणाभीमदेव आतां पूर्वीचा सूड उगवून घेण्याकरितां आला आहे! ज्यानें आपल्या आज्यास विषाचा प्याला देऊन राज्य बळकाविलें, तो हा अहमदशाहा रजपूत लोकांवर रहेम करणार आहे काय ! ! आम्हीं आपली डोकीं या तुर्कांच्या पुढें घांसून घांसून आमच्या कर्तबगारीची आणि आमच्या शहाणपणाची ही अखेर करून घेतली आं! राजकारणांच्या मसलतींचा विचार करून करून, या बथ्थड झालेल्या डोक्यांतून, मोक्ष मार्ग सुगम करून घेण्याची शक्कल आतां कोठून निघणार ! ! आणि तारुण्याचा जोम निघून गेलेलें हें शरीर ईश्वराच्या खडतर सेवेला कसें टिकणार !!! यमराजानें या प्राण्याला आपल्या पुरींत नेण्याकरितां, याला सजविण्यास सुरवात केली ! आतां आमची इहलोकची वस्ती किती दिवस टिकणार ! या शरीरावरची कांति आणि तेज पार नाहींसें होऊन, हीं कातडीं सुरकतून जाऊन सर्वांगावर पांडुरता आली ! पूर्वींच ते काळेभोर केश, आतां पांढरे स्वच्छ झाले ! अंगातली धमक नाहींशी होऊन गात्रें शिथिल पडलीं ! या नेत्रांतील तें पूर्वींचें तेज नष्ट होऊन दृष्टि अंधुक झाली ! आणि यांतून पू वाहूं लागला ! तांबूल खाऊन ज्या तोंडाला पूर्वीं घमघमाट येत असे त्याच तोंडांतून आतां लाळ झिरपूं लागली ! ती शुभ्र दंतपंक्ति अदृश्य होऊन तोंडाचें बोळकें झालें ! ज्या जिव्हेनें पूर्वी रसाळ शद्ब काढावेत तीच जिव्हा पंकी रुतलेल्या ढोरा प्रमाणें लुळी पडली ! वाऱ्यानें जसें गवत हलतें तसा या शरिराला कंप भरला ! आणि आतां आम्ही परमेश्वराला कसे आळवणार ! ! तारुण्याच्या भरांत मौजा मारून वृद्धपणीं परमेश्वरास वश करून घेण्याच्या मार्गास लागूं असा जे कोणी मूढ संकल्प करीत असतील त्यांनीं ही माझी स्थिति पाहून वेळींच सावध व्हावें !!! आतां रानांत जाऊन त्या ठिकाणीं कृतकर्माचा पश्चात्ताप करून राहिलेलें आयुष्य कंठणार ! पण अहमदशाहा तूं पक्कें ध्यानांत ठेव कीं, रजपूत शूर बच्चे

तुझ्या या धुंद झालेल्या नेत्रांत चांगलेंच अंजन घालतील ! तुझे हजारों लोक रणांत पडून, तुम्हा लोकांचा नकशा खालीं उतरेल ! तुमचे कच्चे बच्चे तुम्हाला गिरफतार करतील ! तुम्हाला विषाचे पेले देतील ! तुमचे खून करतील ! ! आणि तुमचे हाल हाल करून, तुम्हांला ठार करतील !!! ( पडदा पडतो. )

## अंक दुसरा समाप्त.

---

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

### स्थळ—जुनागड शहर-जयसिंहाच्या वाड्यांतील दिवाणखाना.

( चंपावती मुलाला घेऊन त्याच्याकडे पहात पहात प्रवेश करते. )

**चंपा०**—कार्टे, तुला आतां असं घेऊन कुठवर तरी बसावं ? खालीं ठेवायचा उशीर कीं गुलाबाच्या अंगाला जसे कांटे बोचतात ! बा ! राग भरलेलं कसं तेव्हांच समजतं ! हां, जर का आतां रडवं तोंड केलंस तर बघ मग.-दुसऱ्याजवळ अगदीं जायला नको. अजून तुला नाहीं का झोंप येत ? आतां घरीं यायचं झालं. म्ह-

णजे सांगेन, कीं आपल्या मुलाला आतां आपणच संभाळा. हा मला अगदींच सोडीत नाहीं. (त्याला खेळवीत.) हां, पसरलं एकदां तें बोळकं!—तुझ्याशीं आपलं असंच खेळत बसावंका सगळ्या दिवसभर? मघापासून एक प्रहर झाला, अशी घेऊन बसलें आहे. आतां किनई माझ्या हाताला कळ लागली बरंका— अम्मळ मोठा झालास म्हणजे या गमजा कशा चालतात तें पाहीन मग! ( **जयसिंह** प्रवेश करतो. )

**जय०**—कोणाशीं चालल्या आहेत या लांब लांब गोष्टी? दिलीपाशीं कीं काय? त्याला इतक्यांतच गोष्टी सांगायला यायला लागल्या वाटतें!

**चंपा०**—अस्सं याच्याशीं गोष्टी सांगत बसावं लागतं बरंका दिवसभर! अशी एकसारखी टकळी चालवावी तेव्हां रडं थांबतं! आतां किनई आपणच याला संभाळावं—एकदां अनुभव आला म्हणजे बरं!

**जय०**—( मुलास घेऊं लागतो-मुलगा तोंड रडवें करतो असें पाहून ) वा! ( ओरडून ) हां, खबरदार रडें आणलेंस तर—

**चंपा०**—( मुलास परत घेऊन रागानें ) इतकं नको कांहीं मोठ्यानं ओरडायला! त्याला धाक दाखवायाला तो का मोठा का झाला आहे? तरी बरं याला आम्हीच नेहमीं संभाळतों. असं हिडीस पिडीस केलं तर पोरगं आंग तरी धरील का? ( मुलास ) उगा! उगा! तुला नाहींहो. (त्याला पदराखालीं घेते. तो रडायचा राहिला असें पाहून ) मी नाहीं गडे, पण खरंच सांगायचं होईना हा कुणासारखा आहे तो?

**जय०**—खरोखर हा मातृमुखी आहे. ( मुलाकडे पाहून ) हा लबाडा, तें हसणें बघ अगदीं तुझ्यासारखें; हसतांना गाल बघ अगदीं तुझ्यासारखेच खोल जातात! तें डोळ्यांचे पाणी, ती नाकाची ठेवण, अगदीं हुबेहुब तुझीच प्रतिमा!

**चंपा०**—आणि हे जावळाचे कुरळे केश, ही कपाळाची पट्टी, हे सडक हात, आणि हीं सुरेख पावलं ! नकोबाई ! ( मुलास पोटाशीं घट्ट धरून ) माझ्या सोनक्याला दृष्ट लागेल ! !

**जय०**—बायकांना मूल झालें, कीं नवऱ्यावरची त्यांची प्रीति कमी झालीच म्हणून समजा ! त्यांचें लक्ष मग दोन ठिकाणीं वाटलें जातें. !

**चंपा०**—आपलं कांहींतरी बोलायचं झालं. मुलासारखा दुसरा प्रीतीचा ठेवा तो कोणता ! भलतंच कांहींतरी—मूल झालं म्हणजे प्रेम अधिक वाढतं का कमी होतं ? आमचं बायकांचं असं नाहीं हो —

**जय०**—खरेंच का हें ? कां आपलें उगाच तोंडापुरतें. ?

**चंपा०**—खरंच म्हणजे सगळ्या जगांत आपण नेहमीं पहात नाहीं का ? कीं पहिल्यानदां नुसते कांहीं दिवस गेले आहेत इतकं कळलं पुरे, उभयतांना किती म्हणून आनंद होतो. ! आणि पुरुष थट्टा करायला लागले म्हणजे बायकांना केवढा अभिमान चढतो ! एकदां हातींपायीं सुटून मुलगा झाला, म्हणजे उभयतांच्या मनाला केवढा उल्हास वाटतो ! केवढी धन्यता वाटते ! ! मग मुलगा रांगत एकमेकांकडे जाऊं येऊं लागला, म्हणजे उभयतां मुलाला पोटाशीं धरून, त्याला आनंदाश्रुनीं न्हाऊं घालतात ! आणि मुलगा बोबड्या शब्दांनीं उभयतांच्या नांवानं हाका मारूं लागून, बाळक्रीडा खेळं लागला म्हणजे तर उभयतांचा आनंद गगनांत माईनासा होतो ! ! मुलाला सोडून दूर होऊंनये, त्याच्या प्रत्येक गोष्टीचं कौतुक करावं, असा नाद लागतो. ! मग बाई, या सर्व गोष्टींवरून इकडची प्रीति मुलं ओढून नेतात, कीं द्विगुणित करतात तें आपणच सांगायचं. ?

**जय०**—लाडके, तूं तर मला अगदीं थक्क केलेंस. ! !

**चंपा०**—( मुलाचा मुका घेऊन. ) ही सगळी सोमनाथाची कृपा आहे ! ( ती मुलास खेळवते. जयसिंह साचित बसतो. ) अग बाई,

णजे सांगेन, कीं आपल्या मुलाला आतां आपणच संभाळा. हा मला अगदींच सोडीत नाहीं. ( त्याला खेळवेत. ) हां, पसरलं एकदां तें बोळकं !–तुझ्याशीं आपलं असंच खेळत बसावंका सगळ्या दिवसभर ? मघापासून एक प्रहर झाला, अशी घेऊन बसलें आहे. आतां किनई माझ्या हाताला कळ लागली बरंका— अस्मळ मोठा झालास म्हणजे या गमजा कशा चालतात तें पाहीन मग ! ( **जयसिंह** प्रवेश करतो. )

**जय०**—कोणाशीं चालल्या आहेत या लांब लांब गोष्टी ? दिलीपाशीं कीं काय ? त्याला इतक्यांतच गोष्टी सांगायला यायला लागल्या वाटतें !

**चंपा०**—अस्सं याच्याशीं गोष्टी सांगत बसावं लागतं बरंका दिवसभर ! अश्शी एकसारखी टकळी चालवावी तेव्हां रडं थांबतं ! आतां किनई आपणच याला संभाळावं—एकदां अनुभव आला म्हणजे बरं !

**जय०**—( मुलास घेऊं लागतो–मुलगा तोंड रडवें करतो असें पाहून ) वा ! ( ओरडून ) हां, खबरदार रडें आणलेंस तर—

**चंपा०**—( मुलास परत घेऊन रागानें ) इतकं नको कांहीं मोठ्यानं ओरडायला ! त्याला धाक दाखवायाला तो का मोठा का झाला आहे ? तरी बरं याला आम्हींच नेहमीं संभाळतों. असं हिडीस पिडीस केलं तर पोरगं आंग तरी धरील का ? ( मुलास ) उगा ! उगा ! तुला नाहींहो. (त्याला पदराखालीं घेते. तो रडायचा राहिला असें पाहून ) मी नाहीं गडे, पण खरंच सांगायचं होईना हा कुणासारखा आहे तो ?

**जय०**—खरोखर हा मातृमुखी आहे. ( मुलाकडे पाहून ) हा लबाडा, तें हसणें बघ अगदीं तुझ्यासारखें; हसतांना गाल बघ अगदीं तुझ्यासारखेच खोल जातात ! तें डोळ्यांचें पाणी, ती नाकाची ठेवण, अगदीं हुबेहुब तुझीच प्रतिमा !

**चंपा०**—आणि हे जावळाचे कुरळे केश, ही कपाळाची पट्टी, हे सडक हात, आणि हीं सुरेख पावलं ! नक्कोबाई ! ( मुलास पोटाशीं घट्ट धरून ) माझ्या सोनक्याला दृष्ट लागेल ! !

**जय०**—बायकांना मूल झालें, कीं नवऱ्यावरची त्यांची प्रीति कमी झालीच म्हणून समजा ! त्यांचें लक्ष मग दोन ठिकाणीं वाटलें जातें. !

**चंपा०**—आपलं कांहींतरी बोलायचं झालं. मुलासारखा दुसरा प्रीतीचा ठेवा तो कोणता ! भलतंच कांहींतरी—मूल झालं म्हणजे प्रेम अधिक वाढतं का कमी होतं ? आमचं बायकांचं असं नाहीं हो—

**जय०**—खरेंच का हें ? कां आपलें उगाच तोंडापुरतें. ?

**चंपा०**—खरंच म्हणजे सगळ्या जगांत आपण नेहमीं पहात नाहीं का ? कीं पहिल्यानदां नुसते कांहीं दिवस गेले आहेत इतकं कळलं पुरे, उभयतांना किती म्हणून आनंद होतो. ! आणि पुरुष थट्टा करायला लागले म्हणजे बायकांना केवढा अभिमान चढतो ! एकदां हातींपायीं सुटून मुलगा झाला, म्हणजे उभयतांच्या मनाला केवढा उल्हास वाटतो ! केवढी धन्यता वाटते ! ! मग मुलगा रांगत एकमेकांकडे जाऊं येऊं लागला, म्हणजे उभयतां मुलाला पोटाशीं धरून, त्याला आनंदाश्रूंनीं न्हाऊं घालतात ! आणि मुलगा बोबडया शब्दांनीं उभयतांच्या नांवानं हाका मारूं लागून, बाळक्रीडा खेळूं लागला म्हणजे तर उभयतांचा आनंद गगनांत माईनासा होतो ! ! मुलाला सोडून दूर होऊंनये, त्याच्या प्रत्येक गोष्टीचं कौतुक करावं, असा नाद लागतो. ! मग बाई, या सर्व गोष्टींवरून इकडची प्रीति मुलं ओढून नेतात, कीं द्विगुणित करतात तें आपणच सांगायचं. ?

**जय०**—लाडके, तूं तर मला अगदीं थक्क केलेंस. ! !

**चंपा०**—( मुलाचा मुका घेऊन. ) ही सगळी सोमनाथाची कृपा आहे ! ( ती मुलास खेळवते. जयसिंह सचिंत बसतो. ) अग बाई,

बोलायचं कां नाहीं ? आतांशा असं झालं आहे तरी काय ? मधेंच असं सोचत कां बसायचं ? रात्रंदिवस मनाची तळमळ, स्वस्थ झोंप नाहीं, नेहमीं विचारांत गुंग, ही सगळी कृति माझ्या ध्यानांत का येत नाहीं ? पण खरंच मला नाहीं का सांगायचं ? काय होत आहे तें. ?

**जय०**—कांहीं नाहींग, वेडी नाहींतर—कांहीं तरी म्हणतेस—

**चंपा०**—असं काय बरं, मला सांगण्यासारखं का नाहीं ? मी आज किती दिवस असं पाहते आहे.—पण किनई विचारण्याचा धीरच होत नाहीं. आज मला कळलंच पाहिजे. आपली अशी स्थिति पाहून मला कांहीं गोड का लागतं ! पण सांगायचंना ? असं काय तें ?

**जय०**—अगोदर मला वचन दे, कीं मी जसें सांगेन तसें ऐकशील म्हणून. हट्ट धरून बसणार नाहींस, संतोषानें मी सांगेन तसें कबूल करशील, असें वचन देशील तर सांगतों ?

**चंपा०**--म्हणजे, मी आजपर्यंत कधीं आपल्या मर्जीबाहेर वागले आहे का ? कधीं आपलं एकलं नाहीं, हट्ट धरून बसले, आपली अवज्ञा केली, आपल्या सुखाकडे दुर्लक्ष केलं, असं कधीं तरी झालं आहेका ? मग बाई आतांच वचन तें कशाला हवं ! खरंच मी आपण सांगाल तशी वागेन. पण सांगायचंना एकदां ?

**जय०**— लाडके, या प्रांती सर्वत्र यवनमय होण्याचा समय अगदीं जवळ आला आहे ! राजकन्या पद्मावती तुर्कांच्या हातीं लागून सर्व रजपुतांच्या तोंडाला काळोखी लागली ! तुर्कांनीं कालच घोरीपावटीचा किल्ला सही केला ! महाराज सामतसिंह यांचें धैर्य सुटलें आणि सर्व सरदार माना खालीं घालून बसले !। ही स्थिति पाहून भीमदेवानें सर्व सरदारांस धीर देऊन महाराजांचें एकांतीं सांत्वन केलें ! " स्वारीचें आधिपत्य राणा भीमदेवानें संभाळावें " म्हणून महाराजांनीं आज्ञा केली आणि समा-

गमें मींही निघावें असें सुचाविलें. " स्वामीची आज्ञा सिरसा वंद्य आहे, " असें भीमदेवानें उत्तर देतांच महाराजांनीं भमिदेवास पोषाक व विडे देवाविले ! राजघराण्यांत केवढा आकांत गुदरला आहे म्हणून सांगूं !

**पद्मा०**—राजवाड्यांतिल दासी आतांच इथें आली होती, तिनं मला ही गोष्ट सांगितल्यापासून मनाला कांहीं गोड लागत नाहींसं झालं आहे ! दैव फिरलं तेथें कोणाचा उपाय ! !

**जय०**—लढाईची कडेकोट तयारी होऊन राजघराण्यांतील आणि इतर रजपूत स्त्रिया आणि मुलेंबाळें गिरनार किल्ल्यांत पाठविण्याचा सरकारांतून हुकूम सुटला असून, तुलाही तिकडेच गेलें पाहिजे. तर आतां हांसत मुखानें " मी आनंदानें जातें " असें म्हण, म्हणजे झालें.

**चंपा०**—अगबाई, लढाईचं नांव ऐकलं म्हणजे आंगावर कांटाच उभा राहतो ! मला एकटीला कसं करमेल कोणजाणं ! मनांत मेल्या नाहीं नाहीं तसल्या कल्पना येऊन पोटांत भडभडून येईल ! रात्रंदिवस डोळ्याला डोळा लागणार नाहीं ! आपलं कसं होईल, काय होईल, अशी एकसारखी उरांत धडकी भरेल ! मला उभेवारे सुटतील ! हें सगळं खरं, पण माणीक जसं साहाणेवर लावून जिल्हई केलं असतां शोभतं, तसा रणशूर पुरुष जखमा लागूनच शोभतो ! ! आणि तशांत रजपूत पुरुषांच्या रणोत्साहाला तर उपमाच नाहीं ! ! बाई अंबाबाई, एकदां सुखरूप घरीं परत आण, म्हणजे तुझा उत्सव करूं ! खरंच, आपण विजयी होऊन आलांत म्हणजे सोमनाथाच्या नांवानं लक्षभोजन घालायचं बरंका ! !

**जय०**—( मनाशीं ) परमेश्वरा, अशी धूर्त आणि स्नेहार्द्र स्त्री, आणि राणा भीमदेवासारखा विपत्समयींही धीर देणारा मित्र, या दोन धनांची जोड देऊन तूं मला धन्य केलेंस ! !

**चंपा०**—राणा भीमदेव अजून आले नाहींत ते ? आपण उभयतां एकदमच निघणारना ?

**जय०**—भीमदेव म्हणजे आम्हां रजपुतांचा कलीजा आहे ! आपणांवर त्यानें जे उपकार केले आहेत त्या ऋणांतून यावज्जन्म मी त्याचें दास्य केलें तरी मुक्त होणार नाहीं ! !

**चंपा०**—त्यांच्याच योगानें हे सोन्याचे दिवस आपल्याला दिसले ! त्यांनीं इकडे अगदीं पाठच्या भावाप्रमाणं मानलं आहे ! !

( भीमदेव प्रवेश करितो ).

**जय०**—भीमदेव आलाच वाटतें. हो, तोच ! मित्रा, ये बस. निघायचेंना आतां ? दिलीपाला भेट म्हणजे निघूंच.

**चंपा**—(मुलाला भीमदेवापाशीं देतां देतां) लबाड ! तोंडाकडे पाहून हंसतो आहे ! तुला ओळख आहे कारे ?

**भीम०**—( मुलाचा मुका घेऊन ) याला फार जपा बरें; नीट संभाळा, आणि आनंदानें रहा. किल्ल्याकडे बहुतेक स्त्रिया गेल्याच. ( मुलास जयसिंहाजवळ देतो, जयसिंह त्यास चंपावती-जवळ देतो. ) मित्रा आतां उशीर नको. ( वाद्यांचा गजर ऐकूं येतो ) ऐक, रणवाद्यें वाजूं लागून, मंडळी निघाली. चल.

**चंपा०**—( भीमदेवाकडे पाहून ) म्हटलं, माझी बरोबर येण्याची सोय ?

**भीम०**—वेड लागलें कीं काय ? रजपुतांनीं रणांत बायका नेल्याचें कधीं ऐकलें आहे काय ? मुसलमानांत जनान-खाना बरोबर नेतात, परंतु रजपूत अणीबाणीचा वख्त आला, तर आपल्या बायकामुलांची कत्तल करून "जयहर ! जयहर ! !" करीत शत्रूवर तुटून पडतात ! आणि शत्रूच्या रक्तांत शस्त्रें भिज-वतात !! पण आपल्या बायकांचें नखसुद्धां दृष्टीस पडूं देत नाहींत ! देवावर भार टाकून, तूं स्वस्थ ऐस म्हणजे झालें. जगदंबेला नमस्कार करून पड घराच्या बाहेर म्हणजे सर्व कांहीं मनासारखें होईल !

**चंपा०**—( गहिंवरून जातां जातां ) आतां माझ्यानं जास्त कांहीं बोलवत नाहीं । रणांत रामलक्ष्मणांसारखे एकमेकांच्या

पाठीवर असा म्हणजे झालं ! ! ( जयसिंह चंपावतीकडे पहात व चंपावती जयसिंह व भीमदेव यांच्याकडे पहात, जयसिंह व भीमदेव एका बाजूनें व चंपावती दुसऱ्या बाजूनें अशीं निघून जातात. )

---

## प्रवेश दुसरा.

### स्थळ—श्रीसोमनाथाचें मंदिर.

श्रीमच्छंकर विरूपाक्ष दक्षमखविक्षेपकर भक्तजनरक्षणार्थातिदक्ष रक्षोगणलक्षशिक्षक भवभक्षक तक्षकभूषण नक्षत्रवरधर धृताक्षमाल स्वपरपक्षविवर्जित कामाक्षीवर सुराध्यक्ष निरपेक्षातिसुक्ष्मालक्ष्य ब्रम्हन् भूतिवलक्ष भगवन् सज्जनवनवसंत मदनांतक महावैष्णवानाद्यंत वेदांन्तवेद्य श्रुतिसार संसारविध्वंसकर प्रणतसुरनरकिन्नरयक्षोरगराक्षसगणगंधर्व गर्वरहित सर्वपदनिर्विकार निर्वाणभेषज सर्वाभिष्टकर निरंतरं शिव ते स्मरामि ॥ १ ॥

( वरील शिवस्तुति चालली असून कित्येक ब्राम्हण श्रीसोमनाथावर रुद्राचें आवर्तन करीत आहेत असा पडदा उघडतो. )

प्रथम सर्व सरदार, दरकदार वगैरे मंडळ, व मागून जयसिंह, भीमदेव, सामतसिंह असे प्रवेश करतात.

**सामत०**—( शंकरास हात जोडून प्रणाम केल्यावर )

जटाटवीगलज्जलप्रवाहपावितस्थले ।
गलेऽवलंब्य लंबितां भुजंगतुंगमालिकाम् ॥
डमड्डमड्डमड्डमन्निनादवड्डमर्वयं ।
चकार चंडतांडवं तनोतु नः शिवः शिवम् ॥ १ ॥

जटाकटाहसंभ्रमभ्रमन्निलिंपनिर्झरी- ।
विलोलवीचिवल्लरीविराजमानमूर्धनि ॥
धगद्धगद्धगज्ज्वलल्ललाटपट्टपावके ।
किशोरचंद्रशेखरे रतिः प्रतिक्षणं मम ॥ २ ॥

**भीम०**—( शंकरास प्रणाम करून )

प्रफुल्लनीलपंकजप्रपंचकालिमप्रभा- ।
बलंबिकंठकंदलीरुचिप्रबद्धकंधरम् ॥
स्मरच्छिदं पुरच्छिदं भवच्छिदं मखच्छिदं ।
गजच्छिदांधकच्छिदं तमंतकच्छिदं भजे ॥ ४ ॥
अखर्वसर्वमंगलाकलाकदंबमंजरी- ।
रसप्रवाहमाधुरीविजृंभणामधुव्रतम् ॥
स्मरातकं पुरांतकं भवांतकं मखांतकं ।
गजांतकांधकांतक तमंतकांतकं भजे ॥ २ ॥

**जय०**—( शंकरास नमस्कार करून )

प्रचंडवाडवानलप्रभाशुभप्रचारिणी ।
महाष्टसिद्धिकामिनीजनावहूतजल्पना ॥
विमुक्तवामलोचनाविवाहकालिकाध्वनिः ।
शिवेति मंत्रभूषणा जगज्जयाय जायताम् ॥ ६ ॥
शांतं पद्मासनस्थं शशधर मुकुटं पंचवक्त्रं त्रिनेत्रं ।
शूलंवज्रंच खड्गं परशु मभयदं दक्षभागे वहंतं ॥
नागं पाशंच घंटां प्रलयहुतवहं सांकुशं वामभागे ।
नानालंकार युक्तं स्फटिक मणिनिभं पार्वतीशं नमामि ॥१॥

( गुलाबसिंग घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करतो. )

**गुलाब**—महाराजांच्या आज्ञेप्रमाणें शत्रूकडील बातमी आणण्याकरितां हेर पाठविले होते ते आतांच परत आले. आपण आज-

श्रीशंकराचें दर्शन घेऊन तसेच स्वारीस निघणार, ही बातमी श हास कळून तो आपणावर येथेंच हल्ला करणार अशी बातमी हेरांनीं आणिली आहे !

**सामत०**—शत्रूकडील लोक कितीही असोत, आज खासा लढाईत पाडाव करून मात केलीच पाहिजे !

**भीम०**—महाराजांनीं बेफिकीर रहावें. हे आमचे रणबहादूर आज असा आकांत करून सोडतील कीं, आज हा दारुण प्रसंग पाहून हा कालपर्यंत स्वर्गी गाढ निद्रेंत गुंग झालेले देव खडबडून जागे होतील ! ! महाराजांनीं बिनीस राहून आदब बजावीत चलावें, मी मध्यभाग धरतों, आणि जयसिंह दूसदारी करतील.

**सामत०**—( ब्राम्हणांकडे वळून ) अहो श्रेष्ठ हो, आम्ही परत येईपावेतों शंकरास रुद्राचें आवर्तन चालू ठेवा. श्रीशंकरानें आम्हांस विजयी केलें, म्हणजे सहस्रशः गोप्रदानें करून, सहस्रभोजन घालून, ब्राम्हणांस सुवर्ण मुद्रा दक्षणा देईन ! ( शंकराच्या मस्तकावरील फुलें खालीं पडतात ! ) अहाहा ! ईश्वराच्या मस्तकावरील फुलें खालीं पडलीं ! ! परमेश्वरानें प्रसन्न होऊन कौल दिला ! ! ! सरदारहो आज आपली लढाईत फत्ते खास होणार ! कसाही आणीबाणीचा प्रसंग आला, तरी माघार न घेतां निकरानें चढ करा, म्हणजे फत्ते झालीच म्हणून समजा ! !

**जय०**—तुर्कांना आज शेवटचें हेंच निर्वाणीचें उत्तर, कीं एक तर रजपुतांचा अंमल सर्वत्र होऊन, तुर्क स्त्रियांच्या कठोर विलापानें भूमंडळ दणाणून जाईल ! किंवा यवनांची सरशी होऊन रजपूत स्त्रियांनीं पेटवलेल्या सहस्रशः चितांच्या धुरानें आणि उष्ण ज्वालेनें स्वर्गस्थ देव डगमगून आकाशमंडप डळमळेल ! !

( दयाळसिंग घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करतो. )

**दयाळ०**—आले गनीम ! चला निघा.

**सामत०**—किती अंतरावर आहेत ?

**बखत०**—बराबर दोन कोसांच्या छट्यावर आहेत. आता मी एका टेंकडीवरून पाहिलें. अरब लोकांनीं कमरबस्ता करून तोंडे शिलगावले आहेत. सर्वांच्या पुढें सुमारें वीस हजार करोल चालले आहेत. मध्यभागीं बादशाहाचा हत्ती चालला आहे. खवासखान्यांत जंगीसखान आणि दिलावरखान बसले असून सर्व सरदार बाजूबाजूनें चालले आहेत. त्यांनीं आपला मोर्चा देवळावरच धरिला आहे असें दिसतें !

**भिम०**—आमच्या फौजा त्यांच्या तोंडावर ताबडतोब रवाना झाल्याच पाहिजेत.

**सामत०**—( भीमदेव व जयसिंह यांस आलिंगन देऊन ) मी तुम्हांस मित्रांप्रमाणें भावांप्रमाणें आणि पुत्रांप्रमाणें समजतों–लढाईंत तुम्ही जवामर्दी कराल यांत तर शंकाच नाहीं, पण माझा शेवटचा उपदेश हा आहे कीं, लढाईत कच खाल्लींत तरी हरकत नाहीं. शत्रूला पाठ दाखवून रणांतून पाय कधींही माघार घेऊन येऊं नका. तुम्हांस विजयश्रीनें माळ घातली तर क्रूरपणानें कत्तल करूं नका. हे देह स्वधर्म, व स्वदेश रक्षणासाठीं भूमीवर पतन पावले तर मोक्ष मिळेल, आणि विजयी झालांत तर आपली कीर्ति मागें अमर ठेवाल ! ! श्रेष्ठहो आपला आशीर्वाद आम्हा सर्वांस मिळावा !

**ब्राम्हण०**—( आशीर्वाद देतात )

स्वस्त्यतु ते भवसदा विभवस्य पात्रं
सामन्तसिंह ! हर शत्रुगजावलेपम् ॥
भो भमिदेव ! रिपवो भयमाविशन्तु
संपादयांशु विजयं जयसिंह ! संख्ये ॥ १ ॥

( सर्व सरदार " जयहर जयहर " घोष करतात. पडदा पडतो.)

---

## प्रवेश तिसरा.

[stamp]

### स्थळ.—सोमनाथाचें मंदिर व रजपुतांची छावणी यांचे मधील जंगल.

( ईडरचा राणा भीमदेव व जयसिंह प्रवेश करतात. )

**जय**॰—मित्रा, तुझी माझी ही अखेरचीच मुलाखत!

**भीम**॰—ईश्वर कृपा करील तर आपण उभयतां लवकरच भेटूं !

**जय**॰—भेटतों का गचतों, माहीत कुणाला ! लवकरच लढाईस तोंड लागेल, त्याच्या पूर्वी तुला कांहीं सांगायचें आहे.

**भीम**॰—लढाईशिवाय मला आतां कांहीं दिसतही नाहीं आणि भासतही नाहीं !

**जय**॰—पण एकच शब्द--आणि तोही माझ्या बायकोबद्दल.

**भीम**॰—काय ? चंपावती बद्दल ! म्हणजे !

**जय**॰—एकाक्षणांत आपण कदाचित् स्वर्गाची वाट धरूं !

**भीम**॰—किंवा जयप्राप्ति होऊन वैभवाच्या शिखरावर चढूं !

**जय**॰—कदाचित् आपणापैकीं एकचजण लढाईत कामास येईल !

**भीम**॰—किंवा दोघेही कामास येतील ! !

**जय**॰—दोघे जर कामास आलों तर महाराज सामतसिंह माझ्या बायकोचें आणि दिलीपाचें संरक्षण करतीलच ! नाहीं तर परमेश्वराला माझी लाज आहेच ! पण मित्रा मीच जर रणांत पडलों तर माझ्या मुलाचा तूंच बाप हो आणि माझ्या बायकोचें तूंच संरक्षण कर. ( त्याच्या गळ्यास मिठी मारतो. )

**भीम**॰—हा वेड्या ! हें तूं का मला सांगायला पाहिजेस ? पण युद्धास निघतांना तुझ्या नेत्रांस अश्रु ! हें कांहीं शुभ चिन्ह

नव्हे ! ! तथापि लढाईस जातांना खरा रजपूत शुभाशुभ चिन्हें मनांत आणीत नाहीं ! दाही दिशा त्याला शुभच भासतात !!

**जय०**—असे विचार माझ्या मनांत आल्यानें, मी म्हणजे लढाईंत कच खाईन असें तूं समजूं नकोस ! पण काय असेल तें असो, एकाएकींच माझ्या मनांत असे विचार येऊं लागले आहेत ! पण तं मला वचन देईनास ?

**भीम०**—हें घे वचन ( त्याच्या हातावर हात मारतो ) मी आतां या बाजूनें मध्यभागीं शिरतों आणि तूं तिकडून पिच्छाडी धर. ( दोघे दोन बाजूंनीं जातात. )

---

## प्रवेश चवथा.

### स्थळ.—सपाट मैदान.

( एक आंधळा म्हातारा आणि त्याचा नातू गुलाब प्रवेश करतात. )

**म्हातारा**—बेटा गुलाब, अजून छावणींत कोणींच परत आले नाहींत कारे?

**मुलगा**—आजोबा, देवळांतून ते परभारेंच शत्रूवर चाल करून गेले.

**म्हातारा.**—बेटा गुलाब, एखाद्या झाडावर चढून लढाई कशी काय चालली आहे, फौजा कशा उभ्या आहेत, तें पाहून मला सांगतोस ?

**मुलगा**—हो आजोबा, पण तुम्ही इथेंच उभे राहा. मी या शेजारच्या झाडावर चढतों अं.(झाडावर चढतो.लांबवर पाहून) अरे बापरे !किती हे लोक! आजोबा, लक्षावधी लोक आहेत बोआ!! रुप्याच्या अंबारींत आपले महाराज आंगांत तमामी पोषाक करून बसले आहेत. त्यांचा हत्ती अगदीं बिनझोल चालला

आहे. आजोबा, हत्तीच्या मस्तकावर जरी बादली बांधली असून वर पिंपळ पान आहे. आजोबा, त्याचे दांत सोन्यानें मढविलेले असून- त्याच्या गळ्यांत घुंगुरमाळा आणि रुप्याच्या घंटा बांधल्या आहेत. पाठीवर मखमाली गाशा टाकलेला असून गाशाच्या सभोंवतीं कलाबतूची झालर आहे. त्याच्या पायांत रुप्याचे तोडे आहेत. अबब !!

**म्हातारा**—बेटा गुलाब, तें असो. पण आपली फौज कशी उभी आहे तें सांग अगोदर.

**मुलगा**—आजोबा, कमरग्यांत ईडरचा राणा भीमदेव हत्तीवर बसला असून त्याच्याच शेजारीं जरीपटक्याचा हत्ती उभा आहे. भिमदेवानें आपली फौज दुतर्फा रांग्यानें उभी केलेली आहे. मधून घोडदळ उभें केलेलें आहे. सजविलेल्या जिलबेच्या हत्तींच्या रांगा सर्वांच्या पुढें उभ्या आहेत. सोन्याचे गंड पदे, गळ्यांत मोहनमाळा, पायांत पैंजण, पाठीवर भरगच्ची झुला, त्यांच्यावर कलग्या, असा घोड्यांचा मोठा जमाव उभा आहे. महाराजांचे हत्तीसभोंवतीं हजारों जिलबेचे लोक, म्हणजे बोथाटींबारदार, बिटेबारदार, खासबदार, बाणदार, आणि लगी, अशी खाशी जिलीब उभी आहे. जयसिंह यांनीं पिच्छाडी सांभाळली आहे. त्यांच्या हत्तीसभोंवतीं मानकरी, शिलेदार आणि झाडून सरंजामी लोक उभे आहेत. अंगांत झगा, हातांत भाला, कमरेला तलवार, पाठीला ढाल, पायांत किनखापी विजारा, असे घोडेस्वार, भालेकरी, आडहत्यारी आणि करोल उभे आहेत. आजोबा, सर्वांच्या पुढें तोफखाना उभा केलेला आहे ! आजोबा, आतां लवकरच धडेबाजी सुरू होईल नाहीं ?

**म्हातारा**—बेटा गुलाब, शहाची फौज कशी कशी उभी आहे रे?

**मुलगा**.—आजोबा, ती फार लांब आहे. मला चांगलीशी दिसत नाहीं. मग का इतक्यांतच बरबाद झाली कीं काय कोण जाणें! मुसलमानी फौजेंत सैदोन वाजत आहेत, आणि आपल्या फौजेंत,

नाबदा, डंका आणि भेरी वाजत आहेत. पण आजोबा, अजून धडेबाजी हो कशी नाहीं सुरू होत ? ( तोफेचे आवाज कानीं पडतात; मुलगा खालीं उडी टाकतो. )

**म्हातारा**—घे, ऐक धडेबाजी! तुला काय लेका, धडेबाजी म्हणजे मोठी मौज ! पण इकडे हजारों लोकांचे जीव जात आहेत ! ! ( प्रेक्षकांकडे पाहून आवेशानें ) काय करूं हो, या वेळेस जर मला दिसत असतें, तर तलवार घेऊन या मुसलमानांचा चांगलाच समाचार घेतला असता !

**मुलगा**—( गाईवरून )पण आजोबा, आतां माझ्या बाबाचें कसें होईल बरें ?

**म्हातारा**—बेटा, मला त्याच्यापेक्षां तुझीच काळजी फार आहे.

**मुलगा**—आजोबा, मी तुमच्यापाशीं राहीन; मग मला कोणाचें भय आहे ?

**म्हातारा**—पण बेटा, ते मुसलमान फार दुष्ट आहेत बरं ! ते कदाचित् तुला माझ्याजवळून हिसकावून नेतील !

**मुलगा**—( जोरानें ) असें तर होणारच नाहीं. आजोबा त्यांना कळत नाहीं काहो, कीं तुम्ही आंधळे आहांत, आणि, मी तुम्हाला हातीं धरून वागवतों ! त्यांनीं मला धरून नेलें तर आजोबा, तुम्हाला हो कोण वागवील! ! ( रडूं लागतो. )

**म्हातारा**—( मुलास कुरवाळून ) बेटा, तूं अजून लहान आहेस, तेव्हां तुला त्या राक्षसांची कृति काय कळणार ! ( आणखी सरबत्ती कानीं पडते ) अरे, आतां अगदीं जवळ आवाज ऐकूं आला. केवढा हा आवाज ! कानठळ्यी अगदीं बसून गेल्या ! प्रत्येक आवाज ऐकला कीं, माझ्या अंगांत संचारल्यासारखें होतें ! आणि या हाताच्या मुठी तलवारी धरण्याकरितां कशा शिवशिव करतात ! ! पण काय करूं ? असो. परमेश्वराची प्रार्थना करूनच मी आपल्या देशाचें या यवनांच्या हातून रक्षण करतों! ईश्वरा, आमच्या महाराजांस लढाईंत यश दे!

**मुलगा**—( घाईघाईनें ) आजोबा, अहो अजोबा, ते पहा शिपाई पळत आहेत.—

**म्हातारा**—पण बेटा, ते कोण ? मुसलमान का आहेत ?

**मुलगा**—नाहीं आजोबा, रजपूतच आहेत.

**म्हातारा**—काय ? रजपूत ! आणि ते समरभूमीपासून पराङ्मुख ! असें तर कधींच होणार नाहीं !

**मुलगा**—आजोबा, ते इकडेसच येत आहेत.

**म्हातारा**—बेटा, त्यांना विचार बरें कीं, ते कोणकिडून आले, आणि लढाई कशी काय चालली आहे ?

( दोन रजपूत शिपाई पळत पळत प्रवेश करतात. )

**मुलगा**—अहो शिपाई दादा-(त्यांस आडवा जातो).

**शिपाई**—( मुलास दूर करून ) आमचा खोळंबा मुळींच करूं नका. आम्ही छपवून ठेवलेल्या फौजेस इषारा देण्याकरितां जात आहोंत. विनाशकाळ आला आहे !

**म्हातारा**—तर मग पळा कसे-पळा-पळा. ( शिपाई जातात. )

**मुलगा**—आजोबा, अहो आजोबा, भाल्यांचीं टोकें उन्हांत चम् चम् करीत आहेत !

**म्हातारा**—तीं तर रजपुतांचींच! पण तीं आपल्याकडच्या बाजूला आहेत कीं शत्रूंच्या ?

( एक रजपूत शिलेदार घाबऱ्या घाबऱ्या येतो. )

**मुलगा**—( मुलगा आडवा होऊन )अहो, शिपाईदादा, माझ्या आजोबाबरोबर चार शब्द बोला बरं !

**शिलेदार**—तूं आणि तुझा आजा, पळा, पळा. कुठें तरी डोंगरांत पळा, नाहीं तर आतां धरले जाल! रजपुतांची दाणादाण झाली आहे ! प्रथम मोठ्या जुरतीनें लढाई चालली होती, परंतु हाकडच्या गोलंदाजांनी शिस्तबी करून तोफ डागली ! त्या-

सरसा आपल्या महाराजांचा हत्ती घायाळ होऊन महाराज खालीं आले ! ! बादशाहाच्या फौजेनें लढाईची मोठी लगट केली. पुष्कळ रजपूत त्या प्रसंगीं कापले गेले !!! महाराज ही बरेच जखमी झाले आहेत ! पळा. पळा. ( निघून जातो. )

**मुलगा.**—( आजोबाला फरफर ओढीत ) चला चला, आजोबा, आपण त्या पलीकडच्या झाडाच्या आड लपूं चला. (एका कोपऱ्यांत जाऊन उभे राहतात. ) ( घायाळ झालेला सामंतसिंह, शूरसिंग व कित्येक सरदार प्रवेश करतात. )

**सामंतसिंह.**—आम्हांवर केवढा हा परमेश्वराचा कोप ! हत्तीच्या किलाव्यांत पाय अडकल्यामुळें जबर जखम झाली. या सामंतसिहाच्या मुलीनें तुर्कांच्या घरीं राहून आयुष्य कंठावें आणि तें या षंढानें सहन करावें ! धिक् ! धिक् ! ! अरे क्षात्र तेजाचा हाच कारे प्रताप ! ! या सामंतसिहानें रणभूमीला पाठ दाखवून उलटें खावी अं ! ! मघांचें तें तुंबळ युद्ध पाहून स्वर्गांतून पुष्पवृष्टि करणारे देव, ते पहा अश्रु ढाळावयास लागले ! आणि विमानांत बसून आलेल्या अप्सरा, त्या पहा परतल्या !अहो शूरसिंग, या अधमाच्या तोंडांत रणधूळ कोंबून, या याला यमपुरीच्या अमंगळ दुर्गंधी कूपांत फेंकून ! नाहीं तर, फासा याच्या तोंडाला शूर रजपूतांचें रणभूमीवर पडलेलें रक्त ! आणि टाका याला जमीनींत गाडून ! !

**शूर०**—महाराजांनीं थोडी विश्रांति घ्यावी-

**सामंतसिंह.**—काय घोर प्रसंग हा ! ही माझी स्थिति पाहून रजपूत विरांनीं धीर सोडल्यामुळें शेंकडों रजपूत गनीमांनीं कापले ! कांहीं जीव घेऊन सैरावैरा पळूं लागले ! शूरसिंग तोंडातून शब्द निघत नाहींसा झाला हो ! हे माझे प्राण लढाईची अखेर काय झाली, तें समजेपर्यंत असेच घोटाळणार ! माझे शूर सरदार हो, तुम्ही एकवार हिमायत करा, सर्व रजपूतांचा मिलाफ करून जुटीनें दुष्मानांशीं लगट करा. जा, निघा-पळा ( सर्व शिपाई व सरदार जातात. ) माझ्या स्वतःच्या जीवाचें

मला तर कांहींच वाटत नाहीं ! आणि माझ्या मुलीबद्दलही इतकें वाईट वाटत नाहीं ! पण माझ्या लाडक्या प्रजेसाठीं माझें काळीज कसें तिळतिळ तुटतें ! देवा, काय हा प्रसंग आणलास? ( म्हातारा व मुलगा पुढें येऊन ).

म्हातारा--बेटा गुलाब, आतां कोणी दीनस्वरानें हळहळतांना तुला ऐकूं आलें का रे ! कोण आहे बिचारा कोण जाणें ! तूं कोण आहेस बाबा ?

सामतसिंह—हा मी हताश होऊन बसलों आहें!

म्हातारा--अरे बाबा, आमचे महाराज सामतसिंह खुशाल आहेतना रे ?

सामतसिंह--तो जीवंत आहे बाबा !

म्हातारा—मग तूं हताश होऊन दुःख कां करतोस ? आमचे महाराज फार दयाळू आहेत ! तुझा ते प्रतिपाल करतील !

सामतसिंह—( गहिंवरून एकीकडे )अहाहा ! काय माझी ही प्रजा आहे ! धन्य मी ! ! ( उघड ) पण म्हातारे बाबा, सामतसिहाचा हो कोण प्रतिपाल करील ?

म्हातारा—परमेश्वर त्यांचें संरक्षण करील ! आमचे महाराज आपल्या प्रजाजनांचें पोटच्या पोराप्रमाणें पालन करितात! परमेश्वराच्या घरीं हें का रुजू नसेल काय ? ईश्वर ..फची एक रायु करील । .क म्यालांत कीं

सामतसिंह—( एकीकडे ) देवा,तुझी

अशा संकटसमयीं–दुःखाची परमावधि पहा घोडेस्वार अजून

पितावर तूं या वृद्ध मनुष्याकडून

अहाहा ! प्रजाजनांची काय ही व खरे रजपूत असाल तर स्वामिभ-

पाहून कोणाच्या आंगावर रोमां तुमच्या छातीवर फडकंया !

मुलगा--( लांब एकीकडे फेंकून, दौड करून, माझ्या मागोमाग शत्रूंशीं नेटानें न भिडाल तर रौरव नरकाचें साधन कराल ! ! आणि तुम्ही जर न आलांत तर हा भीम ( पाय आपटून व तलवार हातांत घेऊन ) हा भीम—राजाला मुक्त करण्याक-

**सामतसिंह**—( पाहिलेसें करून ) अरेरे! हे तर मुसलमानच. खातरीनें तेच! अशा समयीं मजजवळ तलवार सुद्धां नाहीं! नाहीं तर आपणा सर्वांचें रक्षण केलें असतें. आतां या हतभाग्याच्या कपाळीं हाल! छळ! आणि अंतीं नरकवास या शिवाय दुसरें कांहीं नाहीं!!

( नसीरखान, खानजहान, फैजुद्दवला, प्रवेश करतात. )

**नसीर०**—लाहोलविलाकुवत! इल्लाबिल्ला! ए क्या गजहब्! कितनी बडी तकलिफ् हुयी!

**खान०**—( सामतसिंहाकडे दृष्टि जाऊन ) वल्ला! येही सामतसिंग है! या इलाही, ये तेरी कुदरत है!!

**फैजु०**—( सामतसिंहाला धरून ) अल्लाहोअकबर! अब इसकू गिरफ्तार करके ये रास्तेसे हुजूरके तरफ् ले चलो. दौडो, दौडो, दौडो. ( सामतसिंहास घेऊन जातात. )

**म्हातारा**—अरे, हे तर महाराज सामतसिंह होते! हारे दैवा, मी कसा अंध झालो! अरे थेरड्या, एवढे तुझ्या तर्कांचें खोबरें कसें झालें!! ( मुलाला चापट मारून ) आणि कारट्या, तं मला पुढें कारे नाहीं लोटून दिलेंस, म्हणजे मीं त्या. शिखानष्टांच्या नग्न तलवारीवर आपला देह स्वामीतोंडाला ्र्पण केला असता!!

याला जमीनींत रडूं लागतो. लांब पाहिलेसें करून ) आजोबा,

**शूर०**—महारा.. रजपूत शिपाई इकडेच पळत येत आहेत!

**सामंतसिंह.**—काये ते राजाला सोडविण्याच्या हेतूनें पाहून रजपूत विरांनीं धीर सोकांहीं शिपाई धांवत येतात; त्यांचे कापले! कांहीं जीव घेऊन

तोंडातून शद्ब निघत नाहींसा ) थांबा, थांबा, तुम्हांस राईची अखेर काय झाली, तें समजेपयत ...

शूर सरदार हो, तुम्ही एकवार हिमायत करा, सर्व रजपूतांचा मिलाफ करून जुटीनें दुष्मानांशीं लगट करा. जा, निघा-पळा ( सर्व शिपाई व सरदार जातात. ) माझ्या स्वव:च्या जीवाचें

भीमदेव—अहारे बेहिमती ! अरे तुमच्या आंगीं शिपाईगिरी नाहीं तर हातांत कांकणें कां भराना ! ! अरे मरणाला भिता ? जें " रजपूत " हें नांव ऐकून शत्रूंचीं काळीजें फाटतात, त्या नांवाला तुम्ही काळोखी लावता, याची तुम्हाला शरम ! ; आतां जो कच खाऊन मोर्चा फिरवील त्याला लाथ मारून जमीन दुभांग करून तेथल्या तेथें गाडून टाकीन ! ! नाहीं तर ( तलवार जमीनीवर आदळून ) घ्या ही समशेर, आणि खुपसा माझ्या छातींत ! ! म्हणजे अशा षंढांचें मुखावलोकन तरी होणार नाहीं ! ! ! अरे तुम्ही हयात असतां, छत्रपति सामंतसिंह याना " कैदी " म्हणून मुसलमान लोकांनीं धरून न्यावें काय ? थू तुमच्या तोंडावर ! तुम्हाला हीं अक्षरें कानांनीं ऐकवतात तरी कशी ! तुमचा राजा तुम्हांला तुमच्या बापासारखा, त्याला यवनांनीं बांधून नेला ! आणि तुम्ही येथें स्वस्थ एकमेकांच्या तोंडाकडे पहात उभे राहिला आहांत ! ! कां तुमची महाराजांवर तलफ चढली आहे ! ! काळीं तोंडें करून कोठें तरी दऱ्याखोऱ्यांत भागूबाई प्रमाणें लपून बसा ! नामर्द ! बेहिमती ! ! लढाईला आले आहेत ! ! ! आर्यभूमातेवर पृथ्वीप्रलयापर्यंत वीर पुरुष अवतरणार ती पुण्यभूमि तुम्ही जीवंत राहून तुमच्या सारख्यासच विभूतींनीं विटाळणार काय ! अरे तोफेची एक सरबत्ती आंगावर आली नाहीं, तों तुम्ही इतके भ्यालांत कीं शत्रूला पाठ दाखविलीत !—

शूरसिंग—( मध्येंच ) ते पहा घोडेस्वार अजून दृष्टीआड झाले नाहींत !—

भीमदेव—तुम्ही जर हाडाचे खरे रजपूत असाल तर स्वामिभक्तीचें आणि देशसेवेचें निशाण तुमच्या छातीवर फडकूंद्या ! आणि या समयीं जर चढाव करून, दौड करून, माझ्या मागोमाग शत्रूंशीं नेटानें न भिडाल तर रौरव नरकाचें साधन कराल ! ! आणि तुम्ही जर न आलांत तर हा भीम ( पाय आपटून व तलवार हातांत घेऊन ) हा भीम—राजाला मुक्त करण्याक-

रितां चित्यासारखा एकटाच धांवत चालला पहा!!! (सपाट्यानें निघून जाऊं लागतो)

**सर्व शिपाई**—आम्हीं जीवाची आशा सोडली! महाराजांच्या मागोमाग आम्हीही पण येतों. (सर्वांच्या पुढें भीमदेव व मागून सर्व सरदार धांवत जातात.)

**म्हातारा**—बरें झालें माझे डोळे गेले! नाहींतर अशीं कृष्णमुखें याच नेत्रांनीं पहावीं लागलीं असतीं!! अरे राणा-भीमदेवासारखा मोहरक्या असतांना, जे लोक पलटा खातात!-आणि तीही स्वामीला मुक्त करण्यांत!-धिक्! धिक्!-त्यांचें जिणें!!! भीमदेवा तूंच खरा रजपूत!—हे रजपूत अजागळ आहेत! पोटीं पुत्र असावा तर असाच गुंडा असावा!! अरे राणा भीमदेव म्हणजे प्रत्यक्ष वायुपुत्राचा अवतार आहे! ईश्वरा या समयीं त्याला यश दे, आणि आमच्या महाराजांना सोडीव! बेटा, गुलाब, एखाद्या झाडावर चढून आतां काय काय होत आहे, तें मला सांगतोस?

**मुलगा**—आजोबा, मी या पलीकडच्या झाडावर चढतों अं:-(झाडावर चढतो.) आतां मला सगळें दिसत आहे. मुसलमान लोक जलदी जलदी धांवत आहेत आजोबा!

**म्हातारा**—आणि भीमदेव त्यांच्या मागेंच लागला असेल नाहीं रे?

**मुलगा**—आजोबा, तो त्यांच्यामागें पिसाळलेल्या वाघाप्रमाणें लागला आहे! तो हातानें रजपत लोकांना आपल्याकडे बोलावीत आहे! त्या पहा तोफा उडाल्या! (आवाज होतो) वाऱ्यानें धूर नाहींसा झाला! आजोबा, आतांतर एकच गर्दी झाली आहे!!

**म्हातारा**.—बेटा गुलाब, तुला आपले महाराज दिसत आहेत का रे?

**मुलगा**—त्यांच्याच शेजारी राणा भीमदेव उभा आहे! तो

ज्या वेळीं घाव मारतो त्यावेळीं त्याच्या तलवारीतून ठिणग्याच बाहेर पडतात ! !

**म्हातारा**—( आनंदानें नाचूं लागतो ) बरें होतें आहे आतां ! सगळ्या मुसलमानांचा एकदांचा चकणाचूर करून टाका ! !

**मुलगा**—आजोबा, अहो आजोबा, आतां तर तुमच्या भीमानें आपला अबलक रंगाचा घोडा शहाच्या हत्तीवर घातला! आजोबा, अहो आजोबा, घोडा दुपाई आला ! आणि आतां भीमानें हत्तीच्या गंडस्थलावर जोरानें भाला फेंकला ! ! तो पहा हत्तीनें मोहरा फिरविला ! आजोबा, अहो आजोबा, सुलतान खालीं पडला ! ! एकच चकंदळ उडालें ! ! ! तो पहा " जय हर जय हर " असा सगळ्या रजपुतांनीं एकच जयजयकार केला ! सगळे मुसलमान पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें रानोमाळ पळत आहेत ! आजोबा, अहो आजोबा, महाराजांनीं भीमदेवाच्या गळ्याला मिठी मारली ! !

**म्हातारा**—( आनंदानें उड्या मारतो ) अहाहा ! भीमावरून हा जीव ओंवाळून टाकीन ! काय मला हा हर्ष झाला आहे ! असा साऱ्या जन्मांत कधीं कधीं झाला नाहीं ! ( आनंदानें आंगास कंप भरतो ) बेटा गुलाब, खालीं ये रे. तुला पोटाशीं घेऊन मला मुका घेऊं दे ! ( अडखळत ) अरे माझी शक्ति— अरे माझें आंग—

**मुलगा**—आलोंच आजोबा, मी तुम्हांला धरतों अं: ( उडी टाकतो आणि आजोबाजवळ येतो ) पण आजोबा, तुम्ही इतके कांपतां कां ?

**म्हातारा**—बेटा गुलाब, ह्या आनंदाच्या उकळ्या आहेत बरें ! रणांत जय आल्याचा आनंद वीरच जाणतात ! ! इतरांना नुसत्या गोष्टीच कराव्यात ! ! ! ( पडद्यांत विजयदुंदुभि वाजं

लागून, रजपूत शिपाई आनंदानें गाणीं गात प्रवेश करतात. )

प० शिपाई—

छप्पै.

जय जयन्ति जय आदि सकृति जय कालि कपर्दिनी ।
जय मधुकैठभच्छलनि देवी जय महिषबिमर्दिनी ।
जय चमुंड जय चंड मुंड भंडासुर खंडिनी ।
जय सुरक्त जय रक्तबीज बिड्डाल विहंडिनी ।
जय निसुंभ सुंभद्दलनि भनिभूषण जय जय भननि ।
सरजासमथ्थ सिहराज कहे देहि विजय जय जगज्जननि ।

दु० शिपाई—

कवित्त.

चढत तुरंग चतुरंग साजिसिंहराज चढत प्रताप दिनकर अति जंगमे । भूषन चढत मरहट्टनिके चित चाव खग्ग खुलि चढत है अरिनके अंगमै । भीमदेव के साथ गढकोट है चढत अरि जोट है चढत एक मेरुगिरी शृंगमै । तुरका नगन व्योमजान है चढत बिनमान है चढत चदरंग सब जंगमै ॥ १ ॥

ति० शिपाई—

दोहा.

दशरथके जो राम भो वसुधोके गोपाल ।
सोई प्रकट्यो साहिके श्री सिंहराज भुवाल ॥
उदित होत सिंहराजके मुदित भय द्विज देव ।
कलजुग हट्यो मिट्यो सकल म्लेच्छानको अहमेव ॥१॥

च० शिपाई—

सवैया.

कुंद कहा पयवृंद कहा अरुचंद कहा सरजा जसु अंगे ।
भूषन भानु कृसानु कहा दसुपानु प्रताप महीतल पागे ॥

राम कहा द्विजराम कहा बलराम कहा रनमे अनुरागे।
बाज कहा मृगराज कहा अति साहसमे सिंहराजके आगे ॥१॥

**म्हातारा**—( आनंदाने उड्या मारीत )

**कवित्त.**

इंद्रजिमि जंभपर वाढव ज्यों अंभपर रावन सदंभपर रघ-
कुल राज है। पौनवारी वाहपर संभु रति नाहपर ज्यों
सहस्रबाहपर रामद्विजराज है। दावाद्रुमदंडपर चिता मृग
झुंडपर भूषन वितुंडपर जैसे मृगराज है। तेजतम अंसपर
कान्ह जिमि कंसपर त्यों म्लेंच्छ वंसपर सेर सिहराज है ॥१॥

( सामतसिंह व भीमदेव प्रवेश करतात. )

**सामतसिंह**—भीमदेव हा जीव तुम्हावरून कुरबान् आहे! देशाची इज्जत आज तुम्ही राखलीत! आज तुम्हीं "**खरा रजपूत**" हें नांव मिळविलेंत! आज तुम्हीं माझ्या तोंडाची काळोखी घालविलीत! आणि राजकन्येच्या मुक्तीविषयीं माझ्या अंत:करणांतील निराशा नाहींशी करून,माझ्या आंगांत धैर्य आणलेंत!!धन्य!धन्य तुम्ही!आणि तुम्हाला प्रसवलेली तुमची वीरमाता!!! ही आनंदाश्रूनें मलिन झालेली माझ्या कंठांतील हिऱ्याची माळ, मी तुमच्या गळ्यांत घालतो. ( माळ गळ्यांत घालतो. ) आपल्या या आजच्या प्रसंगाची हीच खूण गांठ! आजची बाजी तुम्हीं संभाळलीत!!

**भीमदेव**—ही सर्व त्या सोमनाथाची कृपा! आणि महाराजांच्या गादीचा पुण्यप्रताप! मीं काय केलें? ( तोंड उतरलेला एक रजपूत शिपाई प्रवेश करतो, त्याला पाहून ) कायरे बाबा, असा कष्टी कां? जयसिंहाकडची काय खबर?

**शिपाई**—लढाईचें तोंड जुंपून उभयपक्षांतील लोक एकमेकांच्या आंगाशीं भिडल्यावर जयसिंहमहाराजांनीं आपल्या एकजात पांचशें स्वारांच्या पतकानिशीं दिलावरखानाच्या टोळीवर निकरानें चाल केली! कडव्या रजपुतांच्या तलवारीपुढें दिलावर-

खानाचा टिकाव लागेनासा होऊन तो मागें हटूं लागला! इतक्यांत ( सामतसिंहाकडे बोट करून ) महाराज जखमी झाले ही बातमी कानीं पडून सर्वांचा धीर सुटला आणि सर्व फौज उधळली!! तरी आमचे धैर्यशाली महाराज काडीमात्र डगमगले नाहींत! अशी फाटाफूट झालेली पाहून दिलावरखानाच्या लोकांनीं मोठी लगट केली, आणि लढाईचें मान एकाएकीं सर्व फिरलें! शत्रूकडील लोकांनीं चोहों बाजूनें वेढा देतांच जयसिंहमहाराज जवळच्या शेपन्नास जीवावर उदार झालेल्या लोकांसह शत्रूंवर तुटून पडले! आणि दिलावरखानासारखा वीर त्यांनीं निमिषमात्रांत समरभूमीवर उलथा पाडला! परंतु आमचें दुर्दैव ओढवलें! या हातघाईच्या प्रसंगांत जयसिंहमहाराजांना कोठें तरी जबर जखम लागली असावी असें वाटतें; कारण ते एकाएकीं मूर्च्छा येऊन पडले! झालें आटपलें! आतां काय सांगू! मोठा प्रसंग ओढवला!

**सामतसिंह**—( दु:खानें डोळे पुशीत ) भीमदेव, मोहरा गेलाहो! असा पुतळा फिरून दृष्टीस पडणार नाहीं!! परमेश्वरानें आमच्यावर केवढा कोप केला हा!

**भीमदेव**—( डोळ्यांत पाणी आणून ) हाय! हाय! परमेश्वरा हें तूं काय केलेंस! मित्रा जयसिंहा, राजकन्येची मुक्तता करून, मुसलमानांचें नांव या भरतभूमींतून पार नाहींसें करूं तेव्हांच परलोकाची वाट धरूं, असा जो आपण संकल्प केला त्याचा हाच का रे शेवट झाला! मित्रा, तुझ्या जीवाला जीव देणारा हा भीमदेव, याच्या अगोदरच तूं समरभूमीवर आपला देह ठेविलासना! महाराज वज्रप्रहारासही न डगमगणारी ही छाती दुभंग झाली! माझ्या सर्वस्वावर आकाशची कुऱ्हाड पडून माझी हिम्मत करपून गेली! माझा धैर्यमेरू ढांसळला! माझा उजवा हात तुटला! आज अमूल्य मोहरा एकाएकीं नाहींसा झाला! सर्व रजपूतांचा लाल हरपला! माझ्या यशाचा आणि संकटाचा वांटेकरी मला अंतरला! हें सर्व जग मला आतां भयाण

आणि उदास दिसतें आहे ! आमच्या राष्ट्राचा वैभववृक्ष आज कडाडून पडला!–आज महासाध्वीच्या सौभाग्यमंदिरावर अग्निवृष्टि झाली! हायरे दैवा! मित्रा अंतकाळीं तूं माझी आठवण केली असशील ; तुझा प्राण घोंटाळला असेल ! त्या नीचांनीं तुझे शतशः तुकडे केले असतील ! मित्रा, ( क्रोधानें तलवार घेऊन ) हा मी आलोंच ! ज्या रणांगणांत तुझ्या प्रेताचे छिन्नभिन्न तुकडे पडले असतील, त्या रणभूमीवर शत्रूंच्या रक्ताचे सडे शिंपडून तुझ्या मर्दुमकीची, देशसेवेची, धारिष्टाची, स्वामिभक्तीची आणि स्नेहातिशयाची आज पूर्तता करतों ! आणि शेवटीं तुझ्या चिरकाल संगतीचा लाभ घेण्याकरितां स्वर्गाची वाट धरतों ! ! ! ( झपाट्यानें निघून जाऊं लागतो. )

**सामतसिंह**--( त्यास आवरून ) वीरा भीमदेवा, काय हा अविचार ! तुझ्यासारख्या वीरपुरुषांनीं शोक करून धीर सोडणें अगदीं अनुचित होय ! उतावीळपणानें असा घोर संग्राम करूं नकोस. माझ्या वचनाला मान देऊन मनाला विवेकाचें आळें घाल; आणि आमच्या या पोळलेल्या काळजावर जास्त डागण्या देऊं नकोस ! आम्हांवर एकामागून एक कोसळणारे हे ईश्वरी कोप आमच्यानें आतां सहन होत नाहींसे होऊन, हे प्राण जड झालें आहेत ! दुर्दैवाच्या भयंकर अथांग समुद्रांत आम्हीं हांकारलेलें हें आमचें जहाज, तुझ्यासारखा नावाडी नसल्यावर केव्हांच तळाला रुतून बसेल याचा नेम नाहीं ! भीमदेवा, माझा कंठ अगदीं दाटून आला आहे ! अश्रुपूरानें दृष्टि अंधुक होऊन सर्व शरीर कंपित झालें आहे ! माझ्यानें तुला आतां जास्त सांगवत नाहीं--राजाज्ञेस पाठ दाखवून, हा सकल बंधुवर्ग दुःखांत लोटून असें अघोर आणि अविचाराचें कृत्य करूं नकोस ! !

**सर्व सरदार**--( भीमदेवापुढें पदर पसरून ) आम्हीं पदर पसरतों ! आम्हाला एवढी भिक्षा घालावी ! महाराजांच्या आज्ञेला मान द्यावा आणि आतांच हा अविचार करूं नये ! आपल्या लष्कराची काय व्यवस्था आहे, हें समजल्याशिवाय रणशूरांनीं

शतीं शस्त्र धरणें योग्य नव्हे. तुमच्या समागमें आम्हीही आपल्याआहुति अर्पण करण्यास तयार असतां, आपण एकटेच चालला! असें करूं नका.

**भीमदेव**—( दुःख व क्रोध आवरून ) महाराजांची आज्ञा मला शिरसा वंद्य आहे.

**सामंतसिंह**—भीमदेव, तुम्ही किल्याकडे जाऊन जयसिंहाच्या बायकोचें सांत्वन करा. तीही मोठी शहाणी मुलगी आहे; तेव्हां ती कोणत्याही प्रकारचें अविचाराचें कृत्य करणार नाहींच. परंतु हा पतिवियोग फार दुःसह आहे! ह्मणून तिला चार समाधानाच्या गोष्टी सांगून तिला धीर द्या. तुम्हीहि धूर्त अहांतच. तसेंच ज्यांचे पुत्र आज लढाईंत कामास आले असतील अशा वीरमाता आणि ज्यांच्या सौभाग्यावर आज आकाशची कुऱ्हाड पडली अशा वीरपत्नि परम शोकाकुल झाल्या असतील त्यांना समजुतीच्या चार गोष्टी सांगून त्यांना इनामीच्या सनदा करून द्या. माझी कंबर अगोदरच अगदीं खचून गेली आहे, म्हणून म्हणतों, कीं स्त्रियांचा तो कठोर विलाप माझ्यानें ऐकवणार नाहीं! ( इतक्यांत पडद्यांत, रडण्याचे हुंदके आणि दुःखाक्रोश हीं एकवटून उठलेला गलबला सर्वांच्या कानीं पडतो. सर्व सखेदाश्चर्यानें ज्या बाजूकडून हा गलबला ऐकूं आला तिकडे दृष्टि देऊन पाहूं लागतात. पडदा पडतो. )

तिसरा अंक समाप्त.

# अंक चवथा.

---*---

## प्रवेश १ ला.

### स्थळ—गिरनार किल्ल्यावरील सपाट उंच जागा.

( चंपावती बसली असून शेजारीं दिलीप निजला आहे. जयसिंहाचे नोकर रामसिंग बखतसिंग,उभे आहेत. लढाइचें वर्तमान कळविण्यास अजून किल्लयाकडे कोणीच येत नाहीं म्हणून सर्व काळजींत आहेत. )

**बखत०**–( रामसिंगास ) काय रे, अजून तुझ्या दृष्टीस कोणीच पडत नाहीं ? मोठें आश्चर्य आहे !

**राम०**—( लांब पाहिलेसें करून ) लांब-लांब-दोन घोडेस्वार दिसत आहेत बोआ ! तो एक पलीकडलें टेंकाड चढतो आहे, आणि दुसरा आतांच अलिकडच्या झाडींत शिरला. जरा थांब, तो झाडींत शिरलेला स्वार लवकरच किल्ला चढून वर येईल; पण मला कांहीं शुभ चिन्ह दिसत नाहीं ! कारण झाडींत शिरलेल्या स्वारानें घोड्याची अनीन अवसानानें खेंचली नव्हती ! आणि त्याचा चेहरा अगदीं उतरलेला दिसत होता !

**चंपा०**—( ऐकलेसें करून, कंठ भरून येऊन ) तरीच बरं मघाशीं मी देवीला नमस्कार करायला गेलें,तेथें माझ्या गळ्यांतला हार एकाएकीं तुटून मोतीं एकामागून एक टपटप गळूं लागलीं ! तेव्हांच माझ्या पोटांत कसं अगदीं चर्र् झालं ! पण-इतकावेळ मी कांहीं बोललें नाहीं. आई जगदंबे, आमच्याव र तुझ्या कृपेची सावली असूं दे ! आणि आम्हांला नेहमीं आ नंदांत आणि सौख्यांत ठेव !

**बखत०**—( लांब पाहिलेसें करून ) रामसिगा, कांहीं तरी

दगा दिसतो आहे बाबा ! तो पाहिलास का, मघाशीं झाडींत शिरलेला स्वार अर्ध्या वाटेवर मटकन् खालीं बसला ! आणि तो टेंकाडावरचा स्वार कोठेंच दिसत नाहीं आतां ! हीं चिन्हें कांहीं चांगलीं नाहींत !

**चंपा०**—( दुःखानें ) रामसिंग, नुसते पहात काय हो उभे राहिलांत ? जरा खालच्या बाजूला होऊन कांहीं विचारपूस करा. अहो तुम्ही पुरुषासारखे पुरुष असून तुम्हीं येवढं धैर्य सोडलंत! पाय उचला, जा. [ तो जातो ) बखतसिंग, मेली अशी मनाला हुरहुर कां बरं वाटते ! आणि उरांत अशी धडकी कां बरं भरली ! लढाइतून परत सुखरूप येणं होईलना ! मनांत मेल्या नाहीं नाहीं तसल्या भलभलत्या कल्पना येतात ! म्हणून विचारतें, आई भवानी आम्हांला आनंदाचा दिवस दाखवीलना ? एकदा व टतं आम्ही मुलाला घेऊन जोडप्यानं देवीच्या पायां पडायला मोठ्या थाटानं जाऊं,आणि लगेच हें मेलं वेडं मन वाटेल तिकडे भकूं लागून एकदम निराशा होते !

**बखत०**—( लांब पाहिलेंसें करून ) बाईसाहेब, तो पहा दुसरा स्वार !

**चंपा०**—( पाहून ) अगबाई ! त्याचं तोंड कळाहीन कां बरं दिसतं ! अंगावरचीं वस्त्रं अशीं अस्ताव्यस्त कां बरं दिसतात ! पुढें जाऊं न जाऊं अशा विचारानं तो वरचेवर आपल्या घोड्याला कां बरं थांबवतो आहे ! बखतसिंग, तुम्ही कांहीं म्हणा! पण मला कांहीं धडगत दिसत नाहीं ! बाळा ! जागा हो किरे! बखतसिंग, रामसिंग अजून कांहो नाहीं परत येत ?

**बखत०**—बाईसाहेब असें भिण्याचें कांहीं कारण नाहीं. महाराज लढाईत फत्ते करून आतां परत येतील. हे शिपुरडे लढाईतून पाय काढून आले असतील, आणि म्हणून तोंड दाखवावयाला लाजतात आणि दुसरें काय ! आपल्या महाराजांबरोबर मी एकदां लढाईत असतांना महाराजांनीं जें शौर्य गाजविलें, तें माझ्या डोळ्यांपुढें अजून दिसत आहे ! त्या वेळीं

महाराजांच्या भोंवतीं पांचशें हालाईतांचा गराडा पडला होता ! केवढा घोर प्रसंग ! परंतु महाराजांनीं सगळ्यांना जेरीला आणून त्यांना धूळ चारली ! ! ( इतक्यांत रामसिंग रडत रडत प्रवेश करतो त्याच्याजवळ जाऊन ) कायरे रामसिंगा, डोळे कां पुसतोस ! अरे झालें तरी काय ? आपले महाराज, राणा भीमदेव आणि सामतसिंहमहाराज कुशल आहेतना ? काय, तुला समजलें तरी काय ?

चंपा०—बोल बाबा, लवकर बोल; कर एकदां एका घायीं दोन तुकडे; तुला पाहिल्यापासून माझ्यापुढें यमच उभा राहिला असं वाटतं ! सांग रामसिंगा.

राम०—( रडत रडत ) राणा भीमदेव आणि महाराज सामतसिंह सोमनाथाकडे परतले !

चंपा०—आणि ते कुठं आहेत बाबा ? काय सांगितलंन् त्य घोडेस्वारानं ?

बखत०—रामसिंगा, नीट बोल रे लवकर.

राम०—रणामध्यें झळकणाऱ्या प्रतापसूर्याला शेवटीं राहूनें पूर्णपणें ग्रासलें ! आमचें दुर्दैव ओढवलें ! आणि शत्रूंनीं शेवटीं पुरेंच वैर साधलें ! !

चंपा०—बखतसिंग, ऐकूं नये तें ऐकलं ! ब्रम्हांड कोसळलं. हो माझ्यावर ! रामसिंग, जबर काहो जखम लागली ? का श त्रूंनीं बांधून नेलं ? का हाल हाल केले ? कांहीं कळलं का हो

राम०—आतां आमचे महाराज आम्हांला ह्या लोकीं पुन कुठले दिसायला !

चंपा०—(०जमीनीवर डोकें आपटून ) केवढी मी अवदसा ! अग चांडाळणी शेवटीं वैधव्याचा पट्टा कपाळीं ओढून घेतला-सना! बाळा दिलीपा! अरे जागा हो वीरा! तुझ्याकडे पाहिलं म्हणजे पोटांत सगळं उभं राहतं ! आई जगदंबे, तूं आपलं सौभाग्य शेवटीं हिरावून नेलंसना ! देवा मागल्या जन्मीं मीं असं कोणतं

पातक केलं होतं, म्हणून मला अशी उघडी पाडलीस ! तूं अनाथांचें रक्षण करणारा आहेस म्हणून म्हणतात तें तुझें ब्रीद आतां कुठं गेलं ! अरे यमा, या गाईवर कसा रे घाला घातलास ! हें माझं तान्हं, आतां कोणाच्या तोंडाकडे पाहील ! महाराज, मला हो कां नाहीं बरोबर घेऊन गेलांत ! या अभागीला शेवटीं आपलं तोंड सुद्धां पहायला सापडलं नाहीं ! तरी मी म्हणत होतें कीं मला बरोबर घेऊन चला ! बखतसिंग, त्यांनीं मजवर कांहो इतकी आग पाखडली ! दिलीपाकडे पाहून तरी त्यांनीं एकाएकीं असं करायचं नव्हतं ! बखतसिंग, काळासारखा माझा वीर त्या राक्षसांनीं शेवटीं रणांगणांत मारला ना ! आणि माझा सिंह, शेवटीं लांडग्यांनीं गिळला ! भीमदेवासारखा कृतांत जवळ असतां यमानं झडप घालून माझा प्राण नेला ! ( भूमीवर निचेष्ट पडते. )

बखत०—( रामसिंगास एकीकडे ) रामसिंगा, काय रे हा दुःखाचा डोंगर आपणावर कोसळला ! आतां बाईसाहेबांना समाधानाच्या गोष्टी सांगाव्यात तरी काय ! स्वामिप्रेमानें जर आम्हांला इतकें पोळलें,तर जिच्या अंत:करणांत पतिवियोगाग्नीचा डोंब होऊन गेला आहे, तिच्या आंगाची केवढी आग व्हावी ! रामसिंगा, भीमदेवमहाराज इकडे येत नाहींत का रे ? आपले थोरले महाराज इकडे केव्हां येतील बरें ? तुला कांहीं तपास लागला का रे ?

राम०—( बखतसिंगास एकीकडे ) ही दुःखकारक वार्ता भीमदेवमहाराजांच्या आणि थोरल्या महाराजांच्या कानीं पडतांच त्यांनीं मोठा आकांत केला ! भीमदेवमहाराजांची कंबर अगदीं खचून गेली ! आपल्या महाराजांचें आणि भीमदेवांचें असेंच प्रेम होतें बरें ! तो घोडेस्वार सांगत होता कीं, भीमदेवमहाराज इकडे येणार आहेत म्हणून. मग केव्हां येतील ते येवोत ! आपण मनाला धीर देऊन बाईसाहेबांचें सांत्वन केलें पाहिजे.

बखत०—बाईसाहेब—

**चंपा०**—( शर्मिष्ठासारखें करून ) काय म्हटलंत, त्यांनीं रणदेवीला शत्रूंचीं हजारों शिरकमलें वाहिलीं तरी देवीची क्षुधा तृप्त झाली नाहीं, म्हणून भीमदेवांनीं आणि सगळ्यांनीं मिळून यांना पुढें ढकलून देवीला तृप्त केली ! असंच हो असंच ! नाहीं तर असा प्रसंग कशाला आला असता बरं !

**बखत०**—काय हें भलतेंच !

**चंपा०**—नाहीं हो मी खरंच सांगतें. आम्हांवर वर वर प्रेम दाखवून भीमदेवांनीं शेवटीं असा दावा साधला हो ! अहो भीमदेव, पाठीशीं पाठ लावून आल्याप्रमाणें आजपर्यंत वागून त्याचा हाच काहो शेवट केलात ! आणि अखेर इतकं वैर साधलंत कीं दिलीपाची समजूत करायला देखील आलां नाहींत ! तुम्ही जीवंत असतां, माझं सौभाग्य चोरांनीं लुटून माझ्या तोंडांत राख कीं हो कोंबली ! बाळा दिलीपा, या हतभागीच्या पोटीं तूं कशाला जन्माला आलास ! अरे पुरा वर्षाचा झाला नाहींस तोंच पोरका झालासना ! बखतसिंग, तुमच्यापाशीं हात जोडून एक शेवटचं मागणं आहे. प्रसंग आला आहे ! पदर पसरतें. रणभूमीवर जाऊन त्यांचं शव आणा हो तेवढं. नीट संभाळून आणा बरं. हाल करूं नका. त्यांना फरफर ओढूं नका. ( किंकाळी फोडून ) पण आतां त्या शरीरांत काय राहिलं आहे! —हाडांमासाचा सांपळा! आणि प्राण? यमानें केव्हांच ओढून नेला ( मूर्च्छित होते. )

**बखत०**—( एकीकडे ) परमेश्वरा, काय विकट प्रसंग आमच्यावर आणलास !

**चंपा०**—बखतसिंग, पाहिलंत का माझ्याकडे कसं डोळे वटारून पाहाणं होत आहे तें ! मला म्हणायचं होत आहे "अग राक्षसिणी, मी स्वर्गाची अर्धी वाट चालून गेलों, तरी तूं आपली अजून खालींच! नाहीं हो नाहीं. ही मी आलेंच बरं. बखतसिंग, सहगमनाला बरोबर पतीचं शव लागतं म्हणतात, तें तुम्ही आणा हो रणभूमीवर जाऊन! रामसिंग आतां किनई माझी बोळवण

ग्रंथ संग्रहालय

लवकर करा कशी! बाळा दिलीपा, डोळे उघडरे! या तुझ्या आईच्या पोटांत केवढा वणवा पेटला आहे पाहिलास का? पण तुला काय कळणार! आणि तुला कळत नाहीं तेंच बरं आहे! नाहीं तर तुझ्याकडे पाहून माझा निश्चय ढळला असता! तुला मी एकटी नाहीं हो सोडून जाणार! तुला बरोबर घेऊन मगच मी जाईन!

**बखत०**– (एकीकडे) आतां काय करावें? येथून जावें तरी पंचाईत! आणि न जावें तर हा आक्रोश कांहीं लवकर संपणार नाहीं! (रामसिंगास एकीकडे) रामसिंगा, तूं जा आणि भीमदेवमहाराजांना येथवर घेऊन ये एकदां! मी येथेंच जवळपास उभा राहतों, कारण न जाणों कदाचित् बाईसाहेब आपल्या जिवाचें कांहीं भलतेंच करून घ्यायच्या!

**चंपा०**—दुर्दैव फिरलं म्हणजे सगळेच फिरतात म्हणून म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं! बखतसिंग तुमची देखील मति पालटलीना! त्या मेल्या यमानं तुम्हाला देखील भुरळ घातलीना! बखतसिंग कोठं गेलं हो तुमचं शौर्य! अहो तुम्ही पुरुषासारखे पुरुष असून तुमची माझी एकाच जातींत काहो गणना! उठा, वाट चालूं लागा. हा पाहिलात का सूर्यनारायण अर्धी वाट चालून गेला. उठा.

**बखत०**—आम्ही जातों; पण आम्ही परत येईपर्यंत मनाला धीर देऊन रहा आणि कांहीं अविचार करूं नका. (रामसिंगास एकीकडे) रामसिंगा, तूं हो पुढें लवकर, मी येथेंच राहतों जवळपास (चंपावतीस) येतों बाईसाहेब आम्ही (दोघे जातात.)

**चंपा०**—परमेश्वरा, रामसिंग-बखतसिंग परत येतपर्यंत या माझ्या तान्ह्याला अशीच झोंप लागूं दे! (मुलाच्या तोंडाकडे पाहून) बाळा, तुझ्या तोंडावरून कोण बरं हात फिरवील! पण नकोच; आतां याच्याकडे पाहणंच नको. मी जर अशीच पहात बसलें, तर माझं मन उलट खाईल, जीव घोटाळेल, या मायेनं त्यांच्या चिरकाल संगतीच्या सुखाला मी मुकेन! (कांहीं आवाज ऐकलासें दाखवून खडबडून) अगबाई! कोणाचीं बरं हीं

पावलं वाजतात ! यक्षकिंनरांपैकीं कोणी मला त्यांच्याकडे घेऊन जायला आलं वाटतं ! बाबानों जरा थांबा. मी आपल्या तान्ह्याला एकदां शेवटचा अंगावर घेतें, आणि मग-( इतक्यांत भीमदेव येतो. ) उभयतांची दृष्टादृष्ट होतांच दोघेंही एकमेकांकडे पाहून मोठ्यानें हुंदके देऊं लागतात. )

**भीम०**—प्रसंग येऊं नये आणि आला ! आतां धीर धरून दुःख गिळलं पाहिजे ! तूं आपला आतां प्राण जरी वेचलास तरी जयसिंह परत येणार आहे का ?

**चंपा०**—भीमदेव कशाला हो आलांत या अभागीचें काळं तोंड पहायला!आणि तुमचं ही तें लाजिरवाणं तोंड मला दाखवायला!माझा गळा तुर्कांनीं कापला,आणि तुम्ही आमचे सहाय्यकर्ते स्वस्थ बसून अश्रु ढाळतां ! आणि मला "हें दुःख सोशीत अशीच झिजत मर" म्हणून उपदेश करतां ! समजलं ! हो समजलं, हा तुमचा मानभावीपणा !

**भीम०**—चंपावती, या जगांतून जे जे एकदां नाहींसे झाले ते कधीं परत आले आहेतका ? आम्हीं जरी सगळें आकाशपाताळ एक केलें तरी जयसिंह आतां फिरून कोठला दिसायला ! माझें ऐक. हा भीमदेव तुला कांहीं कमी पडूं देणार नाहीं. तुझ्या ह्या स्थितीकडे पाहून माझें अंतःकरण दुःखानें करपून जात आहे ! माझें ऐक. पुरे आतां हा शोक !

**चंपा०**—काय म्हटलंत ? पुनः तें तोंड दिसायचं नाहीं म्हणून ? अहो, या लोकींचं सुख अशाश्वत म्हणूनच त्यांनीं ही तोड काढली बरंका ! ते लवकरच उमजले आणि मी अजून अशीच अज्ञानांत ! त्यांनीं इहलोक सोडून मला आतां मूळ धाडलं बरंका ! आतां किं नई हें शरीर अग्नींत जाळून खाक करणार, म्हणजे त्यांचा माझा परलोकीं निरंतर एके ठिकाणीं वास घडेल. पण बाळा दिलीपा, माझ्या मागं तुझा कोणरे सांभाळ करील?

**भीम०**—असा घोर पण करून तूं मला जास्त दुखांःत लोटीत आहेस ! माझा मित्र गेला ! आणि तूंही मला सोडणार !

चंपावती, या भीमदेवाचें ऐक, आणि कांहीं विवेक कर. या तान्ह्यावर तरी अशी रुष्ट होऊं नकोस ! मित्रा जयसिंहा, तूं मला अशा दुःखांत लोटण्याकरितांच का रे अगोदर स्वर्गस्थ झालास?

**चंपा०**—माझ्या दिलीपानें वीराच्या पोटीं जन्म घेतला आहे तेव्हां त्याला कांहीं कमी पडणार नाहीं; पण तुम्हांला मात्र हें शोभलंना ! मला त्यांची अखेरची भेट सुद्धां होऊं दिली नाहींत ! भीमदेव, लढाई करतांना तुम्हीं डोळे काहो झांकले होतेत ? माझ्या सौभाग्यअलंकारावर तुमच्या समक्ष दरवडा पडला ! आणि तुम्ही येथेंच स्वस्थ बसलांत !

**भीम०**—चंपावती, नकोग अशा मर्मभेदक शब्दांनीं मला टोंचूं !

**चंपा०**—बाळा, उठ बाबा. भीमदेव, पूर्वीचें एक एक आठवलं म्हणजे पोटात कसं अगदीं भडभडून येतें ! भीमदेव, स्वर्गांत याहूनही अधिक सुख असतं नाहीं का हो ? हो असतं. भीमदेव म्हणा असतं म्हणून ! आणि तें चिरकाल टिकणारें नाहीं का ?

**भीम०**—तुझं आतां देहभान ठिकाणावर नाहींसं झालं बरं का ! या लोकींचें सगळें सुख भोगून झालें म्हणजे मग स्वर्गांतलीं सुखें भोगण्याला मनुष्य योग्य होतो ! येथलीं सुखें तूं अजून काय भोगलींस ! चंपावती हा भीमदेव जयसिंहाच्या वचनांत गुंतला आहेग, म्हणून म्हणतों माझ्याजवळ आनंदानें राहा.

**चंपा०**—काय त्यांच्या वचनांत गुंतलां ?

**भीम०**—लढाई सुरू होण्याच्या पूर्वी तो माझ्या गळ्याला मिठी मारून म्हणाला "मित्रा मी जर रणांत पडलों—आणि असें भाषण करतांना त्याला वाटलेंच होतें, कीं आपण पडूं म्हणून —तर माझ्या बायकोचा सांभाळ कर आणि माझ्या मुलाचा बाप तूंच हो." तो आग्रह सोडीना असें पाहून मी त्याला वचन दिलें.

**चंपा०**—काय, मी जीवंत राहून तुमच्या जिवावर दिवस कं-

ठावेत म्हणून त्यांनीं सांगितलं ! आणि माझ्या मुलानं तुम्हांला बाबा म्हणावें म्हणून ! अरे चांडाळा, भीमदेवा, हें तूं काय मला सांगतो आहेस ? मेल्या तुझी ही कसबाची करणी आतां माझ्या सगळी ध्यानांत आली बरंका ! असे शब्द तोंडांतून काढतांना तुझी जिव्हा कशी नाहीं झडली ? माझी अक्कल अगदीं गुंग झाली ! भीमदेव, आंब्याच्या झाडाला खरोखरीच रुईचीं फळं आणलींत ! सारं जग तुझ्या मित्रत्वाची तारीफ करील ! पुरा दावा साधलास रे शेवटीं !

**भीम०**—( सखेदाश्चर्य ) म्हणजे ! चंपावती हें तूं काय म्हणतेस ?

**चंपा०**—काय म्हणतेस ? माझ्या अंतःकरणांत आतां चांगलाच उजेड पडला ! ज्या ठिकाणीं हजारों रजपूत तुर्कांकडून कापले गेले, त्या ठिकाणीं तुम्हींच त्यांना मुद्दाम पुढें ढकललें. तुमच्या मदतीची त्यांनीं व्यर्थ आशा केली ! कारण तुमच्या मनांत काळं-पापवासना. तुम्हींच त्यांना मारवलंत आणि तुम्ही लांब उभे राहून खुशाल हंसत होतां. भीमदेव त्यांचे प्राण तुम्हीं वांचविले असते हो ! पण तुम्हीं तसं केलं नाहीं.

**भीम०**—( आकाशाकडे पाहून ) नारायणा हे काय शब्द ! हे माझ्यानें ऐकवत नाहींत. ( तलवार पुढें टाकून ) हा घे खांडा, आणि खुपस या माझ्या छातींत—

**चंपा०**—कशाला ? जग, जग. इतक्यांत कशाला मरतोस ? म्हणजे माझ्यासारख्या अनाथ स्त्रिया तुला अनायासेंच मिळतील. स्नेहाच्या मरणाची इच्छा करून त्याच्या स्त्रीविषयीं पापबुद्धी मनांत धरणारा—अधमाधम चांडाळ असा या जगांत तूंच ! तूं त्यांच्या वचनांत गुंतलास नाहींका ? आणि माझा सांभाळ करून माझ्या मुलाचा बाप तूंच होणार नाहीं का ? मेल्या तुला वडील म्हणून हांक मारण्याऐवजीं हा माझा मुलगा या हातांनीं आतां लवकरच विषाचा प्याला पिईल, आणि नंतर ही चंपा सगळीं प्रेतं तुडवीत ज्या ठिकाणीं ते पडले असतील तिथें भयंकर कि-

काळ्या मारींत जाईल समजलांत! अधमा तुझी मजवर प्रीति आहे नाहीं का ? आणि माझें संरक्षण करणार नाहीं ?

भीम०—परमेश्वरा, हे शब्द ऐकण्यापेक्षां मला एकदम बधिर कां नाहीं करून टाकीत ! पण चंपावती, तूं मात्र शहाणपणाचा पुराच टेंभा मिरविलास आणि परमेश्वराचा मोठाच अपराध केलास! चंपावती अशी जर दुष्ट इच्छा माझ्या मतांत कधीं येईल, तर या शरीराचे शतशः तुकडे होतील व मला यावचंद्रदिवाकरौ रौरव नरक प्राप्त होईल!

चंपा०—( पिसाळल्यासारखें करून ) चल चालता हो येथून! परमेश्वर माझा पाठीराखा आहे. तूं माकडानं काय माझा सांभाळ करावयाचा आहेस ! या पोराला कडेवर घेऊन आतांच समरभूमीवर जातें. या हातांनीं तिथं पडलेलीं प्रेतं उलथीं पालथीं करतें. त्यांच्या नांवानें मोठमोठ्यानें घसा फुटेपर्यंत टाहो फोडतें. जर थोडी धुगधुगी राहिली असेल तर माझा शब्द कानीं पडतांच मला ओळखल्याशिवाय राहणार नाहींत, आणि एकवार तरी प्रेमदृष्टीनें मजकडे पाहतील आणि त्या चांडाळांनीं जर त्यांचें प्रेत उचलून नेलं असेल तर ही चंपा तशीच मुलासुद्धां तुर्कांच्या छावणींत शिरेल ( मुलाच्या तोंडावरून हात फिरवून ) अशा या कोमल बाळाला पाहिल्यावर मला कोण मज्जाव करणार आहे ? हजारों तलवारी जरी उपसलेल्या असल्या तरी या बाळावर कोण वार करील? ते तरी मनुष्यच आहेत कीं नाहीं? असा कोणी तरी चांडाळ असेल काय, कीं कोणी साध्वी स्त्री आपल्या पतीच्या शवाचा शोध करीत आली असतां तिजला हांकून देईल—बापास पाहण्याकरितां एखादं अर्भक रडतं आलं असतां त्याच्या तोंडांत मारून त्यास परतवील!—मजसारख्या वैधव्य प्राप्त झालेल्या स्त्रीस पतीच्या शवाच्या शोधार्थ मुलास कडेवर घेऊन वाटेल तिकडे जाण्याची सदर परवानगी आहे. चल बाळा, या मेल्या मांमाचं आतां पुनः तोंड सुद्धां पाहायला नको! (मेल्या-

चं तोंड पहा कसं आतां काळं ठिक्कर पडलं आहे तें (मुलाला घेऊन निघून जाते ).

**भीम०**—( शोक व क्रोध अंतःकरणांत दाटून ) काळें ठिक्कर तोंड ! हे पंच महाभूतांनों, केवढी ही तुमची शिथिलता ! प्रलयकाळचा झंझावात सुटून हें जडशरीर अंतराळीं टहून गिरकांड्या कां खात नाहीं; किंवा सप्त समुद्रांना काळकूट विषाचा कढ येऊन त्याच्या पर्वतासारख्या उंच लाटांत हा देह पार गाडला कसा जात नाहीं ! किंवा आकाशांतील मेघाचा कडकडाट होऊन ते एकदम कोसळून या शरीराच्या ठिकऱ्या ठिकऱ्या कशा उडत नाहींत ! आणि हे प्राण ताडकन निघून जाऊन जोतीला जोत कशी नाहीं मिळून जात ! ! ! माझ्याभोंवतीं एवढा वणवा पेटून मी अजून जीवंत ! अहो रजपूत शूर शिपायांनों, या भीमदेवाचे हातून अपुरती राहिलेली देशसेवा तुम्हीच तडीला न्या ! कारण, खग्रास ग्रहण लागल्याप्रमाणें काळें ठिक्कर झालेलें हें माझें तोंड, पुनः तुमच्या दृष्टीस पडावयाचें नाहीं. वीराच्या अंगांतील रक्त खळचळणाऱ्या रणवाद्यांनों तुम्हीं जरी आतां सूर्यमंडळ भेदून जाणारा गंभीर शब्द उठवलात, तरी त्यापासून या भीमदेवाच्या अंतःकरणावर काय परिणाम ! देशदेवीच्या कट्टया भक्तांनों, लढवय्यांच्या रणभूषणांनों, इंद्राच्या गडगडाटांशीं स्पर्धा करणाऱ्या उल्हाटयंत्रांनों तुमचा प्रताप या भीमदेवाच्या दृष्टीस पुनः पडणार नाहीं ! घोर कल्पना ! अंतःकरणांत प्रचंड वावटळ ! आणि विचित्र देवयोग ! ! ( इतक्यांत दम लागलेला मोहनसिंग प्रवेश करतो. )

**मोहन०**—महाराज, आनंदाचें वर्तमान ! आणि सबळ पूर्वपुण्याई !

**भीम०**—खरोखरच पूर्वपुण्याई जबर ! आणि मोठाच आनंद !

**मोहन०**—म्हणजे ! महाराज यांत नाहींच का आनंद ?

**भीम०**—आनंद तर खराच, पण तो गृध्रादिकांना !

मोहन०—समरभूमीवर या वेळेस त्या खादाड पक्ष्यांनीं मोठीच मेजवानी चालविली आहे !

भीम०—मोहनसिंगा, त्यांना सांग कीं इतक्यांतच असा अधाशीपणा करूं नका !

मोहन०—आणि त्याचीच आज्ञा घेण्याकरितां आलों आहें. वाजवूं तर आतां लढाईचें शिंग ?

भीम०—याला लढाई कशाला ? तूंच तें काम करशील !

मोहन०—आज्ञा होण्याचा उशीर, कीं ही उपसलीच. (तलवार बाहेर काढतो.)

भीम०—( मान पुढें करून ) हं, चल तर मग आटप !

मोहन०— ( सखेदाश्चर्यानें ) महाराज, हें काय आपण सांगतां ?

भीम०—हेंच बाबा अपूर्व पूर्वपुण्य !

मोहन०—महाराज मी जयसिंहाबद्दल म्हणत होतों.

भीम०— आणि त्यांचें आतां या लोकीं काय आहे ! नांव मात्र राहिलें आहे.

मोहन०—नाहीं महाराज ! तो तुर्कांच्या घरांत कारागृहांत दिवस कंठतो आहे !

भीम०—( आश्चर्यानें ) कोण जयसिंह ! आणि तो जिवंत !

मोहन०—होय महाराज, ते लढाईत मूर्च्छा येऊन पडले, तेव्हां ज्या शिपायानें त्यांच्या मरणाची आपल्याला बातमी दिली तो शिपाई विव्हळ होऊन तसाच परतला आणि त्यामुळें पुढें काय झालें हें त्याला माहीत नव्हतें. त्यानें तर्कानें ते परलोकवासी झाले म्हणन सांगितलें ! आतांच हेरांनीं अशी बातमी आणिली आहे कीं, जयसिंह बादशहाच्या घरीं किल्ल्यावर कैदेंत आहेत.

भीम०— ( रागानें ) काय ! माझा मित्र तुर्कांच्या घरीं पुनः कैदी ! भीमदेवा पहातोस काय ? ( दोन हातांत दोन तलवारी घेतो ) मोहनसिंगा, आण ती अक्षय्य विजयी तलवार !

आतां हा भीम वायूप्रमाणें त्याच दिशेला उडाला पहा ! पण चंपावती, तुझी कोण पाठ राखील! तूं आतां कोठें गेली असशील! मोहनसिंग, चंपावतीची कांहीं हकीकत तुला कळली कारे ?

**मोहन॰**—त्या आतांच आम्ही नको नको म्हणत असतां रणमैदानाकडे मुलाला कडेवर घेऊन निघून गेल्या !

**भीम॰**—तर मग तिच्या मागोमाग जाऊन तिचें रक्षण कर. तिचें डोकें अगदीं फिरलेलें आहे, म्हणून म्हणतों तिच्या दृष्टीस पडूं नकोस; पण तिच्या पाळतीवर रहा आणि तिला कांहीं भलतीच गोष्ट करूं देऊं नकोस. चंपावती, तुझा पति तुला परत आणून देईन तेव्हांच हें माझें काळें ठिक्कर तोंड पुनः तुला दाखवीन ! आणि तुझ्या अंतःकरणांत या भ्रमानें शिरलेलें पिशाच्च बाहेर खेंचून माझ्या आयुष्याचें योग्य चीज करीन ! ( पडदा पडतो. )

---

## प्रवेश दुसरा.

—*—

### स्थळ—घोरी पावटीचा किल्ला.

( रायमल प्रवेश करतो. )

**राय॰**—अहो शहासाहेब, धन्य तुमच्या गाजीपणाची ! आणि तुमच्या उल्लूपणाची ! पूर्वीचा निमकहराम रायमल आतां नमकहलाल झाला आं ! आणि लाथा खातां खातां बेजार झालेल्या या रायमलापुढें आतां सगळे लोक हात जोडून उभे आं !

आणि हें सगळें काय म्हणून ! तर राजकन्येकडून बादशाहाचे गळ्यांत माळ घालावीण्याचा आम्हीं विडा उचलला म्हणून ! ज्यानें पूर्वीं या अहमदशाहाचा दरवाजा संभाळावा तोच मी आतां त्याच्या हृदयांत कायमचा शिरलों अं ! आतां काय हें याचें शरीर भुंग्याप्रमाणें पोखरून याला मातीला मिळवतों. अरे या नागणीची आणि तझी नुस्ती दृष्टादृष्ट झाली नाहीं तोंच जर तुला इतकें वीष झोंबलें तर तिनें तुला एकदां करकचून मिठी मारल्यावर तुझें शरीर विस्तवाशिवाय खाक होऊन जाईल. धर्माचें तुझ्या डोक्यांत शिरलेलें वेड तुला जलाल मात्रा मिळाल्याशिवाय कोठलें उतरायला ! अरे अहमदशाहा, रणांगणांत जाऊन घे एकदां आपल्या डोळ्यांचें पारणें फेडून ! जंगीसखान, दिलावरखान आणि दुसरे बडे बडे कित्येक खान–तुझे प्रत्यक्ष प्राण, या पातशाही तक्ताचे मुख्य आधार छिन्न भिन्न होऊन रणांगणीं पडले आणि रक्तमांस खाऊन खोल शब्द उठविणाऱ्या पक्ष्यांनीं त्यांच्यावर यथेच्छ हात मारला ! हें पाहून तुझें पाषाणहृदय अद्याप फुटत नाहीं ! अरे या तुंबल युद्धानें रक्ताच्या नद्या वाहून केवढा आकांत करून सोडला आहे ! रक्त, हाडें आणि मांस यांचा चिखल होऊन प्रेतें फाडण्याकरितां गृध्रादि पक्षी त्यांत रुतून गेले ! लढाईचे जामेनिमे, तीं धगधगीत शस्त्रें, तीं शरीरावरचीं अमूल्य भूषणें, मस्त होऊन कठोर किंकाळ्या फोडणारे गजाश्व हीं सगळीं पार मातीला मिळून गेलीं ! असो; तूर्त जयसिंहाची मुक्तता कशी होणार याचा विचार अगोदर. हा प्रतिसिंह एकदां मोकळा झाल्यावर यांना पाणी देखील पिण्याचा अवसर देणार नाहीं. राजकन्यारूप प्रखर अस्त्र माझ्या हातीं असल्यावर भऱ्या बुऱ्या उपायांनीं बादशाहाचें मन हां हां म्हणतां वळवीन. ( पडद्यांत निघून जातो; पडदा पडतो व पुन: पद्मावतीसह प्रवेश करतो. )

राय०—ऐकलेंत बाईसाहेब, हा खवळलेला बादशाहा आतां जयसिंहाला कांहीं जीवंत ठेवणार नाहीं. एक तर जयसिंहानें येथून पळून जाऊन बादशहाला पुरें ठकविलें; त्य

अपमानाचें विस्मरण होत आहे नाहीं तोंच जयसिंहानें दंड ठोकून सामना दिला आणि त्यांत जंगीसखानासारखे दुसरे शेंकडों खान यमपुरीला पाठविले ! आतां हा क्रोधाग्नि शांत कोठला होणार ! दुर्दैव ओढवलें आणि शेवटीं शत्रूनें त्याला गिरफतार केलें.

**पद्मा०**—( दुःखानें ) बाबा म्हणतील या अभागीच्या पायीं माझ्या राज्यांतील असे एकेक अमोल मोहेर बळी पडले ! रायमल, केवढाले हो माझ्या डोक्यावर हे पातकाचे घडे चढताहेत ! पण मी म्हणतें या कल्होळाचं मूळ बीज, हेंच जर या दुनियेंतून पार करून टाकलं तर नाहीं काहो बरं होणार ?

**राय०**—काय हा भलताच विचार ! आपल्या प्रेमाचें जाळें करून त्यांत हा अहमदशाहासिंह कसा अगदीं जखडून टाकला आहे. आजपर्यंत त्याला नानाप्रकारच्या थापा देऊन आपल्या चरणांची जी मीं एकनिष्ठ सेवा केली त्याची अशी अखेर होऊं देणार ! ! प्रसंग विकट आहे; अशा वेळेस कालत्रयींही न आवडणाऱ्या गोष्टी कराव्या लागतात; म्हणून म्हणतों बाईसाहेबांनीं माझ्याच धोरणानें चालावें.

**पद्मा०**—रायमल तुमचे मजवर अगणित उपकार आहेत ! हें रीण माझ्या हातून फिटणार नाहीं; पण किनई दिवसेंदिवस माझे पाय चिखलांत जास्त खोल खोल रुतत चालले आहेत, असं मनाला वाटतं आणि म्हणून असा धीर सुटतो !

**राय०**—असा प्रसंग पुनः येणार नाहीं; म्हणून म्हणतों कीं या वेळेस जर आपण ढिलाई केली तर मग सर्वच फसेल. रजपूत लोक बदमस्त होऊन मुलूख सर करीत येत आहेत ! त्यांच्या फौजेनें जिकडे तिकडे धूम मांडली आहे ! इतकेंच नाहीं, तर लवकरच ते या घोरीपावटीच्या किल्ल्याला शह देणार ! शहाचे फौजेस पाठलाग करितां येऊंनये म्हणून रजपुतांनीं आपल्या घोड्यांस उलटे नाल ठोकले आहेत ! आणि लढाई सुरू झाल्यापासून सहिसांनीं आपल्या घोड्यांचीं खोगरें उतरलीं नाहींत ! पातशाही

सैन्य किल्ल्यापासून तीन कोसांवर तळ देऊन शत्रूची वाट पहात बसलें आहे, आणि किल्ल्यांत दारूगोळा भरण्याची तयारी चालली आहे. लढाईत जखमी झालेले लोक किल्ल्यावर आणून टाकण्याची एकच धांदल उडाली आहे. खुद्द बादशाहाला थोडी जखम लागली असून त्याचा माद उतरल्यासारखा झाला आहे! अस्सल मुसलमान शिपायांना, रजपूत लोकांकडून लढाईची वरचेवर हूल येत असल्यामुळें, तळ सोडून हलतां येत नाहीं. अशा वेळेस मीं एक उत्तम तोड काढली आहे. आज्ञा होईल तर सांगतों.

**पद्मा०**—मी जातीवंत रजपुताची बेटी असल्यामुळें असं वाटतं (कट्यार बाहेर काढून) या वीतभर शस्त्रानं त्या मेल्या चांडाळाचा गळा कापून काढावा! आणि मग आपण यमाच्या घरीं चालतं व्हावं! पण कसं करूं, काय करूं, या विचारांत असे दिवस काढणं नको! अब्रू बचाऊन एकदां घरीं जाऊन बाबांना आणि आईला भेटेन, ही जळ्ळी आशा अजून सुटत नाहीं! या आशेलाच जर एकदां फांटा दिला तर मग काय! सगळंच आटपलं! भयंकर विचारांनींच जर एकदां या डोक्यांत गर्दी करून दिली तर केवढा मोठा अनर्थ गुदरेल!

**राय०**—तसे भयंकर विचार तूर्तच मनांत नाहीं आणावयाचे! (पद्मावती खंजीर लपवून घेते) अगोदर सौम्य उपायांनींच काम साधलें तर पहावयाचें; आणि ती गोळी फिकी पडली तर शेवटची मात्रा आहेच!

**पद्मा०**—तूर्तचा प्रसंग टाळायला कोणता उपाय तुम्हीं मनांत आणला आहे रायमल? या हतभागीला लाजिरवाणं आयुष्य कंठण्याची वेळ येईल किंवा माझ्या बदलौकिकाचा डंका साऱ्या त्रिभुवनांत गाजेल, अशा प्रकारचा विचार नका हो मनांत आणूं! ज्या दुत्ताला मी पूर्वीपासून भितें आहें तेंच माझ्यापुढें नका हो उभं करूं!

**राय०**—बाईसाहेब, गमगीन न होतां 'बादशाहावर माझें मन आशक आहे' असें बोला, आणि प्रेमाचा मोठा बहाणा करा.

तो उल्लू बादशाहा या सोंगाला भुलून 'जयसिंहाला सोडून द्या' म्हणून एकदम हुकूम करील; आणि तो का एकदां सुटला म्हणजे संपलेंच आपलें दुर्दैव ! ( इतक्यांत बादशाहा दोन शिपायांसह किल्ला फिरत असतां येतो. त्यास पाहून दोघेही दचकतात. पद्मावती तोंडावरून पदर घेते. रायमल पद्मावतीच्या कानांशीं लागतो. )

**बाद०**—( पद्मावतीस पाहून आनंदानें ) रायमल, तू बडा इमानदार नौकर है. मेरी बहोत खातिरजमा हुयी. ( पद्मावतीकडे वळून ) सुभानअल्ला ! क्या खुबसुरती है ! बयानसे बेद ! ये हुसनपर दिल गिरफ्तार हुवा; अब छुटना दुष्वार है ! मिजास तो बहोत खुष नजर आता है !

**पद्मा०**—( तोंडावरचा पदर किंचित् पाडल्यासारखें करून ) आपल्याला पाहून खुषी वाटली आणि दुसरें काय ?

**बाद०**—( रायमलाकडे वळून ) मेरी बहोत दीनसे अर्ज है के इस्से शादी करूं. रायमल इस् बारेमे ये परीकी क्या राय है ?

**राय०**--याविषयींच आतां आमची गोष्ट निघाली होती. शहेजादी हुजूरवर आषक्त आहे !

**बाद०**—( आनंदानें ) माषा अल्ला ! क्या अच्छी बात है ! ( पद्मावतीकडे पाहून ) क्या तेरी अच्छी तकदीर है ! हजारों लौंडिया तेरे खिदमत्मे रातदीन खिदूमतगुजार रखूंगा ! और तेरी पोषाकूके वास्ते हर् किसम्का कपडा और हजारों किसम्का जव्हारात मोज़ूद करूंगा !

**राय०**—बहोत मुनासिब है. तकसीर माफ–शेहेजादी बीमार आहे तेव्हां–( इतक्यांत एक मुसलमान शिपाई धांवत येतो, त्याच्याकडे वळून ) क्या खबर !

**शिपाई०**—( बादशाहापुढें हात जोडून ) आपके सरदार लोगोनें जयसिंहकू गिरफ्त करके लाया है.

**बाद०**—( आनंदानें उड्या मारून ) क्या अच्छा हुवा!

बडी खुषी हुयी ! तेरेकू इन्आम दिलाताहूं. उस् बदमाषकू पावंद करके हमारे सामने जल्दी लाव.

**शिपाई॰**—बहोत् अच्छा सरकार. ( निघून जातो. )

**बाद॰**—क्या हमारे सामने ऐसे नामर्द लोग लडते है ! मगर भीमदेव सैतानके मरनेकी कोई आकर खबर देगा तो मै निहायत खुष हो जाऊंगा ! उनने मेरे सेंकडों लोक कतल किये !

**राय॰**—सरकार जयसिंहाला आतां कोणती शिक्षा करणार?

**बाद॰**—उसके जीको हरतऱ्हेकी इजा देकर, उसके बुरा हाल कर कर, उस्का चमडा निकालके, उसके आंखे फोड डालके, फिर उसकू कतल करेंगे !

**पद्मा॰**—शत्रु हातीं सांपडला असतां त्याच्यावर रहेम करावी असा धर्म आहे.

**बाद॰**—ऐसी बाते हम् कुच्छ जानते नही. उसकू मारनेका हमे एखत्यार है.

**पद्मा॰**—मी अशासाठीं विनंती करतें कीं, अशा रीतीनें त्याला मारलें तर सरकारची त्यांत बदनामी होईल. कोणी भलं म्हणणार नाहीं, ह्याचं मला वाईट वाटतं; दुसरं कांहीं नाहीं. हुजूरचा लौकिक तोच माझा लौकिक.

**बाद॰**—मेरा मिजाज ऐसा है के, एक दफे जो मेरा दुष्मन् ठेरा—या गुन्हेगार ठेरा–उसकी जान लेनेमे मै किसी तऱ्हेका फर्क गजारस्त नही करता हूं. ( कांहीं मुसलमान शिपाई जयसिंहासह प्रवेश करतात. जयसिंहाकडे वळून ) आईये साहेब. आई ये साहेब. तशरीफ रखीये. बहोत दिनोंसे मुलाखत हुई. ( रागानें ) ऐ कंबख्त, तेरे उपर लडाईमे इसकदर तक्लीफ हुई है. फिलहाल तो तेरी जान जानेका वख्त् आया है; मगर तेरे चेहरे और दिलपर किसी तऱ्हेका हिरास नही पाया जाता है ! ताजूबकी बात है के तेरे चेहरेपरसे नूर टपक रहा है ! ऐसा मालूम होता है के तू बेहिरास है. इसका सबब क्या है?

जय०—मी जातीचा अस्सल रजपूत आहें यांतच काय तें समज !

बाद०—ह्यांसे भाग गया और फिर व्हां जांकर तूनें अप्नी शादी किई; और उसे एक अवलाद पैदा हुई. वोभी तेरे जैसी बदमाश होगी ! बडा अबसोसकी वात है के कल तेरा बच्चा अप्ने बाबाजानकूं नही देखगा. अभी तेरेकू कत्तल करनको हुकूम फौरन देताहूं.

पद्मा०—( दुःखानें ) हुजूरनी असें करणें मुनासिब नाहीं. धरून आणलेल्यावर शस्त्र चालविणें शूराचें काम नव्हें !

बाद०—तूं ह्यांसे इस् वख्त चली जा, नहीं तो तेरेकोभी सजा दिई जावेगी ( जयसिंहाकडे वळून ) फत्तरकी पूजा करता-है ! अब् ले उसका नतीजा ! अब् कभी सोमनाथकी पूजा करेगा क्या ?

जय०—अबलत्त करीन. बेडकाला कमळांतील माधुर्य काय माहीत ! त्यानें तळाला बसून चिखलच खावा !

राय०—शेहेजादीच्या मनाला सुख वाटेल असें सरकारांनीं करावें असें मला वाटतें. सरकारच्याकरितां मी इतके दिवस जी खटपट केली तिची अखेर अशी होऊं नये! सरकारांनीं जय-सिंहाला कत्तल करण्याचा विचार केला तो बरोबर नाहीं.

बाद०—ऐसे माषुकके वास्ते मै क्या नहीं करसकता ! मगर मजहबूके बारेमें मै कीसीका सुनता नही. रायमल तुम् तासुब न करो. ( जयसिंहाकडे वळन ) मै समजताहूं के तूं जा-तका अस्सल रजपूत नही. कमजात है ! मगर रजपूत लोगोमें आकर मिलगया है.

जय०—तुझ्यासारखे जे कोणी अल्लाचे दोस्त या दे-शाची संपत्ति पाहून लाळ घोटीत इकडे येतात आणि आमच्या धर्माचा उच्छेद करूं पाहतात त्यांचा खरपूस समाचार घेण्याकरि-तां माझी उत्पत्ति आहे समजलास! जातीचा खरा रजपूत आहे

किंवा कोण आहे याचा तुला आजपावेतो अनुभव आहेच; आणि ईश्वर करील तर पुढेही येईल !

**बाद०**—जादे मत् बको. अंजाम् इस्का अच्छा नही. बदमाश कुरनीसादमी करता नही. जा इस्कू लेजा और कल सुभे इस्को कतल करडालो. तेरे मरनेकी खबर तेरे औरतको हम् पोहोचा देंगे! जाव.

**जय०**—नीचा ! अधमा ! चांडाळा ! काय भाषण मुखांतून काढतोस ! ( बिडीसुद्धां मारावयास धांवतो. त्याला शिपाई खेंचून फरफर ओढीत नेतात. )

**पद्मा०**—( दुःखित होते ).

**बाद०**—( पद्मावतीकडे पाहून) शेहेजादी मेरा वो दुष्मन् है इस्‌वास्ते मै उस्की जान लेता हूं कसम् खुदाकी कल सुभेके वरुन् ये आफताफ्‌क् नही देखेगा. ( बादशाहा निघून जातो. )

**पद्मा०**—झालं रायमल ! व्यर्थ हो वेड्यावॆद्र्या शब्दांनीं मी आपलं हें तोंड विटाळलं ! मी आपल्या इच्छेविरुद्ध वाटेल तें बकले, पण मेल्याच्या पाषाणहृदयावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं ! रायमल, आतां कांहीं माझी धडगत होईल असं मला वाटत नाहीं ! अरे यमा, तुला मी अजून दिसत नाहीं कारे, कीं माझं पाऊल अझून पापमार्गी पडलं नाहीं म्हणून तुझे दूत माझ्यापुढें यायला भितात ! कसं म्हणू तरी कसं? रायमल, मेल्या यमाच्या घरीं देखील आवडनिवड आहेना ? पण कायहो रायमल, ही निवड आपल्या हातीं नाहीं का हो ?

**राय०**—ही निवड आपल्याला देखील करतां येईल; आणि आपली निवड अनेक प्रसंगीं यमाहून जास्त शहाणपणाची आणि अधिक क्रूरपणाची होईल ! एखादा प्राणी आपण जसा हाल हाल करून मारूं तितकी शिताफी यमाला येणार नाहीं !

**पद्मा०**—मग मी म्हणतें, अशीच कांहीं यमाला लाजविण्याची तोंड आपण काढली तर नाहीं का बरं ?

**राय०**—पण बाईसाहेब, आपले डोळे चढल्यासारखे दिसतात! हें काय ?

**पद्मा०**—माझी तंद्री त्याच विचाराकडे लागली असल्यामुळं तुम्हाला असं दिसतं; पण काय हो रायमल, एवढया धिप्पाड राक्षसी साडेतीन हातांच्या देहांतील प्राण एवढ्याशा टीचभर पात्याने बाहेर खेंचतां येतो काहो ?

**राय०**—हें एवढें हत्यार एकच काय, पण असे सहस्रावधि देह निर्जीव करील !

**पद्मा०**—तर मग हा खंजीर भोजराजांनीं सांगितल्याप्रमाणे मित्रही आहे आणि शत्रुही आहे ! पण हीं नातीं लावून घेणं ज्याच्या त्याच्या शहाणपणावर आहे; नाहीं बरें ? आहे म्हणून म्हणा; तुम्ही असे थंड कां ? जयसिंहाचे प्राण कसे वांचतील याचीचना काळजी ? अहो तें काम माझ्याकडे लागलं. तुम्ही मला मी सांगेन तिकडे घेऊन चला म्हणजे झालं. मग जयसिंह सूर्योदयाच्या आंत मरतो कीं बादशाहा मरतो हें तुम्हाला दाखवितें ! ( पडदा पडतो ).

**चवथा अंक समाप्त.**

---

# अंक पांचवा.

---*---

## प्रवेश १ ला.

### स्थळ—घोरीपावटीचा किल्ला.—तुरुंग.

( पाहारेकरी टहेलतो आहे. )

पाहा०—प्रारब्धा, खूप केलीस बाचा ! या यःकश्चित् मनुष्यावर हल्ला करुन तुला कोणता पुरुषार्थ मिळाला, आणि तूं कोणतें काम साधलेंस हें तुझें तुलाच माहीत ! आयुष्याचीं पहिलीं तीस वर्षे कपाळावर हिंदू या नांवाचा पट्टा ओढून कंठलीं नाहींत तोंच दुर्दैवाचा फेरा आमच्यावर येऊन आम्हांस यथासांग मुसलमानी धर्माची दीक्षा मिळाली ! आमच्या या पिढीपासून आम्ही मुसलमान झालों आणि कांहीं दिवसांनीं आमचे नातपणतू कांहीं तिसऱ्याच धर्मांत शिरतील ! पण ही शोचनीय स्थिति कोणाची, तर ज्यांच्या आंगांत अस्सलपणा नाहीं त्यांची ! जगानें ज्याला लाथाळलें, त्यालाच हें प्रारब्ध लोळवतें ! आणि यांत कांहीं विपरीत प्रकार होत नाहीं, कारण बलवानांचें तरी हेंच ब्रीद आहे कीं, ज्यांची पाठ एकदां जमीनीला लागली, त्यांच्यावरच घाव घालीत बसावयाचें ! आम्ही मारूनमुटकून बनविलेले मुसलमान, तेव्हां आमचीं मनें अस्सलासारखीं कोठचीं कडवीं बनायला ! आमचें उत्पत्तिबीज पडलें हिंदू, तेव्हां तिकडे आमचा ओढा विशेष,पण आंगांत धमक नाहीं!एवंच आम्ही आपले इकडेही नाहीं, आणि तिकडेही नाहीं ! आमच्यासारखे दिव्य पुरुष जीवंत राहून शेवटीं अशा रीतीनें यमपुरीचे

द्वारपाल बनतात! आणि पापरूपी धनराशीचे असे रक्षक बनतात! धि:कार अशा पुरुषांना ! आजपर्यंत या हातानें पापकर्में किती झालीं असतील, याची गणती करावयाला लागलों तर साऱ्या पृथ्वीचा पट जरी केला, तरी तो पुरणार नाहीं ! आणि एवढें खंबीर कलम तरी कुठलें मिळायला ! पण यमाच्या घरचे कारकून इतके पटाईत कीं, अशा एकशा काय, पण अगणित प्राण्यांचे पट तेव्हांच चित्रविचित्र करून सोडतात ! पुण्यकर्में किती झालीं म्हणून जर मोजूं लागलों ( बोटें घालूं लागून ) तर यांतलीं बहुतेक बोटें तोडावीं लागतील ! असो या नीचतर सेवेचा जितका विचार करावा तेवढा आंगाचा जास्त दाह होणार ! तेव्हां हें भोक्तृत्व कधीं संपेल आणि काळाच्या विक्राळ तोंडांत आमची कधीं स्वाहा होईल याचीच वाट पहात बसावें हे बरें !

( पायांत बिडी घातलेला जयसिंह बसला आहे असा पडदा उघडतो

जय०—आमच्या अवताराचा हा असा शेवट होऊन अखेर नरकपुरीचीच भरती व्हावी आं! शत्रूंशीं झुंजतां झुरतां जो देह धारातीर्थात पुनीत व्हावयाचा, त्याची अंतीं अशी विटंबना व्हावीना! अहो खलसंहारप्रिय देवाधिदेवांनों, केवढा हा तुमचा निर्दयपणा ! ज्या या हातांना आजपर्यंत धगधगीत प्राणघातक खड्गाशिवाय दुसरें भूषण माहीत नाहीं त्याच हातांनीं आतां निमूटपणें लोहशृंखला धारण केल्या ! ( हात आपटून ) तुम्हांला एकदम जाळून खाक करण्याचें मंत्रसामर्थ्य जर माझ्यामध्यें असतें, तर फार चांगलें झालें असतें ! हे माते वसुंधरे, कृतांताशीं झगडणारे असे सहस्त्रावधि वीर तुझ्या उदरांत समाधिस्त झाले आहेत त्यांना आपलें पोट फाडून बाहेर काढ, आणि तुझ्या पोटावरचें हें अविंधांचें ओझें हलकें करून घे ! आकाशांतील नक्षत्रांनों तुमच्यापासून दिव्य पुरुषांची उत्पत्ति आहे असें म्हणतात, हें जर खरें असेल, तर तुम्ही एकदम खालीं उतरा, आणि प्रलयका-

ळचा आक्रांत करून सोडा ! केवढा भयंकर प्रसंग ! आज तीस वर्षे या आंगांत कढत असलेलें रक्त, एक चार प्रहरांत थंड होऊन जाऊन या हृदयांतील ईर्षा आणि हुरूप पार नाहींशीं झाली, ही केवढी मानहानी ! अंतःकरणांत प्रचंड वणवा ! आणि अंतीं मानेवर प्रखर शस्त्रांचा आघात ! धिक् !

( एक शिपाई वाढ़न घेऊन येतो. )

**पाहा०**--( शिपायास पाहून ) बोल, पत्रक काय आहे तो ?

**शिपाई**-- सुलतान अहमदशाहा गाझी रोझ अबझू.

**पाहा०**--जा आंत ( शिपाई जयासिंहाजवळ जातो. )

**जय०**—( वर पाहून रागाच्या त्वेषांत ) कोण ? यमपुरीचे दूत ! आणि त्यांचा संचार येथें !

**शिपाई**—नाहीं महाराज, मीं हें खायला आणलें आहे.

**जय०**—कोणीं पाठविलें आहे ?

**शिपाई**—आमच्या पद्मावती आईसाहेबांनीं पाठविलें आहे; आणि तोंडजबानीं असा संदेशा पाठविला आहे कीं, उभाउभी महाराजांना मी पहांटे भेटून जाईन.

**जय०**—त्यांना उलट निरोप कळीव कीं, हे मजवर तुमचे अगणित उपकार आहेत ! खाण्याविषयीं म्हणशील तर मला मुळींच इच्छा नाहीं–जा तें परत घेऊन--तूंच खा नाहीं तर आपल्या बायका मुलांना दे.

**शिपाई**—महाराजांच्या हाताखालीं मी पूर्वी कांहीं दिवस नौकर होतों. आतां मला या तुर्कांनीं गुलाम म्हणून धरून आणलें आहे ! महाराजांना अशा स्थितींत पाहून माझे डोळे पाण्यानें डबडबतात ! अंतकाळीं या हातानें कांहीं स्वामीसेवा व्हावी ही इच्छा आहे ! पण परमेश्वरी नेमानेम असेल तसा ! येतों मी सरकार ! ( निघून जातो. )

**जय०**—शाबास पद्मावती ! महाराज सामतसिंह यांच्या पोटीं जन्म घेतल्याचें तं साफल्य करशील यांत कांहीं शंका नाहीं ! आणि हे शिपाया, तुझी एकनिष्ठा तुला फळाला येवो ! मित्रा

भीमदेवा, तुझ्या अगोदरच काळानें मला खेंचलें हें पाहून तुझें हृदय फाटूं देऊं नकोस ! तुझ्या अगणित उपकारांचें भलें भक्कम गाठोडें मी तसेंच पाठीशीं बांधून चाललों म्हणून मित्रा, तूं रागाऊं नकोस ! आजपर्यंत उन्मत्त खलांना मीं धूळ चारली, आणि आतां यमानें माझी तीच अवस्था केली म्हणून हळहळं नकोस ! देशाच्या आणि धर्माच्या रक्षणासाठीं हातावर शिरकमलें घेऊन आर्यजननीस तुष्ट करणाऱ्या देशबांधवांनो कमरा खेंचून आपल्या मर्दुमकीनें **रजपूत** हें नांव मागे अजरामर ठेवा ! आणि आपल्या गाजीपणानें आपल्या विजय दुदुंभींचा गंभीर नाद आकाश फोडून स्वर्गांत घुमवा ! आणि या तुर्कांना या भूमींतून पार पिटाळून लावा ! स्वातंत्र्य ही आराध्य देवता स्थापून देशाभिमान, बंधुप्रीति, आणि एकनिष्ठ राजसेवा यांचा विमलध्वज दिगंत फडकत ठेवा ! आणि अनीतिमत्तेचें या भूमीवर पसरलेलें बीं, त्याचें अफाट रान माजूं न देतां खणून काढा ! ( कंठ भरून येऊन ) आम्हां वीरांना मायापाश हा केवढा जबरदस्त शत्रु आहे ! आमच्या तलवारीनें मोठमोठे पीळदार देह सपासप दुखंड होतात ! पण हा मायापाश कांहीं तुटत नाहीं ! चंपावती, तुझ्या कपाळीं वैधव्याचा डाग लागला म्हणून खिन्न होऊं नकोस ! तूं वीरपत्नि आहेस, आणि पातिव्रत्याचें खडतर तप तूं एकनिष्टेनें आचरित आहेस तेव्हां तुला मुक्ति मिळेल ! बाळा दिलीपा, वीराच्या पोटीं जन्माला आला आहेस, तेव्हां आपल्या अस्सलपणाला विसरूं नकोस, आणि आपला कीर्तिगंध दाहीदिशा फांकवून आपल्या आईला धन्य कर ! ( दु;खानें ) माझी वेळा भरली ! आणि ही पहा यमदूतांची झुंड इकडे येऊं लागली ! ( डोकें भुईला टेकून बसतो भीमदेव प्रवेश करतो. )

**भीम०**—एवढा हा अभेद्य दुर्ग, पण परमेश्वर नामरूप भेद्याबरोबर असल्यामुळें, हा एका प्रहरांत भेदून येथें येऊन पोहोंचलों ! निरनिराळ्या कल्पनांचा अंत:करणांत कल्होळ उठून आपल्या

आजन्म धारिष्टाचा कळस करून सोडण्याची जबरदस्त इछा हट्टाला पेटून त्याच वायूच्या झटक्यांत खंदकाच्या पलीकडच्या बाजूनें फेंकलेली घोरपड किल्याच्या तटावर कशी अचुक जाऊन लटकली ! हा खंबीर सोल कमरेला आवळून खंदकांतील पाण्यांत सुरकांडी मारल्या बरोबर जळदेवतांच्या आशीर्वादानें हे हात सिंव्हाच्या पंज्याप्रमाणें बळकट बनून टरारून गेले ! किल्ल्याचा तट चढून वर आलों मात्र तोंच कैफ करून घोरत पडलेल्या मर्दांचा आवाज माझ्या कानीं पडला ! कोणच्या वाटेनें कोणीकडे जावें त्याचा विचार करतों आहे नाहीं तोंच " हें ताट घेऊन जयसिंहाकडे जा " असे शद्ब माझ्या कानीं पडले ! अमावास्येची रात्र, काळोख किट्ट, आणि मध्यरात्रीचा अम्मल असें असतां हा एकटाच, दिव्या शिवाय, चोरून कां चालला ! आणि हें ताट कसलें ! याविषयीं विचार करूं लागलों तो मनांत भयंकर कल्पना येऊं लागल्या ! क्रोधानें डोळे लाल झाले आणि असे ओले चिंब कपडे एक प्रहर अंगावर असतांही सर्वांगाचा दाहा होऊन गेला ! त्याच्या मागोमाग—

**पाहा०**—( कोणाची चाहूल वाटल्यावरून ) कोण आहे तिकडे ? आं ! कांहींच जबाब येत नाहीं ! कोण आहे बोलतोस कीं नाहीं ?

**भीम०**—एक साधु पुरुष तुरुंग पाहण्याकरितां आला आहे. कायहो शिपाई दादा, याच का अंधार कोठडींत जयसिंहाला कैद केलें आहे ?

**पाहा०**—होय याच खोलींत.

**भीम०**—मला त्याच्यापाशीं चार शद्ब बोलावयाचे आहेत. ( आंत जाऊं लागतो. )

**पाहा०**—( तलवारीचें टोंक पुढें करून ) चल हट, चल हट माघारा-मोठ्या डौलानें आला आहे !

**भीम०**—तो माझा बडा दोस्त आहे. आणि किल्लेदाराचा मीं तोंडी परवाना काढला आहे.

पाहा०—प्रत्यक्ष तुझा बाप असला म्हणून मला काय सांगतोस ! आणि किल्लेदारांनीं तोंडीसा परवाना दिला ?

भीम०—त्यांना आमची कींव आली आणि आमच्या दृढ ईश्वरभक्तीची साक्ष त्यांना पटली म्हणून !

पाहा०—तुमच्या अंगांत असें कांहीं अलौकिक सामर्थ्य आहे ! आपण कुठले आणि आपल्या अंगावरचीं वस्त्रें ओलीं कां ? असे भोंदू आम्हीं पुष्कळ पाहिले आहेत !

भीम०—आम्हीं नेहमीं अशींच ओलीं वस्त्रें अंगावर घालीत असतों—पण बाबा जयसिंहाला काय सजा झाली आहे !

पाहा०—सूर्योदयाबरोबर त्याची गर्दन छाटणार !

भीम०—अरेरे ! तर मग मी अगदीं वेळेवर आलों म्हणावयाचा !

पाहा०—होय, गर्दन कशी उडवितात तें तुला चांगलें पाहावयास सांपडेल !

भीम०( आर्जव करून ) शिपाईदादा, मला त्याच्याशीं दोन शब्द बोलूंद्या हो !

पाहा०—चल हट. ( मनाशीं ) यांत कांहींतरी ईश्वरी अवतार दिसतो ! ही याची तेजःपुंज कांति, हें भव्य कपाळ, ही दिव्य दृष्टि ! हीं सर्व कांहीं ईश्वरी अंशाचीं दिसतात !

भीम०—( काकुळतीस येऊन ) एक क्षणभर मला आंत जाऊंद्या हो !

पाहा०नाहीं बाबा, तुला या वेळीं त्याचें तोंड सुद्धां दृष्टीस पडणार नाहीं ! मग बोलणें लांबच राहिलें ! मला सक्त ताकीद आहे कीं, प्रत्यक्ष माझा बाप जरी आला, तरी त्याला सुद्धां आंत जाऊं देऊं नये !

भीम०—पण आतां इतक्यांत एक मनुष्य आंतून बाहेर गेला ! मीं प्रत्यक्ष पाहिला.

पाहा०—त्यानें परवल सांगितला तो आम्हीं सगळ्यांनीं मान्य केलाच पाहिजे, असा शहाचा हुकूम आहे.



श्री ग्रंथ संग्रहालय ... क्र. ... सं.

भीम०—( मोहोरा, पुतळ्या, हिरे,मोतीं वगैरे पुढें करून ) हं चल घे हें तुला, तूं गरीब आणि मोठा भला मनुष्य दिसतोस ! घाल हे तुझ्या बायकोमुलांच्या अंगावर ! पण मला क्षणभर माझ्या मित्राशीं बोलण्याची परवानगी दे.

पाहा०—अरे जा, मी असा लाचलुचपत खाणारा नाहीं समजलास ! आणि आतां तर तुला मुळींच जाऊं देणार नाहीं. माझ्या इमानाची आतां पारखच आहे. मी फार दिवसांचा बादशाहाचा इमानी नौकर आहे. विश्वास घात करणार नाहीं.

भीम०—तुला बायको आहे कीं नाहीं ?

पाहा०—कां बरें ? आहे.

भीम०—मुलेंबाळें आहेत कीं नाहींत ?

पाहा०—चार इमानी मुलगे आहेत !

भीम०—हल्लीं तुझी बायकोमुलें कोठें आहेत ?

पाहा०—लांब माझ्या गांवीं आहेत.

भीम०—तुझी बायको आणि तुझीं मुलें तुला फार प्रिय असतील नाहीं बरें ?

पाहा०—प्रिय आहेत, कीं नाहींत, हें एक परमेश्वराला माहीत ! माझी ममता अशी आहे—

भीम०—शिपाईदादा, अशी कल्पना करा, कीं बादशाहाची मर्जी खप्पा होऊन एकाएकीं तुम्हांला हालहाल करून मारण्याचा हुकूम झाला ! मग तुमचा जीव कोणीकडे गुंतेल ? आणि बादशाहाजवळ तुम्ही अखेरचें काय मागणें मागाल ?

पाहा०—हेंच, कीं त्यानें माझ्या बायकोमुलांस मला एकवार भेटवावें. निदान माझ्या दोस्ताकडून त्यांना माझा शेवटचा निरोप तरी पोहोंचवावा.

भीम०—मग अशी कल्पना करा,कीं तुमचा दोस्त दारांत तुम्हांला भेटण्यासाठीं आला असून, त्याला दारावरचा तुमच्यासारखा निर्दय शिपाई आंत जाऊं देतनाहीं ! आणि मुलाबाळांना

तुमचा आशीर्वाद घेऊन जाऊं देतनाहीं! तर तुम्हांला त्या पाहारेकऱ्याचा किती राग येईल बरें?

पाहा०—असें विचारण्याचें कारण?

भीम०—कारण हेंच, कीं जयसिंहाला बायको असून एक लहान मुलगा आहे; आणि जयसिंहाचा जर अखेरचा निरोप असेल तर तो त्यांच्या कडे घेऊन जावा, एवढ्याचकरितां मी येथें आलों आहे.

पाहा०—( गहिंवरून ) जा बाबा! जा आंत! पण लवकर बाहेर ये बरें! या त्या खोलीच्या किल्लया आणि यांतच सर्व किल्लया आहेत बरें! ( किल्लया देतो व बाजूला जातो )

भीम०—ईश्वर तुझें कल्याण करो! प्रत्येक प्राणीमात्राला, मग तो मनुष्य असो, पशू असो, अथवा पक्षी असो, परमेश्वरानें मायापाशानें कसें गुंतवून ठेविलें आहे! कसा जरी संकटसमय प्राप्त झाला तरी त्याला तोंड देऊन संकट भोगण्यास आपण तयार होतों, आणि आपल्या मुलाबाळांचें संरक्षण करितों! पर्वताच्या तुटलेल्या कड्यावर गरुडपक्षी आपलें घरटें करितो, आणि त्या स्थलीं पंख पसरून आपल्या पिलांना पिसाऱ्याखालीं झांकून घेऊन, वारा पाऊस व ऊन यांपासून त्यांचें रक्षण करितो! काय ही ईश्वरकरणी!! ( लांब पाहिलेंसें करून ) पाहारेकरी आतां बराच लांब गेला. ( खोलीचें कुलूप काढतो. आंत जातो. ) जयसिंह, सिंहा, हें काय! चल ऊठ--

जय०—मला अजून परमेश्वराचें नांव घ्यावयाचें आहे! यमदूतांनो थांबा, अशी घाई करूं नका! अजून अर्धा प्रहर अवकाश आहे!

भीम०—वर बघ! मला तूं ओळखलें नाहींस? अरे मी भीमदेव. ( साधुवेषाचीं वस्त्रें झुगारून देतो. भीमदेवाला ओळखून जयसिंह गहिंवरून त्याच्या आंगावर पडतो. दोघेही कांहीं वेळ स्तब्ध होतात. )

जय०—मित्रा भीमदेवा, या हतभाग्याचा असा अंत व्हावाना!

आजपर्यंत पाळलेल्या क्षात्रव्रताचें उद्यापन तुझ्या हातानें होईल अशी बळकट आशा धरून मी परलोक यात्रेची केलेली तयारी तुला रुचली नाहीं, म्हणून का तूं येथवर धांव घेतलीस ! काळदूतांचा हा भयंकर गराडा माझ्या भोंवती पडला असतां, तूं येथें आलास तरी कसा !

**भीम०**—मित्रा हा चंपावती देवीच्या कडक पातिव्रत्याचा आणि या भीमदेवाच्या स्वर्गस्थ पुण्य पुरुषांचा प्रताप ! स्वर्गस्थांनीं लाविलेल्या अक्षय तेजोमय दीपकानें मला येथपर्यंत कशी बिनचूक वाट दाखविली ! ! आणि या किल्ल्याचा प्रचंड तट, चंपावतीनें बनविलेल्या विमानांत बसून मी कसा हां हां म्हणतां उडून आलों !

**जय०**—मित्रा भीमदेवा, ती साध्वी कुशल आहेना ? ती माझ्यावर रागवली नाहींना ? माझ्या दिलीपानें माझा ध्यास घेतला नाहींना ? पण मी हा कोणीकडे भकलों ! अरे क्षात्रतेजाला ही केवढी काळोखी ! माझ्या कुळटिळकांचा हा केवढा उपमर्द ! मित्रा, हें मायापिशाच तूं माझ्या अंतःकरणांत कसें घुसवलेंस! आतां हें मला कोठलें मुक्ति गाठूं द्यायला !

**भीम०**—अरे तूं चंपावतीला आणि दिलीपाला भेटल्या शिवाय तुला मुक्ति कोठली ? आणि या भीमदेवालाही कोठली मुक्ति मिळावयाला! सज्जनांना,साधुपुरुषांना, गोब्राम्हणांना आणि आर्यमातेला जे छळतात त्यांचे शिरच्छेद केले तर मोक्ष मिळतो! पण वीरांनीं आपल्या बायका मुलांना आपल्या मागें टाकल्यास त्यांना अक्षय नरकवासाशिवाय दुसरी योग्य जागाच नाहीं ! पतीच्या हातून मृत्यु आल्यास वीरपत्नि स्वर्गावर चढतात ! पण चांडाळांच्या हातून त्यांना मरण आलें तर त्यांच्या कपाळीं यमाच्या घरचे दुर्गंधी कूप !

**जय०**—अरे हें पक्कें माहीत असून हा मतिमंद असाच एकटा चालला होता ! पण मला येथून हालतां येणार कसें ?

**भीम०**—( साधुवेषाची वस्त्रें, घोरपड व दोर पुढें करून )

हीं वस्त्रें आंगावर घाल आणि ही घोरपड किल्ल्याच्या दक्षिण बाजूच्या तटाला चिकटावून खालीं उतर आणि खंदकातून पोहून जाऊन हो पसार !

**जय०**—आणि तूं ही माझ्या बरोबरच चलतोसना ?

**भीम०**—मी ही तुझ्या मागोमाग आलोंच. यावेळेस चंपावतीनें रणभूमीवर जाऊन टाहो फोडला आहे तव्हां तिचा अंत होण्यापूर्वीच तिला भेटून तिचें सांत्वन कर; आणि दिलीपाला कुरवाळून वाजव लढाईचें शिंग !

**जय०**—आणि तुला एकटाच टाकून जाऊन या निर्दय मृत्यूच्या तोंडी तुझा बळी देऊं ! मित्रा, या तुर्कांच्या छावणींत तुला सोडून गेल्यावर पुन: तुझें नख तरी माझ्या दृष्टीस पडणार आहे काय ! केवढा राक्षसीपणा तूं मला करावयास सांगतोस !

**भीम०**—परमेश्वर साह्यकारी असल्यामुळें जसा मी येथें आलों तसाच तेथून बाहेर पडून तुला लवकरच भेटेन ! चंपावतीनें जर तुला सोडलेंच नाहीं तर रजपूत स्त्रीहाची अखेर करावयाला कचरूं नकोस !

**जय०**—मित्रा सूर्योदयाबरोबर माझी गर्दन उडवा असा शहाचा हुकूम ! आणि माझ्या मागें तूं येथें राहिल्यावर बळाला बळी गेल्या शिवाय चुकणार आहे काय !

**भीम०**—असा जर प्रसंग आलाच तर माझी तयारीच आहे !

**जय०**—( कंठ भरून येऊन ) आणि तूं माझ्यासाठीं मरणार ! तूं आपल्या हातांनीं ही मानमुरगाळून टाकलीस—

**भीम०**—तुझी मान मुरगाळूं ! आणि पतिव्रतावध, वीरपुत्रवध आणि मित्रवध अशा तीन घोर हत्या मस्तकावर घेऊं ! मित्रा जयसिंहा असा हट्ट धरून मला या पातकांत पडूं देऊं नकोस हेंच तुझ्यापाशीं पदर पसरून मागणें आहे. तूं आतां अशा रीतीनें वेळ घालवीत बसलास तर मीं रचलेला व्यूह ढांसळलाच म्हणून समज ! तूं जर येथून जात नसशील तर ही मान ( कमरेची

तलवार काढून आपल्या मानेवर ठेऊन ) याच शस्त्रानें उतरलीच म्हणून समज !

**जय०**—( भीमदेवाचा हात वरच्यावर धरून ) मित्रा भीमदेवा, गहिंवर इतका दाटला आहे कीं तोंडातून शब्द निघत नाहींसा झाला रे ! अरे मित्रप्रेमाचा असा कळस !

**भीम०**—( गळ्यांस गच्च मिठी मारून ) मित्रा जा रे बाबा आतां लवकर. सुर्योदयाच्या आंत किल्ल्यांतून बाहेर पडून चंपावतीला भेटून लढाईचें शिंग फुंकीव,तोंपर्यंत मी आलोंच तुझ्या साह्याला. खंदकाच्या पलीकडच्या बाजूला रामसिंग घोडा धरून कंटाळला असेल ! मित्रा माझी पुढची हिंमत अशी करपू देऊं नकोस ! तुझ्या नेत्रांतील अश्रूंनीं मला कसे चटके बसत आहेत ! आणि हे हात पहा कसे अगदीं निर्जीव होऊं लागले ! तूं येथून एकदां पार निघून गेलास—

**जय०**—मित्रा माझा पाय येथून निघेना रे !

**भीम०**—अशा क्षणिक मोहाला गुंतून आपण उभयतांही आपल्या व्रतापासून ढळूं ! म्हणून म्हणतों—

**जय०**—पण तूं माझ्या मागोमाग येशीलना ? का—

**भीम०**—नुसता येतोच ! अरे येथें आल्याचें चीज करून येतों ! घाल ही वस्त्रें आंगावर, घे ही सदा विजयी तलवार, आणि घे हीं आयुधें आणि निघ येथून. तूं लढाईची लगट करतो आहेस नाहीं तोंच मी आलोंच. ( पिड्या काढतो. त्याच्या आंगावर वस्त्रें घालतो. जयसिंह वस्त्राखालीं घोरपड, दोर व तलवार झाकून घेतो ! )

**जय०**—( एकीकडे ) हे जगपालक परमेश्वरा माझ्या मित्राला नीट सांभाळ आणि त्याची माझी लवकरच भेट पाड ! ( उघड ) मित्रा, एकदां शेवटचें प्रेमालिंगन दे रे !( दोघें कडकडून भेटतात. जयसिंह भीमदेवाकडे वरचेवर पहात निघून जातो. )

**भीम०**—( जयसिंह गेला असें पाहून ) गेला ! अगदीं सुर-

क्षित निघून गेला ! आज चंपावतीसारख्या महापतिव्रतेला सौभाग्यदान, आणि जयसिंहासारख्या जीवाच्या मित्राला जीवदान देऊन, भीमदेवा, आपल्या जन्माचें सार्थक केलेंस ! या सत्कर्माच्यासाठीं मला या पाहोरकऱ्याला फसवावें लागलें, याबद्दल ईश्वर मला क्षमा करील ! मित्रा जयसिंहा, हीच आपली इहलोकची अखेरची भेट ! पुनः आपली भेट ( स्वर्गाकडे बोट करून ) तेथेंच ! सर्व सुखाचा चिरकाल उपभोग घेण्याचें तेंच स्थान ! अहमदशाहाला रसातळाला पोहोंचवूं तेव्हांच देहावसान करूं, ही घोर प्रतिज्ञा, प्रतिकूलदैवाशीं टकरा देतां देतां, जागच्या जागीं जिरून गेली याबद्दलचें अंतकाळीं होणारें दुःख, आणि शेवटीं मित्राबद्दल देहाचा अंत,यामुळें मनाला वाटणारा आनंद, हीं दोन्हीही एकाचक्षणीं अनुभविणाऱ्या या विचित्रपुरुषाला, हे शिवकिंकरांनो त्वरेनें उचलून घेऊन चला ! ! ईश्वरी संकल्प मनुष्याच्या हांतून टाळलें जाणें फारच कठीण ! तेव्हां प्राप्त झालेल्या स्थितीबद्दल खेद करीत बसणें, म्हणजे मूढांचाच मार्ग तुडविणें होय ! आम्हांस बाळपणींच जर हें जवामर्दीचें बाळकडूं पाजलें नसतें तर आम्ही निगरगट बनन--( इतक्यांत सर्वांगावर कृष्णवस्त्राचें घुंगट घालून हातांत खंजीर घेऊन कावरीबावरी दृष्टि करून चोरपावलें टाकीत पद्मावती प्रवेश करिते. )

**पद्मा०**—या मेल्या यवनबीजाची तरी असुरांपासूनच उत्पत्ति! गोमांस यथेच्छ भक्षण करून, जालीम मदिरचें आकंठ पान करून, निशेनें धुंद होऊन, मंचकावर मत्त निशाचराप्रमाणें शाहा आतां बेफाम उताणा पडला आहे ! मला म्हणतो, तुझ्याबरोबर शादी करावयाची ! जरा थांब. या तीव्र कट्यारीशीं आतां तुझें लग्न लावतें ! या पात्याला लावलेल्या जहरानें तुझ्या सर्व शरीराचा डोंब करून सोडितें ! माझ्या तोंडाकडे पापी नजरेनं न्याहाळून पाहतोस आं ! अगोदर डोळे फोडून टाकले पाहिजेत ! ( कट्यार वर उचलून ) एकच प्रहार, पण तो असा जोरानें केला पाहिजे, कीं छाती फोडून

... ग्रंथ संग्रहालय ... नं. ......

पाठीच्या हाडांचा पार चुराडा चुराडा उडाला पाहिजे ! आणि जिकडे तिकडे सर्व बिछान्याभर रक्ताचा सडा होऊन गेला पाहिजे ! माते चांडिके, शुंभ, निशुंभ, चंड, मुंड, रक्तबीज, धुम्रलोचन इत्यादि दैत्यांचे तूंच मर्दन केलेस ! भौमासुराला मारणारी, सत्यभामारुपी अष्टभुजा भवानी तूंच ! किंवा शतमुखी रावणाचीं शंभर तोंडें प्रखर खड्गानें धडापासून वेगळीं करणारी जानकी माता तूंच होतीस ! या वेळीं तूं माझ्या आंगांत संचार कर ! माझा चेहरा उग्र होऊन माझे डोळे खदिरांगारप्रमाणें लाल होऊं देत ! आतां हें काम हातीं घेतलें आहे खरें, मग यांत कांहीं होवो ! हे शस्त्रा तुझ्या आंगांत काय पाणी आहे तेंच मी आतां पाहतें ! मेल्या चांडाळा भोग आतां आपल्या पापांचीं फळें ! अभाग्या जयसिंहा, जर का हें काम करायाला तूं माघार घेतलीस, तर तुला तसाच पचत ठेऊन ही अस्सल रजपुताची बेटी आपल्याच हातानें तें राक्षसी काम करील ! अरे मेल्यांनो गाईला कोंडून छळलीत ! अरे अहमदशाहा हे पहा काळाचे दूत तुला फरफर ओढून नेण्याकरितां लगबगीनें उतरत आहेत ! अरे बाबानो इतकी धांदल कां ! अरे पण हें काय मी करीत बसलें ! रायमल, आलेंच मी ! मुहूर्त टळल्यावर मग काय ! ( पुढें होऊन ) जयसिंह, अहो जयसिंह !

**भीम०**—कां आपल्याकडे का हें काम आहे ?

**पद्मा०**—( चपापून) तूं कोण ? आणि जयसिंह कोठें आहे!

**भीम०**—जयसिंह पळाला.

**पद्मा०**—पळाला !

**भीम०**—( तिचा हात धरून ) पळाला. आणि तुम्ही त्याचा बोभाट करूं नका. तुमचा हात धरला त्याचा राग मानूं नका. प्रसंगच तसा आहे—बोभाट करण्याकरितां तुम्ही जाल म्हणून धरून ठेवतों.

**पद्मा०**—आणि मी येथून पाहारेकऱ्याला हांक मारली तर ?

**भीम०**—पाहारेकरी येथें येऊन तुमची त्याची बोलाचाली

होई पावेतों तितकाच वेळ जयसिहाला मिळेल. पाहिजे तर त्याला हांक मारा.

**पद्मा०**—( खंजीर उपसून व उगारून ) आणि मीं अशा रीतीनें सुटका करून घेतली तर ?

**भीम०**—खुशाल! खुपसा या छातींत! पण मीं धरलेला हात सोडणार नाहीं.

**पद्मा०**—सोड माझ्या हाताला. तूं मला ओळखलं नाहींस. मी शपथ वाहतें कीं, जयसिंह गेल्याचा मी मुळींच बोभाट करणार नाहीं. मग झालं कीं नाहीं ?

**भीम०**—उदारमनाची स्त्री आहेस! धन्य तुझी! तुझ्या भाषणावर विश्वास धरतों. ( हात सोडतो. व एकीकडे म्हणतो ) इचे डोळे अगदीं फिरून गेले आहेत !

**पद्मा०**—पहारेकऱ्याला मीं दूर जायला हुकूम केला आहे. तुम्ही अगदीं भिऊं नका. मोकळ्या मनानें आणि खरेपणानें माझ्याशीं बोला. तुमचें नांव काय ?

**भीम०**—माझें नांव भीमदेव.

**पद्मा०**—( दचकून मागें सरून ) ईडरचा राणा भीमदेव म्हणतात ते आपणच का? कीं ज्याच्याकडे महाराज सांमतसिंह यांनीं बक्षिगिरी सोंपविली आहे! आणि ज्यांनीं काल महाराज सांमतसिंह यांना मुसलमानांच्या हातून सोडविलं!

**भीम०**—काल मीं रजपुतांचा सेनापति होतों. पण आज मी मुसलमानांचा कैदी आहे !

**पद्मा०**—जयसिंहाची तुमची इतकी दोस्ती आहे, कीं त्याच्या बदली तुम्ही मरायला तयार झालांत ?

**भीम०**—हां, तो माझा मित्र आहे, आणि त्याच्या करितां मी जीव देण्याला तयार आहे !

**पद्मा०**—माझी सुद्धां इच्छा तुमच्या मित्राचे प्राण वाचवावयाचीच होती; आणि त्याचे प्राण वांचविले असले तर ?

भीम०—तुम्ही आपल्या उदारपणाचा डंका साऱ्या त्रिभुवनांत गाजवला असतात !

पद्मा०—आणि या प्रसंगीं जर मीं आपलेही प्राण या निर्दय बादशाहाचे हातून वांचविले, आणि आपल्याला महाराज सामतसिंह यांचेकडे पाठवून देऊन सर्व रजपुतांना संतोष दिला, तर तुम्ही मला महाराजांकडे घेऊन जाल ?

भीम०—मीं उगाच हुरळणारा मनुष्य नाहीं. असें होण्याला आपल्यापाशीं साधन काय आहे, तें मला अगोदर समजलं पाहिजे. मग मी आपल्या बोलण्यावर विश्वास ठेवीन.

पद्मा०—( खंजीर पुढें करून ) धरा हा खंजीर हातांत—

भीम०—( खंजीर घेऊन) याचा कोठें उपयोग करावयाचा ?

पद्मा०—ज्या तंबूत या वेळीं बादशाहा निजला आहे तेथें मी तुम्हाला घेऊन जातें–आणि मग–सर्व रजपुतांचा आजपावेतों ज्यानें छल केला,–ज्यानें आमचीं देवस्थानें भ्रष्ट केलीं आणि ज्यानें मला इथें कैद करून ठेविलं आहे, त्याचा एका घावा सरसा मोक्ष करा.

भीम०—( एकदम मागें सरून साशंक. ) आणि तुम्ही का राजकन्या पद्मावती का ?

पद्मा०—होय तीच मी हतभागी !

भीम०—अ णि तुम्ही काय म्हणतां, कीं मी झोपेंत त्याचा खून करूं ?

पद्मा०—मग काय हरकत आहे–त्यानें तरी जयसिंहाला हातापायांत बिड्या असतांनाच मारलं असतं कीं नाहीं ? मनुष्याचे हात पाय बांधून त्याला ठार मारलं काय, आणि झोपेंत मारलं काय एकच !

भीम०—कांहींही असो. पण झोपेंत मारणें हा परमेश्वराच्या घरीं न्याय नाहीं. खोटीं कर्मे करून मग पुण्यकर्मे केल्यास त्यांत पुण्य नाहीं! लोकांचीं घरें मोडून देवालयें बांधण्यांत पुण्य नाहीं ! माझ्या हातून हें काम होणार नाहीं.

पद्मा०--मग कशाचा तुम्हाला रजपूत जातीचा अभिमान! आणा तो पेषकब्ज. या हातांनींच आतां तें कर्म करतें. ( जंबिया घेण्याकरितां हात पुढें करते. )

भीम०—शाबास तुमची! मी उगाच बोललों. तुमचा निश्चय कायम आहे कीं नाहीं याची परीक्षा पाहिली.

पद्मा०—या आतां माझ्या मागून-पण आतां पहिल्यानें तुम्हाला इथल्या पाहारेकऱ्याला ठार मारलं पाहिजे.

भीम०—कोण? तो आतां पाहरा करीत आहे तो कीं काय?

पद्मा०—होय त्यालाच. नाहीं तर तुम्हाला पाहिल्याबरोबर तो एकदम बोभाट करील.

भीम०—आणि आतां त्या म्हाताऱ्याच्या उरांत भोंसकून त्याला ठार मारूं म्हणतां? घ्या आपली कट्यार परत.

पद्मा०—भीमदेव!

भीम०—तो शिपाईच काय तो बादशाहाच्या पदरीं एक लाख मनुष्य आहे! बाकीच्याना फक्त शेंपूट आणि लांब कान कमी आहेत! त्यानें माझ्या विनवणीला ऐकलें नाहीं. सोनें, मोतीं वगैरे पुढें केलें तरी त्यानें जुमानलें नाहीं. शेवटीं त्याचें त्याला काय वाटलें तें त्यानें मला आंत सोडलें, आणि म्हणूनच माझ्या मित्राची सुटका झाली. आज जरी सर्व रजपूत घराण्यांचा नाश झाला! जरी यवनांचा सर्वत्र अंमल झाला तरी सुद्धां हरकत नाहीं! पण मी म्हणून त्याच्या केंसालासुद्धां धका लावणार नाहीं.

पद्मा०—तर मग त्याला आपल्याच गटांत घेतला पाहिजे. बरं त्याविषयीं तुम्ही काळजी करूं नका.

भीम०—तें तुम्ही हवें तें करा. मी त्या मनुष्याला कोणत्याही प्रकारें दुखविणार नाहीं. ( दोघे जातात पडदा पडतो. )

## प्रवेश दुसरा.

### स्थळ—अहमदशाहाचा डेरा—मंचकावर अहमदशाहा झोपीं गेलेला आहे.

**बाद**—( झोपेंत बरळतो ) दुष्मनको बहोत सताकर-अब् अच्छा है--गर्दन काटडालो—अच्छा हुवा.

( भीमदेव व पद्मावती चोरून प्रवेश करितात ).

**पद्मा०**—तो पहा तो निजला आहे-आतां एक क्षण सुद्धां घालवूं नका. घ्या देवाचें नांव.

**भीम०**—तुम्ही आतां येथून चालत्या व्हा. कारण जिकडे तिकडे रक्तमय झालेलें तुम्हाला पाहवणार नाहीं.

**पद्मा०**—पण जर का तुम्ही क्षणभर विचार करीत उभे राहिलांत तर सगळंच फसेल.

**भीम०**—जा, तुम्ही आपल्या डेऱ्यांत जाऊन स्वस्थ निजा जा. तुम्ही इकडे येऊं नका. मीच तुमच्याकडे येईन. या कामांत तुमचें आंग आहे असें कोणालाही कळूं नये, यांतच भलेपणा आहे.

**पद्मा०**—( जातां जातां ) इथल्याही पाहारेकऱ्याला मी बरोबर घेऊन जातें. (निघून जाते. )

**भीम०**—या अंगांतील नसा यावेळीं आवेशानें कशा ताड ताड उडत आहेत, मस्तक कसें भणाणून गेलें, केश ताठ उभे राहिले, नेत्रांना ताटा चढला, त्यांतून क्रोधाग्नीच्या ज्वालांचा भडका बाहेर पडूं लागून रक्ताचे बिंदू टपटप गळूं लागले. क्षणांत वाटतें याचा एका धडकीसरसा जीव घेऊन टाकावा, किंवा एका लत्ताप्रहारानें याचें मस्तक शतचूर्ण करून टाकावें ! क्षणांत वाटतें या कट्यारीनें याचा कंठनाळ बकऱ्याप्रमाणें चरचर कापून काढून याचें हें मुंडकें या घोरीपावटीच्या किल्ल्याच्या तटावर

भाल्याच्या टोंकाला अडकवून द्यावें, आणि धड खालीं खंदकांत भिरकाऊन द्यावें; किंवा क्षणांत वाटतें हा पेशकब्ज याच्या छातींत खुपसून एकदमच या अधमाला नरकपुरींत पाठवावा! पण हा खून--खून! हा सूड नव्हे. असें करून माझा आत्मा संतुष्ट होणार नाहीं. याच्या आजानें माझ्या बाबांचा छळून छळून प्राण घेतला आणि मी याला मरणकालच्या घोर यातना न देतां असाच वार करूं? छे! या मंचकावरून ओढून, याला उलथा पालथा पाडून, याच्या छातीवर पाय देऊन, याचे डोळे या कटयारीच्या टोंकानें फोडतों; याचे हात पाय तोडून, अंगावरील प्रत्येक केसागणिक जखमा करतों. आणि मग प्राण घेतों! हं, हाच विचार. हाच निश्चय. असच ( त्याला खालीं ओढतो ) तडफड; तडफड. एकदमच तुझ्या नरडीचा घोट घेतला असता! आणि भीमानें जसें दुःशासनाचें रक्त प्राशन केलें तसें तुझें नरडें काडकन फोडून या भीमानेंही तसेंच केलें असतें! पण तूं जातीचा यवन पडलास!! जरासंधाला जसा भीमानें फाडून टाकला तसा मी भीम आतां तुझ्या उभ्या चिरफळ्या करून टाकतों! माझी वृद्ध माता जर सती गेली नसती तर चांडाळा तुझ्या रक्तानें माखलेले हे हात आणि शस्त्र तिला दाखवून तिच्या ऋणांतून मुक्त झालों असतों! घे देवाचें नांव.स्मर आपलीं अनन्वीत कृत्यें. सूड! सूड! नारसिंहाप्रमाणें भयंकर गर्जना करून,प्रचंड हांक फोडून,या तीव्र नखांच्या अग्रांनीं तुझें उदर विदारण करून मी तुझीं आंतडीं गळ्यांत घालतों!! ( पडदा पडतो व पुनः बादशाहा एका बाजूला गुडघे टेकून बसला आहे व भीमदेव आवेशानें त्याचेकडे पाहत आहे असा पडदा उघडतो. )

बाद०— ( गुडघे टेकून ) ये अहमदशहा अब् बहोत लाचार है! मेरा जी तेरे तावेमे है! कुसूर माफ कीजीये. इसवख्त् मेरी जान बचाव; ये अल्ला!

भीम०—जा तुला जिवंत सोडतों. मग तूं आपल्या इमानाला जाग किंवा बेइमान हो.

बाद०—मेरे उपर तेरा बहोत ऐहसान हुवा है. मै अब् बेइमानी कभी नही करूंगा.वल्ला, मै तेरे साथ कभी बेइमानी नहीं करूंगा. क्यं के मैं तेरा ऐहसान मंद हूं. ( हाटत हाटत लांब जातो. )

( पद्मावती प्रवेश करिते. )

पद्मा०—झालंका काम? मेला का तो ? ( एकदम बादशाहा दृष्टीस पडतो ) अजून जीवंतच आहे ! आतां मात्र मी प्राणाला मुकलें ! आणि अरे हतभाग्या भीमदेवा तूं तरी आतां कसचा जगतोस ! हा दगेखोरा ! का भित्र्या ! काय म्हणूं तरी काय ! हें तूं काय केलंस? सापाच्या शेंपटीवर रे पाय दिलास !

बाद०—( आश्चर्यानें व क्रोधानें ) ऐसा कैसा होगा !

भीम०—( घोंटाळल्यासारखा होतो. क्षणांत संताप, क्षणांत दुःख, क्षणांत जीवावर उदार झाला आहे; क्षणांत मनाला विवेकानें दाबीत आहे असा आविर्भाव दाखवितो; व पद्मावतीला नेत्रसंकेतानें " जा " ह्मणून सुचवितो. )

पद्मा०—भीमदेवा, आतां मी कराची परत जातें ! आणि तमच्या हातांत बादशाहाला ठार मारण्याकरितां कट्यार कोणी दिली, हेंही पण मी नाकबूल करणार नाहीं ! मी व्यर्थ तुमच्या बोलण्यावर भरंवसा ठेविला ! मी स्वतः काम केलं असतं तर फार बरं झालं असतं. आतां तुम्हांला दया म्हणजे काय पदार्थ आहे तें लौकरच समजेल !

बाद०—पहेरेपर कौन है ? इस् दिवानी औरतकू फौरन कैद करो.

पद्मा०—तें तर आहेच; आणि मलाही पण ठाऊक आहे कीं, मला आतां लवकरच स्वर्गाला जाण्याची तयारी केली पाहिजे ! पण तूं असें समजूं नकोस, कीं मी तुला भितें म्हणून ! आणि मी तुझा खून तरी काय म्हणून करावयाचा बेत केला,

ह्याचें कारणही वेगळंच आहे. ( आवेगानें ) तें कारण मनात आलं म्हणजे माझ्या जीवाची किंमत मला कांहींच वाटत नाहीं! तें कारण हें कीं लक्षावधि लोकांचे प्राण वांचावेत! जितक्यांना म्हणून तूं आतां कैद केलं आहेस असे हजारों रजपूत उद्या मृत्यूच्या तोंडींच जाऊन पडणार कीं नाहीं ! त्यापेक्षां तुला एकट्यालाच ठार मारलं तर आज माझे हजारों जातिबांधव वांचतात असा विचार करून मी तुझा घात करणार होतें ! पण आतां काय ! तुझ्या तोंडा आम्हां रजपुतांचें रक्त लागलें आहे तेव्हां तुला त्यांची कींव कोठून येणार ! ( शिपाई धरण्यास पुढें होतात असें पाहून, त्यांच्याकडे रागानें पाहून ) हां ! खबरदार माझ्या आंगाला हात लावाल तर, मी मुकाट्यानें तुमच्या बरोबर येण्यार कबूल आहे ( भीमदेवाकडे पाहून ) बरं, झालं तें बरंच त्याचा खरा रजपूत असंच करील, दुष्मन जरी झाला तरी समज ! झोंपेंत प्राण कधींही घेणार नाहीं ! शेवटीं एव[illegible]गोळी करून या सर्वांचा विश्वास धरूं नका ! केव्हां दे[illegible]जकन्येच्या दीन नेम नाहीं ! [illegible]टाळा श्रमिष्ट झा[illegible] तोंडांत जळजळीत मात्र पराधीनतेच्या

बाद०--( शिपायांस ) अबीतक मेरा ह[illegible] इस्कू मत छोडो. ले जाव. [illegible] रायमल येतो.

भीम०--( आंगाचा दाह झाल्यासारखें दाखवितो. बादशाहा त्याच्या तोंडाकडे पाहून भितो. )

पद्मा०—येथें सत्तेच्या जोरानं तूं निरापराधी स्त्रीचा छळ मांडला आहेस, पण तुला परमेश्वर शिक्षा करील ! तुझ्या या धुंद झालेल्या डोळ्यांत तापलेल्या लोखंडाचा रस यमाचे दूत ओततील ! तुझ्या सर्व शरीरास सुया टोंचतील ! तुला विस्तवावर चालवतील ! तुझ्या आंगाचें कांतडं सोलून काढतील ! असे नानाप्रकारचे हाल तुला परलोकीं होतील !—झालं. इतके दिवस कांहीं तरी सुटून जाण्याची आशा होती, पण ती आतां नष्ट झाली! अखेर बाबांची आणि आईची भेट झाली नाहीं ! चांडाळानं

धरून आणलेंन त्या वेळीं माझ्या आईनें गाईप्रमाणें हंबरडा फोडला असेल ! रात्रंदिवस तिच्या डोळ्याचं पाणी खळत नसेल ! पण काय उपयोग ! जातें भीमदेव. माझी काय अवस्था झाली हें माझ्या बाबांना किंवा आईला कळवूं नका. तुम्हाला जें योग्य वाटेल तें सांगा !( भीमदेवाकडे वरचेवर पहात दीन मुद्रेनें शिपायांबरोबर निघून जाते. )

**बाद॰**—जयसिंहभी इस् सैतान शेहजादीके सरीका है ! ओ तो अब् मेरे ह्यां कैदखानेमें है.

**भीम॰**—जयसिंह पळाला.

**बाद॰**—ऐसा कैसा होगा ?

**भीम॰**—त्याची सुटका करण्याकरितांच मी आलों होतों. मी त्याची सुटका केली. आतां मीच तुमचा कैदी आहें.

**बाद॰**—क्या, फिर जयसिंह भागा ? उस्कू अभी मारनेका दुःख, क्षणा थां.

कानें दाबीत अ आतां विसरा ! त्याचा निकाल लागला !
नेत्रसंकेतानें " ज

**पद्मा॰**—भीम रों गनीमोसे लडता हूं, मगर मेरा मिजाज
तमच्या हातांत बादः

दिली. हेंही पण तूं शूर कसचा ! स्वतःला जिंकणें-म्हणजे स्वतःचे मनोविकार समूळ आवरून धरणें-याचेंच नांव खरें शत्व! लढाईत तुम्हाला जय येवो किंवा अपजय येवो, पण या मानसिक लढाईत जो पडला तो खरा वीरच नाहीं असें मी समजतो ! !

**बाद॰**—भीमदेव, तू बडा जवामर्द और दिलावर है ! तुमारे बालकूभी ह्यांपर आच नहीं है ! अगरचे ताइमुद्दत आप मेरे दुष्मन् थे, लेकिन फिल् हाल आप् मेरे शफियक् अजीज़ हो ! इरादा ये है के, आपकू दरबारमें लेजावूं और बडी जियाफत करूं. चलो. ( पडदा पडतो. )

## प्रवेश ३ रा.

स्थळ—चोरीपावटीचा किल्ला. भीमदेव बादशाहाचे डेऱ्यामधून बाहेर पडतो.

भीम०—संभाळ भीमदेवा, तुझा कट्टा वैरी तुझ्या जबड्यांत सांपडला असतां प्रसंगाकडे लक्ष देऊन त्याला जसें जीवदान दिलेंस, तसेंच पद्मावतीच्या दीन स्थितीकडे पाहून दुःखानें कढणारें हें तुझें हृदय आवरून धर! जर का तूं तुझ्या भोंवतीं जमलेल्या या अविचाररूप वावटळीच्या तडाक्यांत सांपडलास, तर छत्रपति सामंतसिंह यांचें बीज आपल्या घरांत घुसविण्याचा अहमदशाहानें केलेला संकल्प शेवटाला गेलाच म्हणून समज! आणि तूं आपल्या अक्कलेची आणि शौर्याची राखरांगोळी करून बसलीस म्हणून समज! संभाळ, जर कां राजकन्येच्या दीन मुद्रेकडे पाहून मायेनें विरघळलास, आणि घोंटाळून भ्रमिष्ट झालास तर या तुर्कांचीं पाळेंमुळें खणून त्यांच्या तोंडांत जळजळीत राखेचे तोबरे देण्याचें एकीकडे राहून, तूं मात्र पराधीनतेच्या भयंकर डोहांत लोटला जाशील! ( इतक्यांत रायमल येतो. भीमदेवाची दृष्टि त्याच्याकडे जाते. रायमल भीमदेवास खुणेनें "पद्मावती बोलावीत आहे, माझ्या मागून चलावें" असें सुचवितो. भीमदेव रायमलामागून निघून जातो. पद्मावती बसली आहे असा पडदा उघडतो. भीमदेव व रायमल प्रवेश करतात. भीमदेव आला असें पाहून पद्मावती उठून उभी राहते. )

भीम०—बादशाहाजवळून असें वचन घेतलें आहे कीं त्यानें तुला बिलकुल छळूं नये, आणि धरून आणलेले रजपूत जीवंत ठेवावेत!

पद्मा०—तें सर्व मला रायमलाकडून कळलें; पण या हतभागीला या राक्षसांच्या घरीं अशीच दीनासारखी सोडून गेलां-

त तर भीमदेव माझ्या किती हालअपेष्टा होतील याचा कांहीं विचार केलांत कां? हे मेले राक्षस मला छळून छळून हो मारतील! भीमदेव नकाहो मला अशी या खाटकांच्या घरीं लोटून जाऊं! माझी कांहीं दया येऊं द्या!

भीम०—तुझ्या या एक एक मर्मभेदक भाषणानें माझ्या काळजाला सारखा पीळ पडतो आहे!

पद्मा०—परमेश्वरानेंच माझ्याकडे पाठ केली, मग आपण तरी कां नाहीं करणार! या कपाळीं ब्रह्मदेवानें जें एकदां लिहून ठेविलें आहे, तें तुमच्यासारख्या वीरांनीं का टळलें जाणार आहे!!! अखेर मी आपली कपाळकरंटी ती कपाळकरंटी! भीमदेव तुम्ही लढाईत राक्षसासारखे! पण या दुर्दैवापुढें तुमचं कुठलं चालायला! भीमदेव, तुम्ही येथून गेल्यावर हे दैत्य माझे नाहीं नाहीं ते हाल करतील! आणि शेवटीं मला यमाच्या घरीं पोंचवितील हो!

भीम०—या वेळेस जर मी बेताल होऊन कांहीं अविचार केला, तर आपल्याला कधींच यश येणार नाहीं! आणखी चार प्रहर मनाला धीर देऊन राहा! (रायमलाकडे वळून) रायमल, तुला सांगितल्याप्रमाणें मी येथून गेल्याबरोबर लढाई तर देतोंच, पण तूं मात्र संधि पाहून हिला पुरुषाचा वेष देऊन आमच्या गोटांत आणून सोडण्याला विलंब करूं नकोस. (पद्मावतीकडे वळून) पद्मावती, हा रायमल मोठा धूर्त आहे, आणि आजपर्यंत यानें जी राजनिष्ठा दाखविली तिची पूर्तता केल्याशिवाय तो राहणार नाहीं! तूं अशी कष्टी होऊं नकोस!

पद्मा०—भीमदेव मी कशाची हो पुन्हां तुमच्या दृष्टीस पडतें! भीमदेव, तुम्ही बाबांना भेटल्यावर त्यांना काय सांगाल? माझ्या आईनें "पद्मावति कुठें आहे" म्हणून पुसलं तर काय हो उत्तर द्याल? या हरिणीला अशीच वाघाच्या गुहेंत लोटून आलांत असं का म्हणाल! का "पद्मावती तुम्हांला पुन्हां कोठची भेटायाला?" असं कां सांगाल! कां तिनें हालांतच आ-

घला अंत करून घेतला, असं बोलाल ! काय म्हणाल तरी काय ? भीमदेव तुमचें मन इतकं घट्ट कसं हो झालं !

**भीम०**—याहून घट्ट बनेल तरच शेवटीं आनंदाचे आणि सुखाचे दिवस दृष्टीस पडतील ! पण जर का मी या मोहजालांत लडबडलों, तर स्त्रीजातीचीच बरोबरी आम्ही केली ! आतां हा हट्ट सोड, आणि असे वेडेवांकडे शब्द तोंडांतून नको काढूंस!

**पद्मा०**—भीमदेव, असं करणं आपल्या उदारपणाला शोभतंना ! आणि हें आपल्या मोठेपणाला कमीपणा नाहीं कांहों आणीत ! रजपूत स्त्रीची विटंबना होणार, हें मनांत आल्याबरोबर तुम्हांला स्वस्थ बसवतं ना हो! आपल्या हातून माझी मुक्तता होईल अशी जी मी हृदयाशीं घट्ट धरलेली आशा ती निष्फल झाली ना ? मी अस्सल रजपुताची बेटी नाहीं, असं आपल्याला वाटून कां आपल्या अंगातलं कडवं रक्त उसळत नाहीं !

**भीम०**—( मनाशीं ) हा केवढा बिकट प्रसंग !

**पद्मा०**—भीमदेव आतां किनई माझं तोंड कोरडं पडलं बरं कां ! आपल्या पायावर डोकं ठेवतें, आपल्यापुढं पदर पसरतें, मला येवढी भिक्षा घाला;आणि मधाशीं मीं आणून दिलेल्या कृपाणीनें एकदां ही मान उतरा आणि मग चला ! ( त्याच्या पायांवर डोकें ठेवते. तो तिला हातांला धरून उठवितो. )

**भीम०**—( कंठ भरून येऊन ) तूं मोठी शहाणी असून अशा वेडांत काय शिरतेस! हें माझें कठोर अंतःकरण जर तूं आतांच दुभंग केलेंस तर माझ्या हातून पुढें काय होणार ? सर्वसाक्षी परमेश्वराला साक्ष ठेऊन मी तुला असें वचन देतों, की तुला येथून मुक्त केल्याशिवाय हा देह विश्रांतिकरतां जमीनीवर कधींही टाकणार नाहीं ! आणि समरभूमीपासून परतणार नाहीं ! आणि तुझी मुक्तता करीन तरच अस्सल रजपूत बीजाचा होईन!

**पद्मा०**—परमेश्वराला साक्षी ठेवलं आहे बरं ! पण असं जर करायचं झालं नाहीं तर ही पद्मा पुन्हां कांहीं आपल्या दृष्टीस पडणार नाहीं ! आणि मग आजपर्यंत तुम्ही स्वामिसेवेचा,मित्र-

प्रेमाचा, बंधुप्रेमाचा, जो कांहीं कळस केलात, त्याला कालिमा लागेल ! भोजराजांनीं मला जातांना दुसरा एक खंजीर देऊन ठेविला आहे आणि सांगितलं आहे कीं ' तसाच कांहीं प्रसंग आला तर घे उरांत खुपसून आणि सुट जाचांतून !'

**भीम०**—ह्या कठोर हृदयाला मायेचे पाझर फुटूं लागले; आतां येथें उभें राहणें नको ! येतों मी आतां.

**पद्मा०**–शेवटीं येवढेंच सांगायचं आहे कीं या शरीराला परपुरुषाचा हात लागला नाहीं, तो तुम्हीं मघाशीं माझा हात गच्च धरलांत ! मी आपल्याला मनानं वरलं आहे ! आतां हें सौभाग्य कायम राखणं आपणाकडे आहे! ( ती त्याला आलिंगन देण्याकरितां पुढें होते. रायमल मध्यें होतो. भीमदेव तिच्याकडे सजल नेत्रांनीं पहात आहे असा पडदा पडतो. )

**पांचवा अंक समाप्त.**

# अंक सहावा.

## प्रवेश पहिला.

स्थळ—जंगल. चंपावतीनें आपल्या मुलाला झाडाच्या पानावर निजविलें आहे, आणि वेड्यासारखी त्याच्याकडे वरचेवर पहात आहे, असा पडदा उघडतो.

चंपा२—( भ्रमिष्ठ झालेली ) देवा आतां नको रे माझा अंत पाहूं ! सगळं रणमैदान तुडवून तुडवून हे पाय अगदीं गळून गेले ! या मेल्या घारी सगळीं प्रेतं टोंचून टोंचून कशीं विद्रुप करून टाकीत आहेत!(वर पाहून)मेल्यांनो,तुम्ही तर नाहींना त्याना उचलून नेलंत ! आंगरख्यासारखा आंगरखा दिसला, किंवा पटक्यासारखा पटका दिसला,म्हणजे उगाच आपलं सगळे कडे धुंडीत बसावं!पण पुन्हां कांहीं नाहीं! बाळा तूं या झाडाच्या पाल्यावर निजलासना! तुला आतां गाढ झोंप लागली!अशीच तिकडे लागली असेल नाहीं बरं ? दिलीपा, तूं उठून इकडे तिकडे रांगत जाशील आणि हांसत हांसत माझ्याकडे पाहशील, पण ते कुठले आतां त्या काळझोपेंतून जागे व्हायला ! त्यांनीं अखेरचीच रे झोंप घेतली आतां ! त्याना धुळींत आणि रक्ताच्या चिखलांत झोंप आली ! शेवटीं मातीला माती मिळाली ! सगळी माया एकदम झुगारून दिली ! आणि मागलं सगलं विस्मरण पडलं ! देवाब्राम्हणासमक्ष आणा वाहिल्यात त्या कुणीकडे गेल्या आतां ! मला बोलावताना बरोबर ! मग अजून कोणी आणाला पाठ-

बळं नाहीं। तें! म्हटलं मला हांक मारावयाची झाली, आणि तो खोल शब्द माझ्या कानीं पडला तर धांवत धांवत शेजारीं येऊन आपलं तें गारठलेलं तोंड मांडीवर घेईन, आणि या कुडींतला प्राण निघून जाईपर्यंत मोठ्यानें आक्रोश करीन! तर मेला हा धों धों वाहणारा वारा कांहींच कानीं पडं देत नाहीं! तूं देखील बाबा वेळ साधलोसना. पतिव्रतांनीं आपले मेलेले नवरे जीवंत केले अशा पुराणांत पुष्कळ गोष्टी लिहिल्या आहेत! असं जर आहे तर देवा,मलाच का बरं आतां पावत नाहींस! हो खरंच मी वेडीच हो वेडीच! अग त्यांची योग्यता तुला कुठली यायला! मी पापीण-मी राक्षशीण,-पण हें नांव नाहीं मला शोभायचं! मला कांहीं निराळंच नांव पाहिजे! तें नांव-आणि तें नांव आतां काय ठेवावं!—अखेर काय, अखेर मी आपली येथेंच! आणि ते मात्र स्वर्गांत! स्वर्गांत तर बायकांना फसविणारे नवरे नाहींतना? जर असले तर नकोहो तेथें जाऊं! उतरा कसे तुम्ही खालीं;लवकर उतरा! म्हणजे आपण दुसरीकडे जाऊं कशी!-अगबाई पण याला थंडी वाजते आहे! मी आपला हा शेला पांघरायला घालते बरंकां! मी तुझ्यावर पांघरूण घातलं, पण बाळा आतां माझ्यावर रे कोण पांघरूण घालील! ते गेले बरं मला एकटीला सोडून! ज्यांची आशा राहते ते पिशाच योनींत जन्म घेतात म्हणून म्हणतात! म्हणून म्हणतें, आपली नकाहो मागे आशा ठेवूं! नाहीं तर तुमची माझी चुकामुक पडेल! (पडद्यांतून कांहीं शब्द ऐकलेसें करून) अगबाई, हीं मेलीं स्मशानांतलीं भुतं देखील लागलीं बरं आतां माझ्या पाठीस! अरे मेल्यांनो मी रजपुताची बेटी, राणा जयसिंहाची राणी, मी कां तुम्हाला भिणार! पण या मेल्यांनीं जर कां एकच कोल्हेकुई केली तर माझ्या बाळाची झोंप मोडेल, आणि माझा जीव घोंटाळेल! (पडद्यांतून कांहीं शब्द ऐकलेसें करून) मेल्यांनीं अगदीं त्यांच्याचसारखा शब्द काढला आहे! (कट्यार बाहेर काढून) हें पाहिलंत कां माझ्या हातांत काय आहे तें!

आतां जर कां माझं नांव घेतलंत तर मग पहा! पण मी हें काय मनांत आगलं! अशानं मेल्यांना मुक्ति मिळेल! आणि मेल्यांच्या कपाळचं हें प्रेतं फाडणं चुकेल! (पडद्यांतून कांहीं शब्द ऐकलेसेंकरून) काय, तुम्ही माझे पति! आणि मग ते कुठं आहेत! ते तर मला सोडून केव्हांच गेले! आणि म्हणनच हो ही मी अशी प्रेतं तुडवीत रानोमाळ ओरडत फिरत आहे! आतां किनई मी अगदीं निराश्रित आहे! का तुम्ही मला अशी छळता? नका हो नका अशी माझी हाल अपेष्टा करूं! (पडद्यांतून कांहीं शब्द ऐकलेसें करून). मेला जीव अगोदरच कावला आहे! त्यांत तुम्ही अशीं आशेला कां बरं लावतां! ही मेली आशा अजून सोडिना हो! (पडद्यांतन कांहीं शब्द ऐकलेसें करून) काय तुम्ही मुसलमानांच्या घरून सुटून आलांत! तर मग मेल्यांनीं मला इतका वेळ खोटंच कांहो सांगितलं! आणि इतका वेळ मला विनाकारण कांहो छळली! हा सगळा मेला भुतांचा बाजार आहे! आलेंच मी चरका! ही पहा उपसलीच! (पडद्यांत धांवत निघून जाते.)

(दोन मुसलमान शिपाई—फैजुद्दवला आणि नसीरखान—प्रवेश करितात.)

**फैजुद्दवला**—क्या साले भागते है, जैसे शेरके पिच्छे कुत्ते!

**नसीरखान**—तो क्या तुम शेर होके कुत्तेकू डरते?

**फैजुद्दवला**—इदरसे, इदरसे आव मेरे पिच्छेसे. रजपूत लोगोंकी ये फौज च्छिपानीकी जाय है भला क्या! अब ये जाकर शहाकू कहदेंगे! (मुलास पाहून) अल्ला! मगर ए क्या! ए बच्चा किसका?

**नसीरखान**—क्या अच्छा छोकरा है! मगर इसकी मा किदर गई—अब इसकू घरकू ले जाना आच्छा है!

**फैजुद्दवला**—आच्छा, वैसा करना मुनासिब है. मेरे घरमें एक छोटा छोकरा है, उसको ए आच्छा दोस्त है. चलो ले जायेंगे. (मुलाला घेऊन जातात.)

**चंपा०**—(प्रवेश करुन)अग वेडे, हीं भुतं म्हणजे वारं आहे दुसरं काय? आणि तूं वाऱ्यावर ती काय शस्त्र घेऊन धावलीस ! देवा पुरे पुरे हे या जीवाचे धिंडवडे! (कट्यार फेंकून देत.) मला हांक मारली हें खोटं कां ! आणि अगदीं त्यांच्या सारखाच नाहींका मीं शब्द ऐकला ! आले हो आले !( पडद्यांत निघून जाते )

**जय०**—(प्रवेश करून) आतां तिला पहावी तरी कोणीकडे ! परमेश्वरा तिनें आपल्या जीवाचा अंत तर नाहींना करून घेतला ! मित्रा भीमदेवा, एवढ्याच करतां कां-(इतक्यांत "कुठे हो आहांत!" असे शब्द पडद्यांतून ऐकूं येतात ) कोणाचा बरें हा शब्द ! हा माझ्या लाडकीचाच,-खचित, तिचाच ! लाडके. अग लाडके. ( पडद्यांत निघून जातो. नंतर एका बाजूनें जयसिंह व एका बाजूनें चंपावती अशी धांवत येतात. )

**जय०**—( चंपावतीस मिठी मारून )परमेश्वरा! आतां पुन्हा प्रेमाचा भंग करूं नकोस !

**चंपा०**—कोण आपणच काहो ! आणि इतकावेळ कांहो मला छळलंत ! पण मी कुणाला मिठी मारली ! ते गेलेहो गेले ! आणि मेल्या तूं रे कोण !

**जय०**—लाडेक तूं भ्रमानें इतकी वेडी झालीस, कीं तूं मला ओळखलं सुद्धां नाहींस !

**चंपा०**—( वर पाहून ओळखून ) तेचहो तेच ! ( घट्ट मिठी मारून ) आतां नाहीं बरं मला असं टाकून जायचं ! केवढा हो कठोरपणा तुम्हीं दाखविलात ! माझं प्रेम कसोटीला लावून पहावयाचं, तर अशा का डागण्या द्यायच्या ! पण कुठं जायचं झालं होतं इतकावेळ !

**जय०**—लढाईंत मला मुसलमानांनीं कैद करून नेलें होतें, पण माझ्या भीमदेवानें मला सोडवलें ! आणि मी तुझा तपास करीत येथें आलों. मी तुला किती हाका मारल्या पण तूं कांहीं कोठं ओ देईनास ! मी निराश होऊन पुन्हां भीमदेवाकडे जाणा-

र तोंच हा माझा प्राण ( तिच्या तोंडास हात लावून ) माझ्या दृष्टीस पडला !

**चंपा॰**—काय म्हटलंत ? तुम्हीं कैदेंतून सुटून आलांत ! आणि तुम्हाला भीमदेवानीं सोडवलं !

**जय॰**—तूं भ्रमिष्ट होऊन या ठिकाणीं आली आहेस इतकेंच त्यानें मला सांगितलें; आणि म्हणाला " तूं पुढें हो आणि चंपावतीला भेटून वाजव लढाईचें शिंग, तों मीं आलोंच ! " मी जात नाहीं असें जेव्हां त्यानें पाहिलें तेव्हां कमरेची तलवार त्यानें आपल्या मानेवर ठेवून घेतली ! काय तुला सांगूं ! माझा अर्धा प्राण भीमदेवाकडे आणि अर्धा प्राण तुझ्याकडे अशी माझी हल्लीं स्थिति आहे !

**चंपा॰**—( मिठी सोडवून ) नकाहो नका-नका-सोडा मला-तुम्हीं आनंदानें मला मारलेली ही मिठी, या राक्षसणीचें कृत्य तुम्हांला समजल्यावर, विषासारखी कडू होईल ! माझ्यावरचं सारं प्रेम नाहींसं होऊन मी तुम्हांला दृष्टीपुढें नकोशी वाटेन ! म्हणून म्हणतें, हा लोभ आवरता धरून ( जंबिया बाहेर काढून ) याच शस्त्रानें, प्रेम आहे तोंपर्यंतच माझा मोक्ष करा !

**जय॰**—काय म्हणतेस तं ! तं काय बोलतेस तेंच मला समजत नाहीं ! पण माझा दिलीप कोठें आहे ?

**चंपा॰**—( घाबरल्यासारखें करून ) दिलीप ! अगबाई ! तिकडे निजविला आहे बरं का त्याला ! चला माझ्या मागून-चला ( पडद्यांत जातात. पुन्हां परत येतात )

**चंपा॰**—हां. मी अगदीं त्याच जागेवर आलें बरं का. तें पहा तें झाड दिसतं आहे कीं नाहीं, त्याच्याच खालीं—प्रत्यक्ष मी मुलाची आई आणि मी जागा विसरेन वाटतं ! पण आतां त्याला झोपीं गेलेलाच पाहावयाचा, कीं त्याला जागा करूं ? बरं जागाच करतं आं. आपण इथंच उभं राहावयाचं ! मी त्याला जागा करूनच आणतं बरं का ! ( पुढें जाते. )

**जय०**—आतां ही आनंदानें अगदीं वेडी झाली !

**चंपा०**—( मुलगा निजविलेल्या ठिकाणीं नाहीं असें पाहून मोठ्यानें किंकाळी फोडून आंग जमिनीवर टाकते. जयसिंह घाबरून जवळ जातो. पडदा पडतो. )

---

## प्रवेश दुसरा.

### स्थळ.—मुसलमान लोकांच्या छावणी बाहेरील बाजू.

( पडद्यांत वाद्यें वाजत आहेत; भीमदेवाचे हात बांधलेले असून त्यास खानजहान प्रभृति पांच सहा शिपायांनीं धरलेलें आहे, असे सर्वजण ओढाताण करीत प्रवेश करितात.

**खान०**—झूटी बात कहेताहै! इस्कू बादशहाकेतरफ् लेचलो.

**भीम०**—काय? झूट बात! अरे या भीमदेवाच्या तोंडांतून खोटीं अक्षरें ! तूं आणि तुझे हे सर्व लोक असे मैदानांत चला आणि माझे हातांत एकदां तलवार येऊं द्या, म्हणजे तुम्हा सर्वांचा एकदमच समाचार घेतों! पाहिजे असेल तर येथेंच पहा. सोडा माझे हात. ( दांडगाई करतो ).

**खान०**—क्या बडी मर्तबेकी बात है, के राना भीमदेव सरीखे फौजबक्ष गोया एक चोरके माफक् मुसल्मीनके छावनीमे छिपाछिपाके फिरते है ! ( पडद्यांत वाद्यांचा गजर होतो. ) अब् क्या—हूजूर आये, उन्के सामने बाते करो. ( बादशाहा येतो. )

**बाद०**—( आश्चर्यानें ) कौन हमारे सामने लाया? भीमदेव !

**भीम०**—आपल्याला मोठें आश्चर्य वाटत असेल !

**बाद०**—और क्या पाबंद करके लाया है ! ( जरा भितो. )

भीम०—रसीनें हात आवळून टाकले आहेत. माझ्या जवळ येण्यास डरूं नका.

खान०—तकसीर माफ. हुजरेपुरनूर, ये भीमदेव अपने छावनीमेसे भाग जाता था. मैने उस्कू गिरफ्तार करके हुजूरके सामने लाया है.

बाद०—अभी उस्कू खुला करदो. भीमदेव, तुमकू ऐसे तन्हेके देखके मुझे बहोत अपसोस मालुम होता है ! हमारे कोतवाल खानजहानकूं गुन्हा माफ कीजीये.

भीम०—( एकीकडे ) आलास, लवकर शुद्धीवर आलास !

बाद०—तुमारे सरीखे बडे लडनेवाले लोग मेरे सामने गिरफ्तार करके लाये तो मुझे अपसोस पैदा होता है ! ए शमशेर तुम अपने हातमे लो. ( तलवार देतो ) मुजाका नही-मै तुमारा दुष्मन् हूं, मगर मै तुमारा ऐहसानमंद हूं, ऐहलेइसलाम लोग गनीमके उपरभी वख्तपर रेहेम करते है !

भीम०—आणि रजपूत लोकही असें झालें असतां, मुसलमान लोकांनीं केलेला अपराध विसरून जातात !

बाद०—हम अब् ये चाहते है, के तुमारी और हमारी दोस्ती होना. बडे जवामर्द और रेहेमदिल !

भीम०—आपण एकदां हिमालय उतरून पलीकडे गेलांत, कीं दोस्ती होण्याला काय उशीर ! जाऊ मी आतां ?

बाद०—खुषीसे चलो जाव.

भीम०—आतां तर मला कोणी प्रतिबंध नाहींना करणार ?

बाद०—( खानजहानकडे वळून ) तमाम फौजमे, और रिसालेमे, और चाऊस लोगोंमे, ऐसा हुकूम करदो, के भीमदेवको कीसीनेभी सताना नही. उस्कू खुषीसे जाने दो. ( भीमदेव जाऊं लागतो. इतक्यांत फैजद्दवला व कित्येक मुसलमान शिपाई जयसिंहाचे मुलासद्धां प्रवेश करतात. )

फैजु०—तकसीर माफ. दो शक्स हुजूरके ताबेदार गुंजा-

ग्रंथ संग्रहालय

न्मैसे आतेथे, उनकू रास्तेपर एक रजपूतका बच्चा मिला है ! ( मुलास दाखवितो. )

**बाद॰**—( त्यास दाबून हलकेच ) चुप् चुप रहो. तेरेकू आंखे है या अंधा है ? ( भीमदेवाकडे बोट दाखवून ) ए कौन है ? ( निष्काळजीपणानें ओरडून ) उस् लडकेकू हम्कू क्या करनेका है ? दरयामे फेक दो !

**भीम॰**—( मुलाचें नांव ऐकतांच मागे वळून पहातो. मुलास ओळखून ) हाय ! हाय ! हा तर जयसिंहाचा दिलीप !! ( पुढें होऊन ) द्या इकडे त्याला.

**बाद॰**—( आनंदानें ) क्या हमारे दुष्मन्का बच्चा ? माषा अल्ला ! ( फेजुद्दवला याचेकडे पाहून ) लाव इदर. ( मुलास घेतो ) एभी छोटा दुष्मन् है ! दुष्मन्कू रखना नही ! अब् फिर् मेरे हातमे जयसिंग आया.

**भीम॰**—( बादशाहास ) त्याच्या आईबापाची आणि त्याची ताटातूट करूं नका !

**बाद॰**—जब् और कोई दफे मुसलमीन लोग जयसिंगसे कतल किये जायंगे, तब् मै उस्कू जतलाऊंगा के तेरे फरजंदकी जान मेरे एक लव्हज्मे है-अभी इस्का सर उडा देताहूं !

**भीम॰**—( घाबरा होऊन ) तूं काय म्हणतोस तें मला कांहींच कळत नाहीं !

**बाद॰**—मै ये कहताहूं, के जयसिंग मेरा बडा दुष्मन् है. ए बच्चाभी उस्का है. इस्वास्ते मैं इसे खतम करूं ! ( मुलास फैजुद्दवलाचे स्वाधीन करतो. )

**भीम॰**—( निकरावर येऊन ) अरे तूं अदमी आहेस कीं हेवान आहेस ! अरे त्या पोराचा प्राण घेतोस ! तुझ्या तोंडाकडे पाहून तें हांसत आहे किरे !

**बाद॰**—क्या इस्की सूरत इसके माके सरीकी है ?

**भीम॰**—( रागानें लाल होऊन ओरडून ) पहा आगीवर तेल ओतीत चालला आहेस. ( आवेशानें ) या पोराच्या रक्ताचा

एक थेंब जर भुईवर पडला, तर तो मी तेथें जिरून सुद्धां जाऊं देणार नाहीं, इतक्यांत हें शीर या धडापासून वेगळें करीन! (बादशाहा दचकून मागें सरतो) भल्या मनुष्या मी तुझी सारखी मिनतवारी करीत आहे! अरे तुला जीवदान दिलें! अरे हा भीमदेव कधीं कोणाचे इतकें आर्जव करणारा नाहीं! (फैजुद्दवला याचेकडे पाहून) सोड बाबा त्या पोराला! आण इकडे.

बाद०—तुमकू जानेकी मुभा है. ये छोटा बच्चा हमारेपास रहेगा.

भीम०—मग तर ही तलवार माझ्या हातांत देण्याची तुला ईश्वरानेंच बुद्धि दिली म्हणावयाची! (झडप घालून पोर हिसकून घेऊन मोठ्यानें ओरडून) आतां कोणी आंगाला हात लावला तर तेथल्या तेथेंच छाटून टाकीन. (दोन तीन शिपायांस उलथे पालथे पाडून पोर घेऊन धांवत निघून जातो.)

बाद०—(रागानें) जाव उस्के पिच्छे और लाव उस्कू पकडके. (खानजहान, फैजुद्दवला व इतर लोक जातात. लांब पाहिलेसें करून) क्या जवामर्दी है! (थांबून) हाय! हाय! खानजहानकू काटा! या अल्ला! ए क्या बला! (थांबुन) और तीनचार अदमीभी कतल किया! (फैजुद्दवला घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करितो.)

फैजु०—तकसीर माफ. खानजहान हमारे बडे मुरबी हमारे वसीले (रडत रडत) या अल्ला! या परवार्दिगार! क्य वख्त लाया! गये ह्यांसे खुलूतमे—दुष्मनने जान लिया. सरकारका हुकूम तो ऐसा है क उस्कू पकडके लाना. (रागानें) मेरी राय इस० वख्त ये है, के अगरचे उस्की जान लिया तो अच्छा!

बाद०—बहोत बेहेतर. करदो खतम. (फैजुद्दवला निघून जातो) (बादशाहा लांब पाहिलेंसे करून) गया, अब नदीके पैलीबर भाग गया. (थांबून) कडाबीनसे चाऊस लोग मारते है. (थांबून) लेकिन् अब क्या खाली तकलीफ है! (थांबून)

क्या ? घोडा किसका पकडा ? घोडेपर स्वार हुवा है. (थांबून) क्या और किस्कू कतल किया ! ( थांबून ) अब् क्या रजपूत लोग आके उस्कू मिले ! मगर भीमदेवभी बहोत जखमी हुवा है. ( फैजुद्दवला घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करतो. )

फैजु०—तकसीर माफ. लेगया बच्चेकू ! बच्चाभी कुच्छ इजा नही पाया !

बाद०—( दांत ओंठ खाऊन मुठी वळून ) गनीमका लडका था, इस्वास्ते उस्कू मारनेका था ! मगर अब् क्या.—

फैजु०—इस्वख्त् भीमदेव कहां गया होगा, और राजा सामतासिंग कहां होगा, ये तमाम मुझे मालूम है. जंगलमे उन्की छिपानीकी जाय कौन्ची है ये मैं जानताहूं. मेरी राय अब् ये है के सो अदमी लेके अब् व्हयी जाना, और जयसिंग और भीमदेव दोनोकोभी कतल करना !

बाद०—तुमारी राय हमे पसंद है. सिरफ् अप्ने साथ सो अदमी जंगी जवान लो और फौरन् अभीके अभी चलो. रायमलकू ऐसा हुकम करदो के हम् वापस् आये तक् शेहेजादीको सताना नहीं. फिर् हम् उस्का इन्तजान करेंगे. ( पडदा पडतो. )

---

## प्रवेश तिसरा.

### स्थळ.—रणमैदानापलीकडील जंगल.

( श्रमिष्ट झालेली चंपावती, जयसिंह व सामतसिंह प्रवेश करतात. )

चंपा०—( जयसिंहाकडे पाहून ) आतां नका बरं मनाला वाईट वाटूं देऊं ! अगोदरच नाहीं का मीं सांगितलं, कीं माझं राक्षसी कृत्य तुम्ही ऐकलंत म्हणजे उभयतांमधील निर्मळ प्रेमांत

माती हो कालवली जाईल ! मी मोठी कृत्या आहें ! माझा सगळा देह शुद्ध आहे बरं ! पण हें मेलं तोंड विषानं हो भरलं आहे ! देवानं माझ्या बाळाला नेऊन मला योग्य शिक्षा केली बरंका ! पण त्यांना सोडून तुम्ही कशाला बरं आलांत ? भीमदेव तुम्ही तिथंच कां हो नाहीं याना सांगितलात या अवदसेचा एक एक खेळ ! पण आतां याला कांहीं तरी तोंड आहे का ? ( कित्येक रजपूत शिपाई प्रवेश करतात. ) कोण तुम्ही ? तुम्ही का माझ्या दिलीपाला नेलंत सांगा कसं लवकर ! लवकर बोला ! माना काय ओंवाळतां ? त्याला तुम्ही कोठें पाहिलात का ?

**सामंत०**—( चंपावतीकडे लक्ष देऊं नका असें शिपायांस खुणेनें सुचवून ) भीमदेवाकडची काय खबर ? त्याला घेऊन येण्याकरितां किती लोक पाठवले आहेत ?

**शिपाई**—एकजात निवडक तीनशें लोकांची रवानगी केली आहे.

**सामंत०**–(दुःखानें) परमेश्वरा, आतां कडेलोट झाला आमच्या दुर्दैवाचा ! भीमदेवा, केवढा हा अविचार केलास ! अरे या सामंत-सिंहाला नुसतें विचारायचें तरी होतेंस ! भीमदेवा, आमचीं सर्वांचीं तोंडें हीं पहा कशीं अगदीं सुकून गेलीं आहेत रे या काळजीनें !

**जय०**—मित्रा भीमदेवा, केवढें हें घोर कृत्य माझ्याकडून करविलेंस !

**चंपा०**—खरंच हो खरंच ! पण हें आपणच म्हटलंत म्हणून बरं. पण आतां किनई सगळं जग असंच म्हणत बसेल बरं ! ( सामंतसिंहाकडे पाहून ) मुलं बाळं झालीं म्हणजे सुख होतं नाहीं का ? आणि तीं आपल्याला अंतरलीं म्हणजे काय बरं होतं ?

**सामंत०**—( दुःखानें उसासा टाकतो. )

**जय०**—काय करावें आतां हिला ! राजाच्या अंतःकरणाला पीळ पडण्यासारखा एक एक शब्द ही पटापट तोंडांतून बाहेर काढते आहे !

**सामत०**—( दुःखानें ) रजपूत वीरांना देणग्या देण्याचा प्रसंग आला म्हणजे या सामतसिंहानें हौसेनें पुढें व्हावें ! आणि अशा बिकट प्रसंगीं माघार घ्यावी ना ! मुली, काय हा तुझा वेडेपणा ! अशानें कोठें एकदां नाहींशीं झालेलीं मुलें परत का येतात ! पद्मावतीच्या मुक्तेकरितां हजारों शूर शिपाई या चांडाळानें मृत्यूच्या तोंडांत ढकलले ! आणि शेवटीं भीमदेवासारखा अमोल्य हिरा आमच्या तोंडांला काळें पुसून निघून गेला ! केवढी शरमेची गोष्ट !

**जय०**—लाडके, केवढा हा भयंकर प्रसंग आम्हा सर्वांवर आणलास ! तूं आपल्याबरोबर मलाही पापांतच खेंचलंसना !

**चंपा०**—आणि माझा दिलीप देखील पापीच गेला ना ! आतां किनई जिथें तें आभाळ टेंकलेलं दिसत आहे तेथें जाऊन त्याला घेऊन येते बरंका-( निघून जाऊं लागते ) पण तुम्ही वाट पाहालना ? थांबा बरं इथेंच ( निघून जाते. )

( इतक्यांत “ भीमदेव आला ” असा पडद्यांत गलबला होतो. सर्व आश्चर्यानें तिकडे पाहूं लागतात. रक्तबंबाळ झालेला भीमदेव मुलासुद्धां प्रवेश करतो. )

**भीम०**—( मुलास जयसिंहाच्या पुढें ठेवन ) मित्रा जयसिंहा, हा तुझा दिलीप ! आणि ( सामतसिंहाच्या पायावर डोकें ठेऊन ) महाराजांचा हा बंदा भीमदेव !

**सामत०**—( भीमदेवास उठवून आलिंगन देऊन ) भीमदेवा, केवढा आनंद झाला आहे म्हणून सांगू !

**जय०**—( भीमदेवाच्या गळ्यांत मिठी मारून ) मित्रा भीमदेवा मी तुझा कसा उतराई होणार ! ( इतक्यांत चंपावती धांवत धांवत येते. )

**चंपा०**—( प्रथम मुलाकडे दृष्टि जाऊन ) अगबाई ! हा माझा दिलीप ! ! ( मुलांस उचलून घेऊन वस्त्रें रक्तानें भरलेलीं पाहून ) पण याच्या आंगांतून रक्त हो वाहत आहे !

**भीम०**—हें त्याच्या आंगांतलें रक्त नव्हे ! या भीमदेवानें

आपल्या आंगांतील काळें ठिकर रक्त त्याच्या आंगावर शिंपडलें आहे ! चंपावती हा तुझा जयसिंह आणि हा तुझा दिलीप !

**चंपा०**—( भीमदेवाचे शब्द ऐकून एकदम शुद्धीवर येऊन त्यास ओळखून त्याच्या पुढें पदर पसरून ) पदर पसरला बरं भीमदेव तुमच्यापुढं! आतां मला क्षमा करावी ! तुमचं कोंवळं मन मी वेडाच्या लहरींत वाटेल तें बकून व्यर्थ हो दुखविलं! मागचा पुढचा विचार न पाहतां मी पाहिजे तशी बकलें ! म्हणून म्हणतें, माझ्यावर रागावूं नका ! माझे अन्याय पोटांत घाला ! आपल्या मायाळु अंतःकरणावर अपशब्दांचा वर्षाव केला ! बोलूं नये तें बोललें ! त्यावेळेस मी इतकी बेताल झालें होतें कीं, आपल्याला मित्र प्रेमाच्या अढळ पर्वतावरून खालीं पापाच्या डोहांत हो लोटलं ! माझं त्यावेळीं आपण टाळकं सडकलं असतं तर माझें वेड कसें लवकर उतरलं असतं ! ! पण तुमचें उदार अंतःकरण तुम्हाला असं कुठलं करूं द्यायला ! हें तुमच्या उपकाराचें रीण माझ्यानें कुठलं फिटायला ! मी तुमची धर्माची बहीण आहे ! माझे सगळे अन्याय पोटांत घाला ! आतां मला किती पश्चात्ताप होत आहे म्हणन सांगूं ! म्हणन हात जोडतें ! पाया पडते ( पायांवर डोकें ठेवते ) मला क्षमा करा आणि जसं आजपर्यंत दिलीपावर आणि इकडे प्रेम केलंत तसंच पुढें करा ! आम्हाला अंतर देऊं नका ! आम्हीं फार अपराधी आहोंत !

**भीम०**—[ तिला उठवून ] ऊठ ऊठ, आतां. तुला पश्चात्ताप झाला! येवढेंच पुरे ! परमेश्वरानें आज माझ्या तोंडाची मोठीच काळोखी घालविली ! नाहीं तर इहपरलोकीं तुझ्यासारख्या साध्वीच्या नाहक शापानें मला अक्षय यातना आणि दुःख भोगावें लागलें असतें ! ऊठ आतां, आणि हें अज्ञान सोडून या भीमदेवाकडे बंधुप्रमाणें पहा ! म्हणजे परमेश्वर तु-

ला कांहीं कमी पडूं देणार नाहीं ! ( इतक्यांत शूरसिंग घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करतो. )

**शूर०**—महाराज अशी बातमी लागली आहे, कीं निवडक शंभर लोकांना बरोबर घेऊन शहा राणा भीमदेवांचा शोध करीत अगदीं नजीकच्या जंगलांत आला आहे.

**भीम०**—तर आंतां अगदीं विलंब नको. सर्व रिसाल्याची एकदम तयारी करा. सर्व रजपूत शिपायांना कुसुंबा पाजा आणि एकदम लढाईचें शिंग वाजवा. आतां पद्मावतीची मुक्तता झालीच म्हणा! कारण मी इकडे येतांना रायमलाला कानमंत्र फुंकून आलों आहे. तो मोठा धूर्त आहे तेव्हां माझ्या सांगण्याप्रमाणें तो खात्रीनें करील.

**चंपा**—(मुलाचा मुका घेऊन) भीमदेव आतां मला बादशाहाचं मुंडकं दाखवायाला आणाच बरं कां! [ पडदा पडतो ]

---

## प्रवेश ४ था.

### स्थळ०—जंगल. (एका बाजूनें नसीरखानर, फैजुद्दवला, खिजरखान व कित्येक मुसलमान शिपाई प्रवेश करतात.)

**बाद०**—अब दुष्मन आके-अगरचे हमकू घेरा दिया, तो फिर क्या नतीजा होगा ।

( दुसऱ्या बाजूनें सामतसिंह, भीमदेव, जयसिंह व कित्येक रजपूत शिपाई प्रवेश करतात ).

**भीम०**—( ऐकलेस करून ) मग भीमदेवाची तलवार तुला वाट दाखवील ! समजलास ?

**बाद॰**—तेरेवास्ते आया. अब् तेरा खून पिताहूं! हम् तो सो अद्मी है, तुम् तो पांचसो है! फिर् तुमारी क्या जवामर्दी है! चाहे तो मेरेसे अकेला लढ!

**भीम॰**—कांहीं हरकत नाहीं; माझ्याही मनांत तीच खुमखुम आहे! रजपूत शिपायांनो तुम्ही जाग्यावरून अगदीं हालूं नका.

**बाद॰**—ऐ मेरे सरदार लोगो; तुमभी ऐसे खडे रहो. म दुष्मन्की अभी एक लेहेजेमे जान लेताहूं! (उभतांचे हात होतात. त्यामध्यें बादशाहाची किंचित् सरशी होते. इतक्यांत "पद्मावती आली" असा मोठा गलबला होतो; आणि पुरुषाचा पोषाक केलली पद्मावती, रायमल व चंपावती त्या ठिकाणीं एकदम येऊन उभी राहतात. बादशाहा तिला ओळखतो व या ठिकाणीं ती एकएकीं आली, हें पाहून त्यास फार वाईट वाटतें. या धांदलींत भीमदेव त्याला जखमी करून खालीं पाडतो, व त्याच्यावर वार करणार इतक्यांत सामतसिंह व जयसिंह त्यास बाजूला ओढतात. रजपूत लोकांत जयजयकार होतो व मुसलमान लोक हळहळतात. पद्मावती आपल्या बापाला कडकडून भेटते.)

**सामत॰**—(गहिंवरून) माझा कंठ इतका दाटून आला आहे कीं, या वेळेस माझ्या तोंडांतून एक शब्द निघत नाहीं!

**जय॰**—भीमदेवा,चहार केलात! शत्रूनें भुईला पाठ लावल्यावर वीरानें त्याच्यावर शस्त्र चालवूं नये! आज मुसलमानांची खाशी रग जिरली! फार मूजोर!(तलवार उपसून.) या आतां कोणांत अवसान असल्यास! कोण नसीरखान खिजरखान, कोण खान आहेत ते या! हा जयसिंह तुमच्या पुढें उभाच आहे! (कोणी येत नाहीं असें पाहून सामतसिंहाकडे वळून) महाराजांची आतां काय आज्ञा आहे? या सर्वांना कैद करूं, कीं सर्वांची कत्तल करूं?

**सामत॰**—कत्तल करूं नका. मघा आपणावर प्रसंग होता आतां त्यांच्यावर आहे! ते सर्व शरण आल्याप्रमाणें आहेत.

**बाद॰**—( एक हात छातीला लावून कण्हत कण्हत) या अल्ला ! या मौला ! क्या वख्त् लाया ! अपसोस है, के मैंने फैजुद्दवलाकी सला पसंद किई,और सिर्फ् सौ जंगी जवान लेके ह्यां आया ! अच्छा; अब क्या ! मुजाखा नहीं ! सामत॰ सिंग मै तो फिलहाल तेरे ताबेमे है ! मै अपनी सिकेकन्यार तेरे सुपर्द करताहूं ! तेरेकू चाहे वैसा हमसे ऐकरार करलो !

**भीम॰**—कांहीं हरकत नाहीं;तुझ्या तोंडांतून इतकीं अक्षरें निघालीं इतकें पुरे आहे ! तूं आतां असा करार लिहून द्यावास कीं, ' आजपासून हिंदू लोकांच्या देवस्थानांवर हल्ला करणार नाहीं-रजपूत लोकांच्या वाटेस जाणार नाहीं-बिगर परवाना रजपूत लोकांच्या शहरांत मुसलमान लोकांस येऊं देणार नाहीं-व दरसाल तीस हजार मोहरांची रसद-महाराज सामतसिंह यांना तमामी पोषाक आणि दरबारांतील सर्व सरदा-लोकांस पोषाक-रेशमी-पाठवीत जाऊं.'

**बाद॰**—हमे ऐकरार कुबूल है. कसम् खुदाकी हमे मंजूर.

( सामतसिंह व भीमदेव बादशाहास धरून उठावितात.कित्येक रजपूत शिपाई व भाट प्रवेश करतात. )

**प॰ भाट॰**—

### कवित्त.

तुम सिंहराज ब्रजराज अवतार आजु
तुमही जगत काज पोषत भरत हौ ।
तुम्हे छाडि यातैंकाहि बिनति सुनाउं मै
तिहारे गुण गाऊं तूं ढील क्यौं धरत हौ ॥
भूषन भनत वह कुलमे न भयो न गु-
नाहक छुटायो क्यौं न चितही हरत हौ ।
और ब्राम्हननी देखि करत सुदामा सुधि
मोहि देखिकाहे सुधि भृगुकी करत हौ ॥ १ ॥

दु० भाट०—

### सवया.

एकै कहैं कल्पद्रुम हैं इमि पूरतु है सबकी चित चाहै ।
एकै कहैं अवतार मनोजको यौं तनमे अति सुंदरता है ॥
भूषन एकै कहैं महि इंदुयो राजुविराजतु बाढ्यौं महा है ।
एकै कहैं नरसिंघ हैं संगर एकै कहैं नरसिंह है ॥ १ ॥

**सामत**—आज मला पुत्रोत्सवाप्रमाणें आनंद होत आहे !

**जय०**—आज भीमदेवानें मोठाच पराक्रम केला. लढाईचा शेवट उत्तम झाला!

**सामत**—तुम्हीं उभयतां सारखेच पराक्रमी आहांत ! भीमदेव तुम्ही मला शत्रूच्या सैन्यांतून सोडवून आणिलेंत ! तुम्हीं जयसिंहास कैदेंतून मुक्त केलेंत ! इतकेंच नाहीं तर त्याच्या मुलाला सुद्धां काळाच्या दाढेंतून ओढून आणलांत ! तुमच्यामुळें माझ्या मुलीची सुटका झाली ! या सर्व उपकारांबद्दल मी आपली ही एकुलती एक कन्या पद्मावती तुम्हाला देतो ! ! ( पद्मावतीचा हात भीमदेवाच्या हातांत देऊन ) हिचा तुम्ही स्वीकार करावा.

**भीम०**—महाराजांनीं हा जो माझा गौरव केला त्याला मी मुळींच पात्र नाहीं ! कर्ता करविता परमेश्वर आहे ! त्याच्या कृपेनेंच हें घडून आलें ! मी कांहींच केलें नाहीं. आतां महाराजांनीं मला ईडरला परत जाण्याची परवानगी द्यावी !

**पद्मा०**—या रायमलाचेही मजवर मोठे उपकार आहेत ! त्याच्यामुळेंच माझी सुटका झाली !

**सामत०**—मुली, या त्याच्या उपकाराबद्दल त्यास जहागीर करून देतों; आणि ज्यांनीं म्हणून या घोर रणकंदनांत आपली तलवार गाजविली, आपली एकनिष्ठा दाखविली, त्यांस इनामें व जहागीरी करून देतों ! !

**चंपा०**—जोडा पण कसा अगदीं लक्ष्मीनारायणासारखा दिसतो बरंका ! !

**भीम०**—मुसलमानांचा नकशा खालीं झाला ! रजपूत वीरांनीं मात केली ! ! आणि आपणा सर्वांना हा सुखाचा दिवस दिसला ! ! !

**सामत०**—परमेश्वरानें आज सुदीन दाखविला त्याचे दर्शनास मंदिराकडे स्वारी निघण्याची तयारी करा !

**भाट०**—

## कवित्त.

पैज प्रतिपाल भूमि भारको हमाल
चहुं चक्को अमाल भयो दंडत जहानको !
साहीनको साल भयो ज्वारको जबाल
भयो हरको कृपाल भयो हारके विधानको ॥
वीर रस ख्याल, सिंहराज भुवपाल तृव
हांथको विसाल भयो भूषन वखानको ।
तेरो करवाल भयो दाक्षिणको ढाल, भयो
हिंदको दिवाल, भयो काल तुरकानको ॥ १ ॥

( पडदा पडतो. )

# पुस्तकांतील उर्दु भाषेंतील भाषणांचा मराठींत अर्थ.

## पान १२–२१

### अंक २ रा. प्रवेश पहिला.

प० चो०—आपल्या लावण्यप्रभेनें सकल भूमंडल दैदीप्यमान करणारे बादशाहा दरबारांत येत आहेत. उपवनांतील पक्षी ( बुलबुल पक्षी ) आनंदानें मंजूळ शब्द काढीत आहेत; आणि त्यांचा आनंद त्यांच्या पोटांत मावेनासा झाला आहे. ज्यांच्या कल्याणाकरितां धनिक आणि दरिद्री लोक परमेश्वराची सदैव प्रार्थना करतात, ज्यांनीं आपल्या अतुल पराक्रमानें घोरी पावटीचा किल्ला सर केला, आणि ज्यांचें सुयश गीत मी प्रेमानें गात आहें, असे हे बादशाहा आलेच.

( चोपदार पुकारतो. )

ज्यांचें धन आणि आयुष्य हीं प्रतिदिनीं इंदुकलेप्रमाणें वृद्धिंगत होत आहेत आणि ज्यांनीं चिरकाळ राजपदभोग अनुभवावा, अशा आमच्या राजाधिराजांनीं सभाजनांकडे प्रेमदृष्टीनें पाहावें.

( बादशाहा येतो सर्व उभे राहतात. )

दु० चो०—पुण्य पुरुषांच्या अनुग्रहास पात्र झालेले आणि सकल राजमंडळांत श्रेष्ट असे हे पृथ्वीपति अहमदशाहा बादशाहा होत. यांच्या शौर्याचा आणि दातृत्वाचा महिमा सर्व जगभर पसरला आहे. विजयश्री यांच्यापुढें सदैव हात जो-

डून उभी आहे आणि यांचे औदार्य अखिल जगतास विदित आहे. परमेश्वराची यांचेवर कृपादृष्टी असून पुण्य पुरुषांचा वरदहस्त यांच्या मस्तकावर आहे. हे बादशाहा संग्रामांत सदैव यश मिळवून शत्रूला दातीं तृण धरावयास लावितात. यांच्या सैन्यांतील लढवय्ये रुस्तुमाप्रमाणें ( रुस्तुम या नांवाचा मुसलमानांत मोठा बलाढ्य पुरुष होऊन गेला ) संग्रामकुशल आहेत. सर्वांच्या कल्याणाकरितां दीनवत्सल प्रभूची रात्रंदिवस प्रार्थना करणाऱ्या या गरीबाचे परमेश्वरापाशीं अतिनम्रपणें हेंच मागणें आहे कीं, त्यानें आमच्या महाराजांस चिरायू करावें.

**बादशाहा**—ज्यानें पंचतत्वें उत्पन्न करून ही सृष्टि निर्माण केली, ज्यानें कृपावंत होऊन मजसारख्या यःकश्चित् प्राण्यास पातशाही तक्तारूढ केलें, ज्याच्या प्रसादानें परधर्मी मूर्तिपूजकांच्या राष्ट्रावर आह्मांस स्वामित्व मिळालें आणि आरंभिलेल्या तुंबळ युद्धाचा असा इष्ट अंत झाला त्या ब्रह्मांडपालकाचे मजवर अगणित उपकार आहेत. सामतसिंहाचा केवळ प्राण अशी जी त्याची आवडती मुलगी हिला तुम्ही आपल्या हस्तगत करून घेतलीत. अहाहा! काय तिचें सौंदर्य! तिची अंगकांति आकाशांत तळपणाऱ्या विद्युल्लतेसारखी तेजःपुंज!! स्वामीकार्यासाठीं जिवाची आशा सोडून लढणारे तुमच्यासारखे दोस्त पाहून मनाला फारच आनंद होत आहे. तुम्ही मोठ्या निकरानें लढून हजारों लोक मृत्यूच्या तोंडांत लोटलेत. तुम्ही अहोरात्र तीन महिने झुंजत होतात. या तीन महिन्यांत तुमच्यावर अनेक बिनतोड प्रसंग गुदरले; परंतु परमेश्वरावर विश्वास ठेवून तुह्मीं हिमायतीनें त्या सर्वांना तोंड दिलेंत आणि अस्सल वीरांचें सत्व कायम राखलेंत!! तुह्मीं येवढ्याशा लोकांनीं शत्रूचा प्रचंड सेनासमुद्र आटवून टाकलात! धन्य! धन्य तुम्ही!! तुमच्यासारख्या शूरपुत्रांनीं तलवार गाजवून मला भूषणास चढविलें! अहो दोस्तहो, ही

तुमची धर्मभक्ति आणि राजनिष्ठा निष्फल होणार नाहीं! इह-परलोकीं तुमच्या कीर्तीचा डंका सारखा दुमदुमत राहील. सरकारांतून तुह्मांला मोठमोठीं इनामें मिळतील, आणि तुह्मां सर्वांचे अधिकार वाढविले जातील. तुह्मीं सर्वांनीं कालच्या घोर संग्रामांत जी मर्दुमकी केलीत तिची हकिकत तुमच्या तोंडून ऐकण्याची फार इच्छा आहे.

**जंगी०**—महाराज, जेव्हां या सेवकानें राजकन्येस गराडा दिला तेव्हां तिच्या शेंकडों दासी हृदय पिटीत, आक्रोश करीत तिच्यामागें धावूं लागल्या. या बहादरानें सर्वांनाच कैद केलें. आमच्या सामन्याला ब्राह्मण आणि रजपूत असे दोन्ही जातीचे लोक होते. मिशांना पीळ चढविणाऱ्या अशा कित्येक मर्दांना मीं स्वतःच यमसदनास पाठविलें, आणि कित्येकांना शिपायाकडून ठार करविलें. शेंकडों लोकांना मीं यथासांग मुसलमान बनविलें. त्यावेळीं रजपुतांनीं थैमान करून आह्मांस रामाची शपथ घातली. ब्राह्मण लोक शिवनामाचा घोष करून आणि मोठ्यानें आक्रोश करूं लागले. "हर! हर! आह्मी धड हिंदूही नाहीं आणि धड मुसलमानही नाहीं; आह्मी दोन्ही धर्मांस आंचवलों! या वेळेस आमचे प्राण निघून जातील तर फार बरें! तुर्क लोकांनीं आम्हांस सर्वस्वी नागविलें! परमेश्वरा, आतां आमची लाज तूंच राख." या सेवकानें या गादीची जी सेवा केली ती हुजुरांत जाहीर आहेच; तेव्हां विशेष सांगण्याचें कांहीं राहिलें नाहीं.

**नसी०**—राजाधिराज महाराजांच्या बलवत्तर नसीबावर विश्वसून मी आपल्या साथीदारांसह मोठ्या निकरानें शत्रूंवर तुटून पडलों; आणि गिल्ला करून 'हैदर हैदर' ह्मणत आह्मी जेव्हां शत्रूंशीं भिडलों तेव्हां तलवारीचे घावावर घाव मारून हजारों शत्रूंचे राई येवढे तुकडे करून त्यांचा या भूतलावर मागमूस सुद्धां राहूं दिला नाहीं. आम्ही लाखों लोकांचीं शिरें तोडू-

न रक्ताचे पूर वाहविले; आणि महाराजांच्या नांवाचा झेंडा आपल्या पराक्रमानें फडकत ठेवला.

**दिला०**—महाराज मी तलवार बहादूर आहें आणि माझे शिपाईही तसेच आहेत. आह्मापुढें हिंदु लोक मांजरासारखे. आमचे शिपाई जिवंत शत्रूंला जेव्हां हार गेले तेव्हां मेलेल्या शत्रूंच्या मुडद्यावरच घसरले आणि रणशूर पुरुषांपुढें जेव्हां त्यांचा टिकाव लागेनासा झाला तेव्हां ते नामर्द लोकांवरच तुटून पडले. डोकीं कापायचीं सोडून ते शेंड्याच कापूं लागले. सगळे रजपूत शिपाई ह्मणूं लागले "राम! राम! आतां कांहीं आमची धडगत नाहीं. इकडे शेंडी गेली आणि तिकडे भोकाचे कान राहिले (ह्मणजे आह्मी धड मुसलमानही नाहीं आणि धड हिंदुही नाहीं.) आमच्या धर्मांची कंबर खसली" असें ह्मणत सर्व शत्रू पळूं लागले. आमच्या तोंडावर कोणीच येईनासा झाला. महाराजांना विजय मिळाला. हा सर्व या गादीचा प्रताप आहे. आह्मी सर्व सरदार आपल्या कमरेला लटकणारीं हत्यारें आहोंत; जिकडे जाण्याचा हुकूम झाला तिकडे निघालें; आणि जें सांगितलें तें केलें! परमेश्वरा तुझ्या प्रसादानें आमच्या महाराजांच्या प्राक्तनीं नेहमी विजयच असो.

**खान०**—सार्वभौम महाराज, मूर्तिपूजकांनीं बरीच धडपड केली, परंतु आपलें अन्न खाऊन या आमच्या अंगांत उत्पन्न झालेल्या शौर्यापुढें त्यांचें कांहींच चालेना. त्यांनीं आपल्या हातांनींच आपलें नुकसान करून घेतलें. तंग इजारीवाल्यापुढें पोकळ धोतरें नेसणारे कसे टिकणार! या ठिकाणीं सुईला वाव मिळणार नाहीं आणि तिकडे सारेंच सैल आणि ढिलें. सगळे धायधाय रडूं लागले कीं, "तंग इजारीवाल्यांनीं आह्माला धूळ चारली, आमच्या धोतराची अब्रू आतां परमेश्वरानेंच सांभाळावी." शत्रूकडील सगळे लोक 'देव देव' ह्मणत होते आणि आह्मी 'अल्लाहोअकबर' अशी

गर्जना करीत हातांत तलवारी घेतल्या. चमाचम् खंजीर चमकावीत खडाखड तलवारीचे आवाज काढीत आम्हीं आह्मां-वर तुटून पडलेल्या शत्रूंचा पुराच समाचार घेतला आणि जे भिऊन पळत होते त्यांचा पाठलाग करून त्यांना जमीनदोस्त केले. आपल्या अन्नावर पोसलेल्या या सेवकांनीं किल्ल्यांत घुसून आपल्या धर्मांचें निशाण किल्ल्यावर फडकवीत ठेविलें; हें पाहून शत्रूंनीं तोंडें फिरविलीं. "वाहवा! परमेश्वरानें आज आपणास फत्ते दिली आणि आपल्या श्रमाचें चीज झालें" असें ह्मणत आह्मी सर्व लोक आराम करावयास गेलों. परमेश्वरा, आमच्या महाराजांस सदैव असेंच यश दे!

**फैजु०**—राजश्रेष्ट महाराज, आपण या सेवकाला सेनानायक केल्याबद्दल मला मोठी धन्यता वाटत आहे. या बहादुराचें पाऊल प्रत्येक लढाईंत सर्वांच्या पुढें असतें. याच्या घोड्याची दौड सर्वांच्या पुढें. तीर मारणारे, तलवारी पेलणारे, परशु हातांत घेणारे, भालेवाले, गोफणवाले, इत्यादि सर्वच हत्यारबंद शिपाई आमच्यामागें राहणारे; परंतु आश्चर्य हेंच कीं, लढाईमध्यें मात्र आमचा मान सर्वांच्या पुढें होण्याचा आणि अशा प्रसंगीं आमचा मान पिच्छाडी संभाळण्याचा! आतांच पाहानात, लढाईंत आह्मी या सर्व सरदारांच्यापुढें असून या सर्वांनीं आतां आह्माला शेवटीं ढकलिलें! असो. ही तरी एक आनंदाचीच गोष्ट आहे कीं, सर्वांचा अगापिछा सदासर्वदा आमच्याच हातीं आहे. महाराज, या सेवकाच्या बोलण्याकडे लक्ष्य असावें. जेव्हां आह्मी तोंडे शिलगावून बार काढीत शत्रूच्या मागें लागलों तेव्हां गाफील हिंदुलोक, घोडेस्वार, पायदळ चटसारे दाही दिशा पळूं लागले. त्यांची दाणादाण झाली. आह्मी आपला रोंख फिरविला हें पाहून आपल्याकडील सर्व सैन्यानें आमचेंच अनुकरण केलें. समरांगणांतून पाय काढलेल्या शत्रूंचा आह्मी सर्पूस समाचार घेतला! प्रत्येकानें आपला आपला पराक्रम दाखवून शत्रूला

जर्जर केलें.—मुसलमान धर्माचा डंका दुमदुमू लागून महारांजांच्या नांवाचें निशाण किल्ल्यावर रोंविलें गेलें. परमेश्वरानें यश दिलें आणि सर्वांच्या इच्छा परिपूर्ण झाल्या. या सेवकाच्या पराक्रमाची किंमत करणें सरकाराच्याकडे आहे. जास्त बोललों याबद्दल हुजूरांनीं राग करूं नये. परमेश्वर आपलें कल्याण करो.

**बादशाहा**—आजच्या या दरबारांत बसलेल्या सरदार लोकांकडे पाहून मनाला मोठा आनंद वाटत आहे. तुह्मीं आपल्या शौर्याचें जें वर्णन केलेंत त्यावरून तुह्मी मोठे पराक्रमी आहांत अशी आमची खातरी झाली आहे आणि तुम्हीं गाजविलेला अतुल प्रताप आमच्या पूर्णपणें ध्यानांत आला आहे. ज्याच्या त्याच्या मर्दुमकीप्रमाणें त्यास इनामें आणि जहागिरी दिल्या जातील.

**मौलवी**—शाबास ! वाहवा ! तुम्हीं मोठाच पराक्रम केलांत. इहपरलोकीं तुह्मी धन्य आहांत. तुह्मी कट्टे धर्मप्रसारक आहांत. धर्मप्रसारार्थ आरंभिलेल्या या घोर युद्धांत जे मृत्यु पावले ते पुण्यपुरुषांच्या आणि महात्म्यांच्या पदाला पोहोंचले. हे पुण्यपुरुष आणि महात्मे अमर आहेत. म्हणूनच जे ह्या धर्मयुद्धांत पतन पावले त्यांची योग्यता जिवंत राहिलेल्या लोकांपेक्षां श्रेष्ट होय. धारातीर्थी पतन पावून ज्यांनीं पुण्य पुरुषांच्या पदाची जोड मिळविली अशा महात्म्यांच्या स्तुतिपाठानें हजारों मुसलमानी ग्रंथ ओतप्रोत भरलेले आहेत. अशा पुरुषांचा गुणानुवाद कोण वर्णन करील ! त्या ठिकाणीं वक्तृत्वशक्ति काय काम करणार ! जे या युद्धांत विजयी झाले आहेत त्यांनीं शत्रूला जर्जर करून सोडिलें. तुम्ही सर्व सरदार मुसलमानी धर्माचे आधारस्तंभ आहांत. या साऱ्या दुनियेवर बहादुर काय ते तुह्मीच. मुसलमान लोकांचें राज्य तुमच्याच जोरावर कायम आहे. ज्यानें धर्मप्रसाराचा विडा

उचलला आहे अशा बादशाहाला तुमचेंच पाठबळ पाहिजे आहे. आपल्या धर्माचा जो प्रसार होत आहे तो तुमच्याच बहादुरीवर. बादशाहाचें कर्तव्य विपुल धन देणें, आणि तुमचें कर्तव्य बादशाहाकरितां माना पुढें करणें होय; कारण मुसलमानी धर्माची इमारत तुमच्याच आधारावर उभी आहे. परमेश्वरा, इहपरलोकीं उभयतांसही त्यांच्या सत्कृतीबद्दल सुगति दे.

**बादशाहा**—सामतसिंहाच्या मुलीची बरदास्त राखण्याचें काम आमचे मोठे बहादुर सरदार फैजुद्दवला यांच्याकडे सोपविलें आहे.

**फैजु०**—महाराज, आपल्या अन्नावर वाढलेला हा सेवक सरकारच्या हुकूमाप्रमाणें सर्व व्यवस्था करील. त्या सुंदर राजकन्येला तिच्या दासीसह मोठ्या सौख्यांत ठेविलें जाईल आणि जयसिंहाबरोबर सरकारांनीं कैद करून आणलेला—मोठा इमानी—रायमल यास तिच्या तैनातीस ठेवून देईन. राजकन्या आपल्या आईबापापासून दूर झाल्यामुळें तूर्त तिच्या जिवास चैन पडत नाहीं. परमेश्वर करील तर रमजान (मुसलमान लोकांचा एक महिना आहे) निघून गेल्यावर राजकन्येबरोबर सरकारचा विवाह होईल.

**बादशाहा**--त्या निमकहराम जयसिंहाचें नांव उच्चारून तोंड कां विटाळतां ? तो मोठा दगेखोर आहे. मीं त्याला येथें राजपुत्राप्रमाणें ठेविला होता. त्याला मी पोटच्या पोराप्रमाणें लेखीत होतों. ज्यावेळेस मीं त्याला कैद केलें त्यावेळेस मला किती श्रम पडले ह्मणून सांगू. मी खात्रीनें सांगतों कीं त्यावेळेस जर मी शत्रूच्या तोंडावर नसतों तर जयसिंह हातीं लागताना, कोणीतरी कृतघ्नपणानें फितवून त्याला येथून पसार केलें. (सर्व सरदार भोजराजाकडे बोट करतात. बादशाहा रागानें त्याच्याकडे पाहतो. दोन फकीर प्रवेश करितात.)

**फकीर**--परमेश्वरानें रूपावंत होऊन आपल्या भक्तांना हा किती अत्युत्तम प्रसंग दिला आहे. अहो लोकहो, आपल्या आयुष्यांत अमोल प्रसंग म्हटला म्हणजे हाच. परमेश्वरानें आमच्या कामाचा आम्हांला योग्य मार्ग दाखविला, ह्मणून आह्मीं अनन्यभावानें त्यास जितकें शरण जावें तितकें थोडेंच. चांगल्याचें फळ चांगलेंच येतें; याकरितां आपण नेहमीं सत्कृत्य करीत असावें म्हणजे आपलें कल्याण होईल. हा दिवस, ही वेळ, आणि ही घडी, हीं अमोलिक असून पुनः येणारीं नाहींत. तुम्हाला जर परमेश्वर चरणाची जोड मिळवावयाची असेल तर चांगलें काम कोणतें, वाईट काम कोणतें याचा नीट विचार करा-नीट मनन करा-आणि त्या अनुरोधानें आपलें वर्तन ठेवा. हे दिवस आणि ही वेळ फुकट जाऊं देऊं नका. स्वहित साधण्याचा हा प्रसंग गमवूं नका. परमेश्वराचा आमच्यावर केवढा अनुग्रह, कीं अशा राजदरबारांत आह्मासारख्या गरीब लोकांस येण्याचा हा अपूर्वयोग आम्हास मिळाला !

महाराजांचें राज्य चिरायु होवो. आह्मी महाराजांचे दासानुदास आहोंत. आमच्याकडे महाराजांनीं हेराचें काम सोंपविलें होतें. आह्मी आज्ञेप्रमाणें सामतसिंह राजाच्या जुनागड शहरीं जाऊन तेथील सर्व कच्ची बातमी काढून आणली आहे. ती हीच कीं, ज्याच्या बापाला महाराजांच्या आजोबानें ठार केलें होतें तो ईडरचा राणा भीमदेव आपली वीस हजार स्वारांची मांड घेऊन सामतसिंहास मिळाला आहे. महाराजांच्या कैदेंत असतां येथून पळून गेलेला जयसिंह सामतसिंहासच मिळाला आहे. येथें नजर कैदेंत असलेल्या सामतसिंहाच्या मुलीची मुक्तता करण्याविषयीं सर्वांनीं कमरा बांधल्या आहेत. यासंबंधानें तूर्त तिकडे मोठीं गुप्त कारस्थानें चाललीं आहेत. महाराजांबद्दल शत्रूकडील लोक मनांत सारखे जळत आहेत. सामतसिंहानें राणा भीमदेवाकडे सेनापतीचें काम सोपविलें आहे.

आणि सर्व सरदारांना आपल्यावर चाल करून येण्याचा हुकूम फर्माविला आहे. शत्रूकडील सर्व लष्करी लोक उद्यां सोमनाथाचे दर्शनास जाणार आहेत आणि आपल्या धर्माप्रमाणें भजन, कीर्तन, पुराण, जागर, मंत्रपाठ, नैवेद्य, ब्राह्मणभोजन वगैरे उरकून आनंदी आनंद करणार आहेत; आणि परवां लष्कर हलून आपल्यापुढें लढाईला उभे राहणार. आह्मीं जें कांहीं पाहिलें आणि ऐकिलें तें सर्व महाराजांच्या कानावर घातलें आहे. पुढचा विचार करणें सरकाराकडे आहे. परमेश्वरा, आमच्या महाराजांस चिरायु कर.

**बादशाहा**—आतां हेरांनीं जी कांहीं खबर सांगितली त्या संबंधानें मीं जें म्हणत आहें तिकडें तुम्हां सर्वांचें अवधान असेंव. सामतसिंह, भीमदेव आणि येथून पळून गेलेला जयसिंह या त्रिवर्गांनीं एकत्र मिळून जो व्यूह रचला आहे आणि जो संकल्प केला आहे त्याविषयीं तुम्हांपैकीं प्रत्येकानें कोणकोणता विचार मनांत आणला आहे तो हुजुरांत जाहीर करावा.

**जंगी०**—महाराज. आम्ही सर्व सरकारच्या हुकुमाप्रमाणें चालणारे आहोंत. आपल्याला जो इष्ट वाटेल तो हुकूम करावा. हुकुमाप्रमाणें काम उडवलेंच म्हणून समजा.

**बादशाहा**—आमचा विचार असा आहे कीं शत्रू उद्यां खाण्यापिण्याच्या ऐन नादांत असतांना आपण त्यांच्यावर चाल करावी, आणि शत्रूचा तळ हालण्यापूर्वींच आपण सोमनाथावर हल्ला करावा. म्हणजे त्यांच्या रंगाचा बेरंग होऊन जाईल. हत्यारें सावरण्याला देखील कोणास अवसर मिळणार नाहीं आणि गैरसावध लोकांवर आपला सारखा हात फिरेल. शत्रूचा माल आपल्या हातीं लागेल. ते देवळांतून पळ काढतील. आपल्याला पुष्कळ लूट मिळेल. लुटीमध्यें सोमनाथावरील बहुमोल दागिने आणि जवाहीर जें ज्याच्या हातीं लागेल तें त्यानें खुशाल घ्यावें; इतकेंच कीं आह्माला दाखवून मग घेऊन चलावें.

**नसीर०**—महाराज, वाः! खासा हुकूम!! सगळे हिंदु लोक जेवतांना उघडे होतात. एक हातभर फडकें–ज्याला ते सोवळें ह्मणतात तें ढुंगणाला गुंडाळून जेवावयास बसतात. एक पंचपात्र व एक तांब्या याशिवाय त्यांचेजवळ त्यावेळीं कांहींच नसतें. अशा स्थितींत त्यांना मारणें हें कांहीं अवघड काम नाहीं. मनांत मात्र आलें पाहिजे.

**दिला०**—महाराजांनीं चिरकाल राज्य करावें. हा सेवक हुकूम होण्याची वाट पहात आहे. माझी पक्की खात्री आहे कीं महाराजांच्या आज्ञेप्रमाणें आपले लोक शत्रूवर तुटून पडल्यावर शत्रूची मस्ती खाडकन् उतरेल. "विटाळ विटाळ" असें ओरडत, पुढचीं पानें तशींच लोटून ते सैरावैरा पळत सुटतील. मग आह्मी त्याच पानावर बसून जेवणावर यथेच्छ हात मारूं, आणि शत्रूंचीं वस्त्रेंप्रावर्णें व हत्यारें वगैरे चटसारें सामान आह्मी गोळा करूं. जे पळत सुटतील त्यांचा सारखा पाठलाग करूं. त्यांच्या बायकामुलांना कैद करूं. मुलांना गुलाम आणि बायकांना दासी करून ठेवूं. मोठी मौज मारूं. पुढें ईश्वर आहे!

**खान०**—गरीबांचें पालन करणारे महाराज, मला असें वाटतें कीं असा योग फिरून येणार नाहीं. शत्रू आपण होऊन आमच्या दाढेंत पडत आहेत आणि आपल्या पापाची योग्य शिक्षा भोगीत आहेत. ईश्वर करील तर मी पहिल्याच हल्याला सामतसिंह, जयसिंह आणि भीमदेव यांची मुंडकीं कापून तीं किल्याच्या दरवाज्यावर लटकावून देईन. ह्मणजे दुसरा कोणी शत्रु डोकें वर उचलणार नाहीं. सर्व हिंदु लोक आमच्या ताटाखालचीं मांजरें होऊन राहतील. मग सर्व हिंदुस्थानभर पृथ्वीप्रलयापर्यंत आमचेंच राज्य आहे.

**फैजु०**—महाराज, परमेश्वर करील तें, आणि आपण ह्मणाल तें तडीस जाणार आहे. महाराजांच्या आज्ञेप्रमाणें आ-

ह्मीं आपली हीं शिरें या गादीला वाहिलीं आहेत. आह्मी मोठ्या जुटीनें लढूं आणि आपल्या शौर्याची शिकस्त करून सोडूं. धर्मप्रसाराकरतां अपार संपत्ति आणि हजारों जीव बळी पडले तरी हरकत नाहीं. या युद्धांत जर आह्मांस मृत्यु आलाच तर आह्मी महात्म्यांच्या पदास पोहोचूं आणि जिवंत राहिलों तर विजयी आहोंच. माल, जनावरें, पुरुष, बायका सर्वांना कैद करूं. बायकांना आणि पुरुषांना मुसलमान करूं. देवळें पाडून त्या ठिकाणीं मशीदी उभ्या करूं. मूर्तिपूजकांचा मागमूस या दुनियेंतून पार नाहींसा करून टाकूं. मग काय आमचे आह्मीच. इतरांचें काय काम आहे !

**जंगी०**—या दरबारांत बसलेल्या सर्व सरदारांनीं हें मनांत वागविलें पाहिजे कीं ही जी राजाज्ञा झाली आहे ती तडीस नेण्याची जबाबदारी सर्वांवर आहे. या करितां सर्वांनीं उद्यां सकाळीं उठतां बरोबर आपले हातांत नागव्या तलवारी घ्याव्या. जे खरे शूर असतात त्यांना त्यांची भाकर त्यांनीं खरें शौर्य गाजविल्याखेरीज गोड लागत नाहीं. राजाज्ञा सर्वांनीं ऐकलीच आहे तेव्हां विशेष सांगण्याचें कांहीं उरलें नाहीं.

**भोजराज०**—महाराज काय हा विचार! ही राजाज्ञा विचाररहित आहे. जेवणाकरितां पान पुढें घेऊन बसलेल्यावर तुटून पडणें यांत शूरांचा मोठेपणा नाहीं. ज्याचा धर्म त्याला प्रिय आहे. न्यायदृष्टीनें विचार करा. ही केवळ अन्यायाची गोष्ट आहे. माझ्या आजपर्यंतच्या एकनिष्ट सेवेवर आणि माझ्या राजकार्यतत्परतेवर लक्ष्य पोहोंचवावें. मी आपला आणि या गादीचा हितचिंतक आहें.

रात्रंदिवस सगळ्या जगभर आपल्या बुद्धिमत्तेची मी वाखाणणी करीत असतों. तेव्हां माझ्या हातांत हात घालून माझी गोष्ट आपण ऐकावी हें आपणास उचित आहे. आजपर्यंत आपण केलीत तेवढी पुरे झाली, परंतु यापुढें तरी हिंदुधर्माची पायमल्ली करूं नका.

**बादशाहा**—भोजराज, आपण भीड घालूं नका. हें युद्ध धर्मप्रसाराकरितां आहे. धर्माच्या कामांत आह्मी कोणाचें ऐकणारे नाहींत.

शत्रूच्या नेभळेपणाचा फायदा घेऊन आह्मी त्यांना चोपून बंदे करून सोडणार. शत्रूचा कड घेऊन आपण जी भीड घालतां ती आतां आह्मी ऐकणार नाहीं. पूर्वी तुमची जात इमानी होती परंतु अलिकडे सगळी बेइमान झाली आहे. आह्माला तर आमच्या धर्माचें निशाण कायमचें रोवावयाचें आहे ह्मणून म्हणतों आतां तुम्ही आमच्या उलट जाऊं नका.

**भोजराज**—माझी किंमत आणि योग्यता आपण नाहीं जाणलीत. आपले स्वर्गवासी आजोबा जर जिवंत असते तर माझा शब्द त्यांनीं कधींही खालीं पडूं दिला नसता. असो. या सेवकानें जास्त काय सांगावें ? या नोकरीला हाच राजीनामा. अशी नोकरी करण्यापेक्षां घरीं बसणें पतकरलें.

**बादशाहा**—बरें आहे. मलाही तुमची पर्वा नाहीं. काय ? आपण जातां ? चला. येथें तरी तुमची कोणाला पर्वा आहे. तुमची किंमत काय, आणि तुमच्याबद्दल अगत्य तरी कोणाला !

सर्व सरदारांना आमची अशी ताकीद आहे कीं, सरकारांतून जसा हुकूम सुटला आहे त्याप्रमाणें सर्वांनीं काम बजाविलेंच पाहिजे. जो हुकूम दिला तोच कायमचा. त्यांत रद्दबदली म्हणून कांहीं होणार नाहीं. ( पडदा पडतो. ).

---

## पान ७१-७६

### अंक चवथा-प्रवेश दुसरा.

**बादशाहा**—( पद्मावतीस पाहून आनंदानें ) रायमल, तूं मोठा इमानी नोकर आहेस; माझी पक्की खात्री झाली. ( पद्मावतीकडे वळून ) वाहवा ! काय हिचें हें अवर्णनीय सौंदर्य ! !

या मोहक मूर्तीनें हें मन ओढून घेतलें, आतां तें परतणें कठीण !!! मुद्रा तर प्रफुल्लित दिसते आहे !

**बादशाहा**—( रायमलाकडे वळून ) फार दिवसांपासून माझें ह्मणणें आहे कीं, हिच्याबरोबर लग्न करावें. रायमल, या बाबतींत या सौंदर्यलतिकेचा काय मनोदय आहे ?

**बादशाहा**—( आनंदानें ) अहाहा ! किती आनंदाची गोष्ट ! केवढें तुझें थोर प्राक्तन ? रात्रंदिवस हजारों दासी तुझ्या सेवेस ठेवून देईन आणि तुझ्या वस्त्रालंकाराकरितां लाखों रुपयांवर पाणी सोडून उंचीं वस्त्रें आणि बहुमोल दागिने खरेदी करीन !!

**रायमल**—फार चांगली गोष्ट ! सरकार—( इत्यादि. )

**शिपाई**—( बादशाहापुढें हात जोडून ) आपल्या सरदार लोकांनीं जयसिंहाला कैद करून आणिलें आहे.

**बादशाहा**—( आनंदानें उड्या मारून ) केवढी आनंदाची गोष्ट ! मनाला किती आनंद वाटत आहे ह्मणून सांगूं ! तुला इनाम दिलें जाईल. त्या दंगेखोराच्या हातांपायांत बिड्या घालून त्याला पुढें आणा.

**शिपाई**—फार उत्तम आहे महाराज ( निघून जातो )

**बादशाहा**—आमच्यासारख्या बहादरांपुढें अशा नामर्द लोकांनीं कसें टिकावें ! याच वेळेस भीमदेवाच्या मरणाची खबर कोणी मजकडे घेऊन येईल, तर मनाला फारच आनंद वाटेल ! त्यानें आमचे शेंकडों लोक मारले !

**बादशाहा**—त्याच्या जिवाला नानाप्रकारें त्रास देऊन, त्याला छळून छळून, त्याचीं कांतडीं सोलून काढून, त्याचे डोळे फोडून टाकून मग त्याचा प्राण घेईन.

**बादशाहा**—तें मी कांहीं जाणत नाहीं. त्याच्या जिवाचें मी वाटेल तसें करीन.

**बादशाहा**—माझा तर असा बाणा आहे कीं, जो माझा

एकदां वैरी ठरला, ज्यानें माझा एकदां अपराध केला, त्याचा प्राण घेण्यांत माझ्या हातून यत्किंचित् सुद्धां ढिलाई होणार नाहीं. ( कांहीं मुसलमान शिपाई जयसिंहासह प्रवेश करितात, जयसिंहाकडे वळून ) यावें महाराज! यावें महाराज! फार दिवसांनीं भेट झाली. ( रागानें ) अरे दगेखोरा, लढाईमध्यें तुझी इतकी फें फें उडाली शिवाय तुझा प्राण जाण्याचा प्रसंग आला तरी तुझ्या तोंडावरचें तेज अद्याप कमी होत नाहीं! मोठी आश्चर्याची गोष्ट आहे कीं, तुझ्या तोंडावरची टवटवी अजून कायमच आहे!! मला असें वाटतें कीं, तुझ्या जिवाला याबद्दल कांहींच वाटत नाहीं! याचें कारण काय बरें!

**बादशाहा**—येथून पळून गेलास आणि तिकडे जाऊन आपलें लग्न केलेंस. आणि तुला आतां एक कारटें झालें आहे. तेंही तुझ्यासारखेंच दगेखोर असेल. मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं, उद्यां तें तुझें कारटें आपल्या बापाचें तोंड पाहणार नाहीं! तुझी मान उडविण्याचा हुकूम आतांच दिला ह्मणून समज.

**बादशाहा**—तूं या वेळेस येथून चालती हो, नाहीं तर तुझी तीच अवस्था होईल! ( जयसिंहाकडे वळून ) दगडाची पुजा करतोस अं? आतां भोग त्याचें प्रायश्चित्त! आतां पुनः कधीं सोमनाथाची पुजा करशील?

**बादशाहा**—अशा लावण्यलतिकेकरितां मी काय नाहीं करणार? परंतु धर्माचे बाबतींत मी कोणाचेंही ऐकत नाहीं. रायमल, तूं आमचें मन वळविण्याचा प्रयत्न करूं नकोस. ( जयसिंहाकडे वळून ) मला असें वाटतें कीं, तूं जातीचा अस्सल रजपूत नाहींस; परंतु रजपूत लोकांस येऊन मिळाला आहेस!

**बादशहा**—फाजील बडबड करूं नकोस. याचा परिणाम चांगला होणार नाहीं. चोरा, पायांही पडत नाहींस अं! जा, याला घेऊन जा, आणि उद्यां सकाळींच याची मान उडवा.

तुझ्या मरणाची बातमी तुझ्या बायकोकडे आह्मीं पोहोंचवून देऊं! चला, निघा.

**बादशाहा**—राजकन्ये, तो माझा शत्रु आहे, एवढ्याकरितांच मी त्याचा जीव घेणार. ईश्वर साक्ष, उद्यां सकाळीं त्याला सूर्यबिंब दिसणार नाहीं.

---

## पान ९२-९७

### अंक पांचवा, प्रवेश दुसरा.

**बादशाहा**—( झोंपेंत बरळतो ) त्या दुष्टाला छळून छळून—फार चांगलें आहे—उडवा मान—चांगलें झालें.—

**बादशाहा**—(गुडघे टेंकून) या अहमदशहाला आतां फार वाईट वाटतें आहे. माझा जीव तुमच्या हातांत आहे! माझ्या अपराधाची मला क्षमा करा आणि यावेळेस माझे प्राण वांचवा.

**बादशाहा**— माझ्यावर तुमचे अगणित उपकार झाले. आतां मी कृतघ्नपणा कधीं करणार नाहीं. खरोखर तुमच्याशीं मी बेइमानी कधींही होणार नाहीं, कारण तुमचा मी फार आभारी आहें. ( हाटत हाटत लांब जातो. )

**बादशाहा**—( आश्चर्यानें आणि क्रोधानें ) असें व्हावें तरी कसें!!

**बादशाहा**—कोण आहे रे तिकडे पाहाऱ्यावर? या डोकें फिरलेल्या खीस ताबडतोब कैद करा.

**बादशाहा**—( शिपायांस ) अजून मी सांगितल्याप्रमाणें तुह्मी करीत नाहीं? हिला सोडूं नका. खेंचा.

**बादशाहा**—जयसिंहही या राक्षसीणी सारखाच आहे! यावेळीं तो माझ्या येथें कैदेंत आहे.

**बादशाहा**—असें कसें होईल!

**बादशाहा**—काय तर मग जयसिंह पळाला? त्याचें गर्दन आतांच उडवावें असें माझ्या मनांत होतें.

**बादशाहा**—मी हजारों शत्रूंबरोबर लढतों, परंतु माझी तबियत माझ्या स्वाधीन नाहीं.

**बादशहा**—भीमदेव, तुम्ही मोठे शूर आहांत. येथें तुमच्या एका केंसासमुद्धां धक्का लागणार नाहीं. आजपर्यंत तुम्ही माझे शत्रु होतां परंतु आज तुम्ही माझे पाहुणे झालांत. मनांत असें आहे कीं आपल्याला दरबारांत घेऊन जाऊन मोठा जलसा करावा. चला. ( पडदा पडतो. )

---

## पान १०३

### अंक सहावा प्रवेश पहिला.

**फैजु०**—( पाठलाग करीत आलेल्या रजपूत शिपायांस उद्देशून, नसीरखानास ह्मणतो ) काय लेकाचे पळत आहेत जसे कांहीं सिंहामागें कुत्रे !

**नसी०**—तर मग तुह्मी सिंह होऊन कुत्र्यांना भिता ह्मणावयाचें ?

**फैजु०**—इकडून, इकडून माझ्या पाठीमागून ये. ही रजपूत लोकांची फौज छपवून ठेवण्याची जागा आहे बरें का. आतां ही बातमी आपण आपल्या शहासाहेबांच्या कानावर घालूं. ( मुलास पाहून ) अरे पण हे काय ? हें पोर कोणाचें ?

**नसी०**—किती सुरेख पोरगं आहे ! पण याची आई कोठें गेली असावी बरें ? याला आपल्या घरीं घेऊन जावं हे बरें

**फैजु०**—खरेंच, असेंच केलें पाहिजे. माझ्या घरींही एक लहान मुलगा आहे. त्याला हा चांगला खेळगडी होईल. चला. याला घेऊन जाऊं चला. ( मुलाला घेऊन जातात. )

---

## पान १०६–११०

### अंक सहावा प्रवेश दुसरा.

**खानजहान**—थापा देतोस काय ? चला याला बादशा-

हाकडे घेऊन. भीमदेवासारख्या सरदारानें मुसलमानांच्या छावणींतून चोरासारखें दबत दबत फिरावें ही केवढी शरमेची गोष्ट आहे ! ( पडद्यांत वाद्यांचा गजर होतो ) आतां काय, सरकारस्वारी आलीच, त्यांच्यापुढें काय बोलावयाचें तें बोला.

( बादशाहा येतो. )

**बादशाहा**—( आश्चर्यानें ) कोणाला आमच्यासमोर आणिलें आहे ? कोण भीमदेव ?

**बादशाहा**—आणखी काय हात बांधून आणिलें आहे !

( जरा भितो. )

**खानजहान**—महाराज, हा भीमदेव आपल्या छावणींतून पळून जात होता त्याला मीं पकडून सरकारचे पायापाशीं आणिलें आहे.

**बादशाहा**—करा त्याला मोकळा. भीमदेव तुमची अशी स्थिति पाहून मनाला फार वाईट वाटलें. आमचे कोतवाल खानजहान यांना माफी असावी.

**बादशाहा**—तुमच्यासारख्या रणशूर पुरुषांना माझ्यापुढें हातपाय बांधून आणिलेलें पाहून मनाला फार वाईट वाटतें. ही तलवार तुह्मी आपल्या हातांत घ्या ( तलवार देतो ) कांहीं हरकत नाहीं–मी तुमचा शत्रु खरा परंतु तुमच्या उपकाराचें ओझें माझ्या डोक्यावर आहे. मुसलमान लोक प्रसंगीं शत्रूवरही कृपादृष्टि करितात.

**बादशाहा**—आतां माझी अशी इच्छा आहे कीं तुमची आणि माझी दोस्ती व्हावी. तुमचें अंतःकरण उदार असून तुह्मी रणधीर आहांत.

**बादशाहा**—खुशाल चलावें.

**बादशाहा**—( खानजहानाकडे वळून ) सर्व सैन्यांत जिकडे तिकडे असा हुकूम करा कीं भीमदेवाला कोणींही अटकाव करूं नये. त्याला बिनूतकार जाऊं द्यावें. ( भीमदेव

जाऊं लागतो. इतक्यांत फैजुद्वला व कित्येक मुसलमान शिपाई जयसिंहाचे मुलासुद्धां प्रवेश करतात. )

**फैजुद्वला**—सरकार हे आपले दोन सेवक जंगलामधून येत असतां त्यांना वाटेवर हें एक रजपुताचें पोर मिळालें आहे. ( मुलास दाखवितो. )

**बादशाहा**—( त्यास दाबून हलकेंच ) चुप. तुला डोळे आहेत कीं आंधळा आहेस. हा कोण आहे. त्या पोराला घेऊन मला काय करावयाचें आहे. द्या त्याला समुद्रांत फेंकून.

**बादशाहा**--( आनंदानें ) काय वेऱ्याचा कारटा ! वाह-वा ! हा एक धाकटा शत्रूच आहे. ( फैजुद्वला याजकडे पाहून ) आणरे त्याला ( मुलास घेतो ) शत्रूला जिवंत ठेवणें चांगलें नाहीं. आतां पुनः जयसिंह माझ्या हातीं आला.

**बादशाहा**--आतां पुनः जेव्हां एखादे वेळीं जयसिंह मुस-लमान लोकांची कत्तल करूं लागेल तेव्हां मी त्याला सांगेन कीं, तुझ्या कारट्याचा प्राण माझ्या एका शब्दावर अवलंबून आहे. आतांच याचें मुंडकें तोडून टाकवितों.

**बादशाहा**—मी हेंच म्हणतों आहे कीं जयसिंह माझा शत्रु आहे, आाणि हा मुलगाही त्याचाच आहे, ह्मणून मी ह्याचा प्राण घेणार ( मुलास फैजुद्वला याचे स्वाधीन करतो. )

**बादशाहा**--काय ह्याचें रूप ह्याच्या आईसारखें आहे ?

**बादशाहा**--तुह्माला जाण्याची परवानगी आहे. हें पोर माझ्याजवळ राहील.

**बादशाहा**--( रागानें ) धावा त्याच्या मागें, आणि आ-णा त्याला पकडून ( खानजहान, फैजुद्वला वगैरे लोक जा-तात. बादशाहा लांब पाहिलेसें करून ) केवढें अचाट शौर्य ! ( थांबून ) हाय ! हाय ! खानजहानला ठार केलें ! परमेश्वरा! काय प्रसंग आणलास हा ! ( थांबून ) आणखी तीन चार लोकांना ठार केलें (फैजुद्वला धावऱ्या धावऱ्या प्रवेश करितो)

**फैजुद्दवला**—महाराज, खानजहान आमचे मोठे आधार आणि आमचे मोठें पुरस्कर्ते ( रडत रडत ) हाय ! हाय ! परमेश्वरानें केवढी आमच्यावर आग पाखडली. गेले आपल्याला सोडून. शत्रूंनीं त्यांना ठार केलें. सरकारचा हुकूम असा आहे कीं, भीमदेवाला पकडून आणावें. ( रागानें ) पण माझा तर इरादा असा आहे कीं, आतां त्याचा प्राण घ्यावा हेंच उत्तम.

**बादशाहा**—हरकत नाहीं. उडवा त्याला दुनियेंतून पार. ( फैजुद्दवला निघून जातो ) ( बादशहा लांब पाहिलेंसें करून ) गेला, भीमदेव नदीच्या पलीकडे गेला ( थांबून ) बंदूकवाले गोळ्यांचा सारखा भडिमार करीत आहेत ( थांबून ) पण आतां काय आपलें दुर्दैव ओढवलें ! ( थांबून ) काय ? कोणाचा घोडा धरला ? घोड्यावर चढला ! ( थांबून ) आणखी तीन चार लोकही मारले. ! ( थांबून ) आतां काय ! रजपूत लोकही त्याला येऊन मिळाले; परंतु भीमदेव बराच जखमी झाला आहे. ( फैजुद्दवला घाबऱ्या घाबऱ्या येतो. )

**फैजुद्दवला**—सरकार, गेला भीमदेव पोराला घेऊन. पोरास कोणत्याही प्रकारची इजा झाली नाहीं.

**बादशाहा**—( दांत ओंठ खाऊन मुठी वळून ) शत्रूचें पोर होतें ह्मणून त्याला मारावें असें मनांत फार होतें. पण आतां काय ?—

**फैजुद्दवला**—भीमदेव आतां कोठें गेला असेल आणि सामतसिंहही कोठें असेल हें सर्व मला माहीत आहे. पलीकडच्या जगलांत त्यांची फौज छपवून ठेवण्याची जागा कोणती आहे तें मला माहीत आहे. माझा विचार आतां असा आहे कीं, निवडक शंभर लोक बरोबर घेऊन आपण तिकडेच जावें. आणि भीमदेवाची व जयसिंहाची दोघांचीही कत्तल करावी.

**बादशाहा**—तुझी सल्ला मला पसंत आहे. आपणाबरोबर फक्त शंभर तयार लोक घेऊन आतांचे आतांच तिकडे निघा.

रायमलाला असा हुकूम करा कीं आह्मी परत येईपर्यंत त्यानें राजकन्येस छळूं नये. तिची व्यवस्था करणें ती आह्मी परत आल्यानंतर करतां येईल !

------

## पान ११४-११८

### अंक सहावा-प्रवेश तिसरा.

**बादशाहा**—आतां शत्रूंनीं येऊन जर आपल्यास घेरा दिला तर आपली काय अवस्था होईल.

**बादशाहा**—तुझ्या करितां आलों आहें. आतां तुझ्या मर-डीचा घोट घेतों. आम्हीं तर शंभर लोकच आहोंत आणि तुम्हीं पाचशें इसम आहांत. तेव्हां तुमचा मोठासा पुरुषार्थ नाहीं. मर्जी असेल तर माझ्याशीं एकटाच दोन हात कर.

**बादशाहा**—अहो माझ्या शूर शिपायांनो तुम्हीही असेच एक बाजूस उभे रहा. एका क्षणांत मी याला ठार करतों ( दोघांचे हात होतात. भीमदेव बादशाहास जखमी करून खालीं पाडतो इत्यादि. )

**बादशाहा**—( एक हात छातीस लाऊन कण्हत कण्हत ) परमेश्वरा, हे देवाधिदेवा, ही केवढी दिलगिरीची गोष्ट कीं, मीं फेजुद्धवल्याची मसलत पसंत केली आणि फक्त निवडक शंभर लोकानिशीं येथें आलों ! ! आतां काय-कांहीं हरकत नाहीं : सामतसिंह, मी सर्वस्वी तुमच्या ताब्यांत आहें. मी आपली शिक्केकटार तुमच्या स्वाधीन करतों. तुम्हांला वाटतील ते करार मजपासून करून घ्या.

**बादशाहा**—या सर्व अटी मला पसंत आहेत. ईश्वर साक्ष त्या मला मान्य आहेत. ( सामतसिंह व भीमदेव बादशाहास धरून उठवितात. )